महाराष्ट्र राज्य मराठी साहित्य आणि संस्कृति मंडळानें रु. १३१२५ पुरस्कार दिलेला

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ सुवर्ण महोत्सव ग्रंथ : ३

# ऐतिहासिक पोवाडे

अथवा

# मराठ्यांचा काव्यमय इतिहास

९८५८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2030

संपादक व संशोधक
**यशवंत नरसिंह केळकर,**
वाङ्मयविशारद

REFBK-0017541

इसवी सन १९६९ ] [ भारतीय सौर १८९१

किंमत १५ रुपये

२५नां १९८८

३-२/

२०३९

७५६९५

२०/३/७१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
* १९७० *

महाराष्ट्र राज्य मराठी साहित्य आणि संस्कृति मंडळानें रु. १३१२५ अनुदान दिलेला

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ सुवर्णमहोत्सव ग्रंथ : ३

# ऐतिहासिक पोवाडे

अथवा

# मराठ्यांचा काव्यमय इतिहास

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
७५६९५ वि: काव्य
2039 नों: दि: 20131109

संशोधक व संपादक
यशवंत नरसिंह केळकर,
वाङ्मयविशारद

१७५४९
REFBK-0017541

इसवी सन १९६९ ] भारतीय सौर १८९१

किंमत १५ रुपये

( प्रथमावृत्तीचे हक्क प्रकाशकाचे स्वाधीन )

प्रथमावृत्ति
प्रति १२००

संपादकीय मंडळ

आचार्य स. ज. भागवत (अध्यक्ष)

आचार्य वि. प्र. लिमये

डॉ. चिं. ग. काशीकर

प्रा. गो. रा. परांजपे

श्री. शि. ह. धुपकर

डॉ. रा. ग. हर्षे (कार्यकारी संपादक)

मुद्रक :
शि. ह. धुपकर
टिळक विद्यापीठ मुद्रणालय, पुणें ३०.

प्रकाशक :
शि. ह. धुपकर,
कार्यवाह, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणें ३०.

# संपादकीय मनोगत

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ दिनांक ६ मे १९२१ रोजीं स्थापन झालें. दिनांक ६ मे १९७१ ला त्याला ५० वर्षे पूर्ण होतात. या निमित्तानें या विद्यापीठाच्या कार्याला अधिक व्यापक स्वरूप यावें असा विचार स्थिर झाला आहे. स्वातंत्र्य-प्रस्थापनेच्या कार्यांत ज्याप्रमाणें या विद्यापीठानें तेजस्वितेनें भाग घेतला, त्याच-प्रमाणें स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतरच्या काळांतहि राष्ट्रसंवर्धनाच्या व्यापक कार्यांत आपला वांटा उचलावयाची आकांक्षा धरली आहे. त्यासाठीं विविध योजना आकारास आणण्याच्या कामाला प्रारंभहि झाला आहे. त्यांतील एक महत्त्वाचा भाग म्हणून सुवर्णमहोत्सव ग्रंथयोजना हातीं घेण्यांत येत आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीमुळें भारताचा जागतिक दर्जा एकदम उंचावला आणि जागतिक घडामोडींत प्रत्यक्ष भाग घेण्याची संधि भारताला उपलब्ध झाली. त्याच बरोबर भारतीय समाजाची पुनर्घटना करण्याची संधिहि आपल्या लोकांच्या हातीं आली. आधुनिक जग विज्ञानाच्या साधनानें फार झपाट्यानें विकासाकडे चाललें आहे. आपल्या राष्ट्राला स्वातंत्र्यप्राप्तीमुळें आपल्या समाजजीवनाला विज्ञानाची दीक्षा देण्याची फार मोठी संधि चालून आली आहे. भारताच्या प्राचीन परंपरेंत अध्यात्मज्ञानाचे आणि विज्ञानाचे दोनहि प्रवाह समरसतेनें चालू होते. अलिकडे पाश्चात्य संशोधकांनीं विज्ञानाचा प्रचंड ओघ निर्माण केला असल्यामुळें आपणाला आधुनिक विज्ञान झपाट्यानें आत्मसात् केलें पाहिजे आणि मध्यंतरींच्या काळांत विज्ञानाचा तुटलेला सांधा पुनः जोडून घेतला पाहिजे.

यासाठीं ज्ञान–विज्ञानांच्या विविध क्षेत्रांत संशोधनात्मक आणि प्रसारात्मक अशा दोनहि प्रकारच्या ग्रंथांची आपल्या समाजाला निकडीची गरज आहे. या दिशेनें महाराष्ट्रांत अलिकडे निरनिराळे प्रयत्न चालू झाले आहेत. टिळक महाराष्ट्र विद्यापीठानें ज्ञान-विज्ञानाच्या या क्षेत्रांत आपला वांटा उचलावा अशी उमेद धरली आहे. विद्याक्षेत्रें अनंत आहेत आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठाला आपलें वैशिष्टय सांभाळून पुष्कळ काम करतां येण्यासारखें आहे. सुवर्णमहोत्सव ग्रंथप्रकाशन हा त्याचा पुरावा म्हणतां येईल.

भारतानें लोकशाहीचा स्वीकार केला असल्यामुळें शिक्षणानें समाजाची सर्व वर्गांची शैक्षणिक पात्रता वाढवावयाची आहे. विद्यापीठानें मुख्यतः या कार्यांत भाग घेतला पाहिजे. लोकभाषेंत सर्व ज्ञानविज्ञानाचा प्रादुर्भाव झाल्याशिवाय लोक-मानस संस्कारित होणार नाहीं. विज्ञानाच्या विविध शाखांचें मराठीमधून चिंतन व लेखन सुरू झाल्याशिवाय मराठी भाषेची शक्ति समृद्ध होणार नाहीं. या दृष्टीनें विज्ञानाच्या विविध शाखांवर तज्ज्ञ लेखकांकडून ग्रंथ लिहून घेण्याची योजना

निश्चित झाली आहे. लोकशाहीच्या दृढीकरणासाठीं लोकमानसामध्यें सामाजिक संस्कारांविषयीं जाणीवपूर्वक सहभाव निर्मिला पाहिजे. महाराष्ट्रांत बहुतेक ठिकाणीं भिन्न भिन्न वंशांचे, भिन्न भिन्न धर्मांचे आणि भिन्न भिन्न भाषा बोलणारे समाज एकत्र वास्तव्य करीत आहेत. या सर्वांना लोकशाहीच्या नव्या युगांत, नव्या महाराष्ट्राची उभारणी करण्यासाठीं उत्साहानें आणि प्रेमानें काम करावयाचें आहे. त्यासाठीं एकमेकांच्या **भाषा**, एकमेकांच्या चालीरीति, एकमेकांच्या उपासना-पद्धति जाणून घ्याव्या लागतील. भेदांमध्यें अभेद कसा पहावा याची दृष्टि ऋग्वेदापासून भारतीयांना मिळालेली आहे. महाराष्ट्रांतील साधुसंतांनीं सर्वभूतीं भगवंत पहाण्याला आपणाला शिकवलेंच आहे. हीच प्राचीन साधना आपणाला नव्या रूपांत आचरावी लागेल. त्यासाठीं लागणारें नवें साहित्य निर्माण करण्याची टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची मनीषा आहे

सुवर्ण महोत्सव ग्रंथ योजनेपैकीं पहिला ग्रंथ कै लोकनायक डॉ. मा. श्री. तथा बापूजी अणे यांच्या " **श्रीतिलकयशोर्णव** " या संस्कृत महाकाव्याचा प्रथमखंड दि ८ जून रोजीं केन्द्रिय शिक्षण मंत्री डॉ. व्ही. के. आर. व्ही राव यांच्या हस्तें प्रसिद्ध झाला. दुसरा ग्रंथ सरदार ईश्वरसिंघ ठाकूर यांचा " **शीखपंथदर्शन** " ह्याचें प्रकाशन दिनांक १८ जुलै रोजीं महाराष्ट्र राज्य शिक्षणमंत्री नामदार मधुकरराव चौधरी यांच्या अध्यक्षतेखालीं मुंबईचे भूतपूर्व शेरीफ सरदार बक्षी दलिपसिंघ यांच्या हस्तें झालें. तिसरा ग्रंथ **श्री. यशवंत नरसिंह केळकर** यांचा " **ऐतिहासिक पोवाडे** " अथवा " **मराठ्यांचा काव्यमय इतिहास** " हा होय. जागतिक वाङ्मयात ऐतिहासिक पोवाडे वाङ्मयांत मराठ्यांच्या पोवाड्यास एक विशेष स्थान आहे. एक तर त्यांतील बरेचसे पोवाडे समकालीन शाहिरांनीं तात्कालिक स्फूर्तीनें म्हटले आहेत. ह्यांतील बहुतेक शाहीर सुशिक्षित नव्हते, असें असूनहि त्यांच्यामध्यें स्वाभाविक उत्स्फूर्त काव्य तर आहेच, परंतु थोडी अतिशयोक्ति वजा करतां ऐतिहासिक सत्यताही आहे. अप्रसिद्ध ऐतिहासिक घटनांची माहिती नव्यानें करून घेण्यास त्यांचा उपयोग होण्यासारखा आहे. यादृष्टीनें मराठ्यांच्या इतिहासाची पार्श्वभूमि या शाहिरी काव्यांमुळेंच हृदयंगम झाली आहे. ऑक्स्वर्थ आणि शाळिग्राम यांच्या मराठ्यांच्या ऐतिहासिक पोवाड्यांच्या प्रस्तावनेंत " **मराठ्यांचे ऐतिहासिक पोवाडे** ' स्कॉटिश बॅलडस् पेक्षांहि सरस आहेत " असा अभिप्राय आला आहे. फ्रेंचमध्यें ऐतिहासिक वीरकाव्य पुष्कळ आहे परंतु त्यांतील बहुतेकांचें कर्ते सुशिक्षित वर्गांपैकीं असून समकालीन वीरकाव्य अपवादात्मकच आहे. आधुनिक काळांतहि महाराष्ट्रांत ऐतिहासिक पोवाड्यांची ही परंपरा चालू असून मराठ्यांचें तें एक अभिमानाचें स्फूर्ति-स्थान आहे हें निर्विवाद होय

★ ★

# लेखक–परिचय

**नांव :– यशवंत नरसिंह केळकर.**

जन्म १९ जुलै १९०२. १९२२ सालीं असहकारितेंत एस्. पी. कॉलेज त्याग व टिळक महविद्यालयांत प्रवेश. १९२२ सालीं वाङ्मयविशारद परीक्षा उत्तीर्ण नंतर सातान्यास ‘ ऐक्य ’ पत्राचा सहसंपादक व कन्याशाळेंत शिक्षक. १९२९–३० मध्यें कांहीं दिवस भारत इतिहास संशोधक मंडळांत काम: पुढें १९३५ पासून २१ वर्षेपर्यंत केसरीचा सहसंपादक. १९५६ सालीं निवृत्त १९२४ पासून काव्यादि लेखन–प्रकाशनास सुरुवात. विविध प्रकारचें वाङ्मयीन व ऐतिहासिक लेखन झालेलें आहे. या ग्रंथाच्या शेवटीं आजवर प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांची यादी दिली आहे ती पहावी.

—o—o—

# प्रस्तावना

**ऐतिहासिक पोवाडे** अथवा **मराठ्यांचा काव्यमय इतिहास** या माझ्या ग्रंथाचा पहिला भाग १९२८ साली भारत इतिहास संशोधक मंडळाच्या पुरस्कृत ग्रंथमालेत प्रसिद्ध झाला. त्यानंतर त्याचा दुसरा भाग पुढे सन १९४४ साली म्हणजे १६ वर्षांनी प्रसिद्ध होण्याचा योग आला ! त्या भागाच्या प्रस्तावनेत शेवटी मी असे म्हटले होते, " राहिलेल्या पोवाड्यांचा एक तिसरा खंड काढून आपले काम संपूर्ण शेवटास न्यावे, अशी मनीषा मी बाळगली आहे. शिलकी पोवाडे शे-सवाशे असून, एकंदर ग्रंथ सहा-सातशे पृष्ठांचा खास होईल. त्याच ग्रंथात एकंदर शाहिरां-संबंधीं मिळविलेली नवी विविध माहितीहि जोडावयाची आहे. पण तो तिसरा खंड छापण्याचा योग केव्हा येईल तेव्हा खरा ! "

तो योग आता १९६९ साली म्हणजे २५ वर्षांनी, म्हणजेच दोन तपांनी, येत आहे ! असली संशोधनाची चिकित्सक कामें कितीहि मोलाची असलीं, तरी त्याना बाजारभाव शून्यच असतो. संशोधकाचे श्रम, साक्षेप आणि त्याने त्यापायी केलेली पदरमोड यांची भरपाई कधीच केव्हा होत नसते. कणाकणाने मिळवून आणि अत्यंत साक्षेपाने शुद्ध करून व पोवाड्यातील वर्ण्य इतिहासाला समकालीन साधनांतून पुरावे उपलब्ध करून या तिसऱ्या खंडाची मी सिद्धता करून ठेवली असताहि कोणा प्रकाशकाला त्याचे अगत्य वाटले नाही. त्यांचीहि चूक म्हणता येत नाही. कारण त्यांची दृष्टीच धंद्याची, म्हणजे मुख्यत: नफा कसा सुटेल हे पहाण्याची स्वाभाविकच असणार. म्हणून त्यांना तरी बोल कसा लावावा ? परंतु उद्वेग किंवा संतापहि येतो, तो विद्यापीठाच्या उदासीनतेचा. वास्तविक अशा कामास पुणे विद्यापीठाने आपण होऊन मदत देऊन हा ग्रंथ प्रकाशित करण्याचे कामीं उत्साह धरावयास पाहिजे होता. पण ते झाले नाही. मात्र आता या तिसऱ्या खंडाच्या प्रकाशनाचा योग येत आहे, तो पुण्याच्याच दुसऱ्या एका विद्यापीठाकडून, म्हणजे टिळक महाराष्ट्र विद्यापीठाकडून. ही गोष्ट मात्र मला नि:संशय आनंदाची आणि अभिमानाचीहि ठरली आहे. कारण ज्या टिळक महाविद्यालयातून हे महाराष्ट्र विद्यापीठ निर्माण झाले, त्या टिळक महाविद्यालयाच्या निर्मितीचे वेळच्या पहिल्या तुकडीतील विद्यार्थ्यांपैकी मी एक होतो व त्या विद्यापीठाची वाङमयविशारद म्हणजे बी. ए. ची परीक्षा मी १९२२ साली उत्तीर्ण होऊन तिचा पदवीधर झालो आणि आता त्याच माझ्या विद्यापीठाने आपल्या सुवर्ण महोत्सव प्रकाशन ग्रंथात माझ्या या पोवाड्यांच्या ग्रंथाला अनुक्रमाने अग्रमान दिला हे माझ्या इतक्या दीर्घकाळातील वाङ्मयेतिहासव्यासंगाचे मी पारितोषिकच समजतो.

या ग्रंथाचा पहिला खंड सहाश पृष्ठांचा होता. दुसरा खंड तीनशे पृष्ठांचा आणि हा तिसरा खंड सुमारे सातशे पृष्ठांचा आहे. म्हणजे एकूण तीन्ही भाग मिळून जवळजवळ सोळाशे छापील पृष्ठे होतात. पहिल्या खंडात बावन्न, दुसऱ्या खंडात सव्वीस आणि या तिसऱ्या खंडात एकशेतीस मिळून एकूण दोनशे आठ पोवाडे, शुद्धीकरण टीका–टिप्पण्या व ऐतिहासिक पार्श्वभूमीसह सालंकृत असे हातावेगळे झाले. आता माझ्या हिशेबाने छापील उपलब्ध साधनातून संशोधन व परिष्करण करून छापण्यासारखे पोवाडे फक्त तीस–पस्तीसच राहिलेले आहेत. मात्र पुढील काळात माझे व इतर इतिहास-सशोधकांचे संशोधनाचे काम हे अव्याहत असेच सुरूच राहणार असल्यामुळें अप्रसिद्ध असे पोवाडे उपलब्ध होण्याची शक्यता आहेच. त्याचे एक उदाहरण. म्हणजे या खंडातच श्रीयुत ना. व. जोशी यांनी अगदीं अलिकडेच एक–दोन वर्षांत उपलब्ध करून दिलेल्या अफजलखान वधाच्या नव्या उत्कृष्ट पोवाड्याचे होय. फार काय अगदी आठ–पंधरा दिवसाखालीच भा. इ. सं. मंडळाच्या दप्तरखान्यांत संशोधन करीत असता मला हिंगणे दप्तरात शिवाजी महाराजांच्या एका नवीन अप्रसिद्ध पोवाड्याची त्रुटित प्रत उपलब्ध झाली आहे. ती मुद्दाम येथे उतरून घेतो. कारण उर्वरित भाग शोधून काढण्यास कदाचित इतर संशोधकांना त्याचा उपयोग होईल.

सिवा तुम मऱ्हाटा पहने लाल जुती ।
नवासे धडी मो सुनापूर लुटी ।।
भले भागानगर भले गोलकुडे ।
सिवा तू भला लूटियेले परिंडे ।।
भली भींवराई वराबी च्यलाई ।
कवी प्राण गोपालने हद बनाई ।।
सिवाजी उदारा सुता शाहजीच्या ।
बरे नाव केले कुळी भोसल्याच्या ।।
पुण्या चाकण्या गडगडी तो सिवाजी ।
कसा नांदतो भोसला मर्द गाजी ।।
सिवाजी तुम्ही थोर कौतुक केले ।
बरे शास्तीखानासवे मर्दियले ।।
देसोदेसहि आपले नाव झाले ।
सुरतसारिखे बंदर लुटियेले ।।

तथापि त्या अवशिष्ट पोवाड्यांचा आणखी एक खंड व्हावयाचा आणि पुन्हा त्याला प्रकाशक मिळावयाचा ही गोष्ट माझ्या बाबत तरी आता असंभवनीयच वाटते. पूर्वीच्या अनुभवावरून तसा खंड निघण्यास पुन्हा १५-२० वर्षे लोटणार आणि आज माझ्या वयाला ६७ वर्षे झाली. तेव्हा तितका काळ जगून माझेकडून ते कार्य सिद्धीस जाईल, ही कल्पना मी सोडूनच दिली आहे. म्हणून माझ्यापुरते या विषयासंबंधाने मी आखून घेतलेले जीवितकार्य म्हणजे ऐतिहासिक पोवाडे संशोधन करण्याचे व प्रसिद्ध करण्याचे कार्य या तिसऱ्या खंडानेच परिपूर्ण झाले, असे मी समजतो.

पहिले दोन खंड ज्यांनी वाचले असतील किंवा अभ्यासिले असतील, त्यांना या तिसऱ्या खंडाविषयी निराळे काही सांगण्यासारखे नाही. तेच परिश्रम, तीच चिकित्सा आणि प्रत्यंतर पुराव्यासाठी ऐतिहासिक माहिती शोधण्याचा तोच साक्षेप वाचकांना येथेहि आढळेल. बहुत काय ?

१ ऑगस्ट १९६९<br>
टिळक पुण्यतिथी

**यशवंत नरसिंह केळकर**

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठांक |
|---|---|---|
| १ | अफजलखानवधाचा पोवाडा | १ |
| २ | बाजी पासलकराचा पोवाडा | ८ |
| ३ | संभाजी महाराजांचा पोवाडा | १० |
| ४ | पानपतचा पोवाडा | ११ |
| ५ | सदाशिवरावभाऊ पेशव्यांचा पोवाडा | १४ |
| ६ | रंगाचा पोवाडा | १६ |
| ७ | आळत्याच्या लढाईचा पोवाडा | १७ |
| ८ | आळत्याच्या लढाईचा दुसरा पोवाडा | २० |
| ९ | भिर्डीच्या लढाईचा पोवाडा | २५ |
| १० | बदामीच्या लढाईचा पोवाडा | २७ |
| ११ | खर्ड्यांच्या लढाईचा पोवाडा | ३१ |
| १२ | दौलतराव शिंदे यांचा पोवाडा | ३४ |
| १३ | खर्ड्यांच्या लढाईचा दुसरा पोवाडा | ३६ |
| १४ | टिपूचा पोवाडा | ३८ |
| १५ | यशवंतराव होळकरांचा पोवाडा | ४१ |
| १६ | दुसरे बाजीरावांचा पोवाडा | ४३ |
| १७ | दुसऱ्या बाजीरावांचा दुसरा पोवाडा | ४५ |
| १८ | खडकीची लढाई | ४७ |
| १९ | खडकी-अष्टीच्या लढाईचा पोवाडा | ४८ |
| २० | दुसऱ्या बाजीरावांचा तिसरा पोवाडा | ४९ |
| २१ | दुसऱ्या बाजीरावांचा चौथा पोवाडा | ५१ |
| २२ | दुसऱ्या बाजीरावांचा पांचवा पोवाडा | ५२ |
| २३ | भरतपुरच्या लढाईचा पोवाडा | ५४ |
| २४ | बापू गोखल्यांच्या काळे-नानांचा पोवाडा | ५५ |
| २५ | बचाजी जिवाजी बापटाचा पोवाडा | ५७ |
| २६ | बचाजी जिवाजी बापटाचा दुसरा पोवाडा | ५९ |
| २७ | हिंदुपद बादशाहीच्या समाप्तीचा पोवाडा | ६१ |
| २८ | पेशवाईच्या नाशावरील पोवाडा | ६३ |
| २९ | पेशवाईनंतरच्याच्या दीन स्थितीवर पोवाडा | ६४ |
| ३० | पुण्याचा पोवाडा | ६५ |
| ३१ | हिंदुस्थान-वर्णन पोवाडा | ६७ |

३२ प्रतापसिंह ऊर्फ बुवासाहेबांचा पोवाडा ७०
३३ प्रतापसिंह यांचा दुसरा पोवाडा ७२
३४ प्रतापसिंह महाराज शिकारीस गेले यावर पोवाडा ७३
३५ प्रतापसिंह महाराजांची पदच्युति–पोवाडा ७४
३६ प्रतापसिंह महाराजांची काशीस रवानगी–पोवाडा ७६
३७ पेशवाई व शिवशाही नाशाचा पोवाडा ७८
३८ प्रतापसिंहाच्या पदच्युतीचा दुसरा पोवाडा ८१
३९ आप्पासाहेब उर्फ शहाजी राजे यांचा पोवाडा ८३
४० शहाजी राजांचे स्वारीचा थाट यावर पोवाडा ८५
४१ सातारकर छत्रपति व त्यांचे सरदार यांवर पोवाडा ८६
४२ संभाजी महाराज यांचा पोवाडा ८८
४३ शिवाजी छत्रपतींचा पोवाडा ९०
४४ आबासाहेब छत्रपती वधाचा पोवाडा ९२
४५ आबासाहेब छत्रपति वधाचा दुसरा पोवाडा ९५
४६ आबासाहेब छत्रपति वधाचा तिसरा पोवाडा ९८
४७ शहाजी महाराज उर्फ बुवासाहेब यांजवर पोवाडा १०२
४८ याच विषयावर दुसरा पोवाडा १०६
४९ याच विषयावर तिसरा पोवाडा ११०
५० याच विषयावर चौथा पोवाडा १११
५१ याच विषयावर पांचवा पोवाडा ११३
५२ बाबासाहेब व चिमणासाहेब छत्रपतींचा पोवाडा ११६
५३ जयराम महाराज यांजवरील पोवाडा ११८
५४ भाऊसाहेब (रामचंद्र सावंत) यांजवरील पोवाडा १२३
५५ चवथे खेमसावंत उर्फ बापूसाहेब यांजवरील पोवाडा १२६
५६ विश्वासराव गायकवाड यांचा पोवाडा १२८
५७ सर्जेराव घाटगे यांचा पोवाडा १३३
५८ नानासाहेब कागलकर यांचा पोवाडा १३८
५९ भाऊसाहेब सेनापती कापशीकर यांचा पोवाडा १४०
६० भाऊसाहेब शिरगुरकरांचा पोवाडा १४८
६१ राघोजी आंग्रे सरखेल यांचा पोवाडा १५७
६२ विनायक परशराम बिवलकर यांचा पोवाडा १५९
६३ बिवलकरांचा दुसरा पोवाडा १६१
६४ दामाजी नाईकाचा पोवाडा १६३
६५ चिंतामणराव पटवर्धन सांगलीकर यांचा पोवाडा १६५

६६ चिंतामणराव पटवर्धन सांगलीकर यांचा पोवाडा दुसरा १६७
६७ चिंतामणराव पटवर्धन सांगलीकर यांचा पोवाडा तिसरा १६८
६८ चिंतामणराव पटवर्धन यांचा पोवाडा चौथा १७०
६९ चिंतामणराव पटवर्धन यांचा पोवाडा पांचवा १७२
७० चिंतामणराव पटवर्धन–होळीतील रंगाचा पोवाडा १७३
७१ मल्हारराव होळकर यांचा पोवाडा १७६
७२ तुकोजी होळकरांचा पोवाडा १७८
७३ तुकोजी होळकरांचा दुसरा पोवाडा १८०
७४ तुकोजी होळकरांचा तिसरा पोवाडा १८२
७५ फत्तेसिंग महाराज गायकवाडांचा पोवाडा १८६
७६ गोविंदराव गायकवाडांचा पोवाडा १८७
७७ गोविंदराव गायकवाड यांचा दुसरा पोवाडा १८९
७८ खंडेराव महाराजांचा पोवाडा १९१
७९ खंडेराव गायकवाडाचा दुसरा पोवाडा १९३
८० मल्हारराव गायकवाडांचे पोवाडे–पोवाडा पहिला १९५
८१ मल्हारराव गायकवाडांचा पोवाडा दुसरा १९६
८२ मल्हारराव गायकवाडांचा पोवाडा तिसरा १९८
८३ मल्हारराव गायकवाड यांच्या पदच्युतीचा पोवाडा १९९
८४ मैराळभाऊंचा पोवाडा २०१
८५ ठाकुरजींचा पोवाडा २०३
८६ कृष्णाजी पवार देवासकरांचा पोवाडा २०४
८७ खासेरावांचा पोवाडा २०५
८८ रामराव मानकर यांचा पोवाडा २०७
८९ सामानगड बंडाचे पोवाडे-पोवाडा पहिला २०८
९० सामानगडचा दुसरा पोवाडा २१३
९१ सामानगडचा तिसरा पोवाडा २१७
९२ सामानगडचा चौथा पोवाडा २२३
९३ सामानगडचा पांचवा पोवाडा २२९
९४ सामानगडचा साहावा पोवाडा २३२
९५ सामानगडचा सातवा पोवाडा २३५
९६ सामानगडचा आठवा पोवाडा २३८
९७ सामानगडचा नववा पोवाडा २४२
९८ सामानगडचा दहावा पोवाडा २४८

९९ सामानगडचा अकरावा पोवाडा २५०
१०० सामानगडचा बारावा पोवाडा २५२
१०१ इंग्रजांचा पोवाडा २५६
१०२ इंग्रजांचा दुसरा पोवाडा २५८
१०३ इंग्रजांचा तिसरा पोवाडा २६०
१०४ इंग्रजांचा चौथा पोवाडा २६१
१०५ इंग्रजांचा पांचवा पोवाडा २६२
१०६ मुंबईचे पोवाडे-पहिला पोवाडा २६३
१०७ मुंबईचा दुसरा पोवाडा २६५
१०८ देशस्थितीचा पोवाडा २६६
१०९ देशस्थितीचा दुसरा पोवाडा २६७
११० देशस्थितीचा तिसरा पोवाडा २६९
१११ वसईसुभ्याची सरकार कचेरी यांचा पोवाडा २७१
११२ साष्टी हपीसाचा पोवाडा २७३
११३ मुंबईतील कांहीं प्रतिष्ठित लोकांचा पोवाडा २७५
११४ नाना शंकरशेट यांचा पोवाडा २७७
११५ आपाजी रघुनाथांचा पोवाडा २८२
११६ भाऊ धुरूंचा पोवाडा २८४
११७ सिद्धेश्वरशास्त्र्यांचा पोवाडा २८६
११८ विकाजीशेटाचा पोवाडा २८९
११९ गंगाधरभट खांडेकर यांचा पोवाडा २९२
१२० कोपरगांवचा पोवाडा २९३
१२१ राजापूरचा पोवाडा २९५
१२२ ठाण्याच्या घंटाळीचा पोवाडा २९७
१२३ शके १७९८ (स. १८७६) च्या दुष्काळाचा पोवाडा २९९
१२४ वासुदेव बळवंत फडके व बुधवारवाड्याची आग यावर पोवाडा ३०१
१२५ विजयदुर्गाचा पोवाडा ३०३
१२६ विजयदुर्गाचा दुसरा पोवाडा ३०४
१२७ अनुबाईचा पोवाडा ३०५
१२८ इंग्रजांचा सहावा पोवाडा ३०८
१२९ कृष्णाबाईच्या पुराचा पोवाडा ३०९
१३० हरि रामोशाचा पोवाडा ३१३
१३१ दक्षिणेतील शाहीरांच्या नमनाचा पोवाडा ३१७
१३२ ऐतिहासिक माहिती टीका व टिप्पण्या ३२१ ते ६७९

# ऐतिहासिक पोवाडे

अथवा

# मराठ्यांचा काव्यमय इतिहास

१०५८९
(स्थळ प्रत)

# मराठ्यांचे ऐतिहासिक पोवाडे

## शिवकालीन पोवाडे

— १ —

### अफजलखानवधाचा पोवाडा

( शाहीर फतनजी )

प्रथम नमन माझे नीरंजन नीजरुपाला ॥ नमली माहासरस्वती माझी वीनती सतीगुरुला: ॥ सीकराचा संभू प्रसन सीवाजी भोसल्याला: ॥ गाईन वीरमाल तयाचा मारले त्याने अफजलखानाला: ॥ सीवाजी दलभंजन त्याने मारला अबदुलखान: ॥ गड कोट राज्याचे सांगीन चढे चड: ॥ पोन्हेधर कोंडाना रोहेडा तुगी तीकाना ईसा पुर्डढा: ॥ लोहोगडास नाही जोडा माहा अवघड: ॥ परवळ पेरनार दुरग माहोली, कोहोज करनारा भोर पाली: ॥ खेड दुरग अन जाऊली परतापगड: ॥ तळे घोसाळे सुर्गड कंगुरी अनसवाडी घनगड कुरुड राहेरि: ॥ चंदना केळना तोरना कारिजा राजगड: ॥ काबीज केली वीलात कल्याण भीवडी च्यउल बंदर वाईदेस कराड इंदापुर: ॥ हलठन मानदेस सीर्वळ नीरेचे तीर सुपे सासवड कडेपठार: ॥ अवरंगस्याचा मुलुक लुटला स्याहार जुनेर झाला मोगलासी दावेदार: ॥ उतरला कोंकनात नाई त्यावर केली वाहार त्याचे मोडले बरोबर: ॥ १ ॥

मोडले महाल माझ्या घर खालची माडी केली वर त्यावंईक होता फार सीवाजीचा: ॥ खवर आणिली मुंला अमदाने पातस्याजादीणे दीले गऱ्हाने, कोकन लुटले सीवाजीने जागा वडलाचा: ॥ माझे सा ( गणे ) करा आधी, त्यावर धाडावी नामजादी, बडे साहेब बोले पातस्याजादी तो चोर आमचा: ॥ मग पाचारला भुवाबल

त्याचे नाव खान अबदल. सीवाजीवर केली चाल. वीडा उचलुन पैजेचाः ॥ पैजेचा वीडा अबदलखाने उचलीला. सवे घेतले कोन-कोनालाः ॥ बाजी घोडपड्या नाईकजी पांढऱ्याला. अकुसखान् मवाजी भोसलाः ॥ सीदीसभे सीदी हीलाल मुसेखा रोहेलाः ॥ चौदा हजार घोडा गनतीलाः ॥ कुच करुन मग तो वांईदेसा आलाः ॥ २ ॥

वांईस आले दलभार. आईकली राजाने खबर. खान आले आम्हावर. कैसे करावेः ॥ राजा बोलला आपुनी खानासी भांडू नका कोन्ही. ते आहेत आमचे धनी. सत मानावेः ॥ आम्ही खानासी करु सला. गड कोट मुलूक देऊं त्याला. जाईन पातस्यासी भेटायाला, खानासवें ॥ हस्यम होते गडावर तयास धाडली खबर. आमचा त्याया समाचार जाउलीस यावे. ॥ : : ॥ आर्घाले हस्यम गडोंगडचे पाचारीलें. महाराजे जाउलीस गेलेः ॥ भ्याला सीवाजी म्हणुनु अबजदुलखान बोले. सीदी हिलाल पुन्यास धाडलेः ॥ सीदि सभे नामजाद कोकनामधी केले. कील्यासी भ ( व ) तां काहि न चलेः ॥ जाउलीस गेला सीवाजी, जासुद खबर घेऊन आले : ॥ ३ ॥

खबर जासुदाने दिल्ही, वीकट जागा बहु जाउली. भोवंत्या कळंकाच्या जाळि. लागले बनः ॥ आकासी लागले साव सावडें. चहुकडे रान अवघेकडेः तेथे भांडतां गाठ न पडे. नाही मईदानः ॥ अवदुलखाने केली मत सीवाजीसी करावी सोहलत. मग करावे त्याला दस्त. कपट करूनः ॥ तोच मुद्दा अबदुलखानाचा. तोच मुद्दा सीवाजीचा. जाउलीस सांपडता यकदांचा. तर जाउंना देतुं यथुनः ॥ : : ॥ ईतका वीचार राज्याने आपले मनी केला. कळु नाहि दीधले कवन्यालाः ॥ लीहली कितावत मग हेजीब पाठीविला, तुम्ही खानासी करा सलाः तुम्हा वेगळे आनीक कोन्ही नाहि आम्हालाः तुम्ही मनी कोप कां धरीलाः ॥ स्याजी राज्यास तुम्हासी भाउपन. तुम्ही चुलते व्हावेत आम्हालाः ॥ ४ ॥

खानने हेजीबासी सांगितले. पातस्याने आम्हासी पाठीविलं. त्याचे म्हनले पाहिजे केले. सोडेना तोळः ॥ त्यां मनचे कपट टाकावे.

आम्हासी भेटाया यावे. पातस्यापे नेईन आपल्यासवे. देईन कउलः । पातस्याजादी वडेसाहेब. आमचा मोडत नाही जाब. असा आहे माझा परताव. चालो तो बोलः ॥ अमशा दीली हेजीबाला. आपला हेजीव सवे दील्हा. जा तुम्ही घेउन या राज्याला दाखउन कउलः ॥ अवदुलखानाचा हेजीव आला सिवाजी पासी कउल दाखवीला राज्यासीः ॥ डोईवर्ठेवीला कउल मान दील्हा तयासी. आदरमान केला हेजीवासीः ॥ तेथे येतां वहु भें वाटतसे आम्हासी येथेच आना खानसाहेबांसीः ॥ लेहली कितावत मग दीधली हेजीवासी. हेजीव आला खानापासीः ॥ ५ ॥

खानाजवळ बोले हेजीव. तुम्ही आयका खानसाहेब. सीवाजीने लीहिला जाव वीनती आयकावीः ॥ तुम्ही वडील आम्हासी खरे. आमचे करु पाहता बरे. येथे यउन सांगा वीचारे. अगन्या द्यावीः ॥ तुमचे आमचे येक मन. येथे नाही दुजेपन. कुरुपा करावि येउन. बुध सांगावीः मग अवजलखान बोलला कुच करा उठा चाला मोहे. . . जी पाठविला. खबर राजीहेसी . . . गावीः ॥ उठला अवजलखान मनी धरूनी कपट. त्याने धरली जाउलीची वाटः ॥ पुढे चालेत हती घंटाचे घनघनाट. पाटीसि फउज चाले कटः ॥ माहा सायासे उतरला रडतोंडीचा घाट. तेथे होते सीवाजीचे मेटः ॥ राज्याने घातले मांडव बरवा जागा पाहुन तळवटः ॥ ६ ॥

मांडव घालून केली हवा. आनला हरजीनसी मेवा तर हा खान साहेबांसी न्यावा. राजा बोलेः ॥ सीर व्हाहुनी धाडीला माल आनीक पालकी दिल्ही सुकपाल. त्यास देखुन खुसी हाल, खान झालेः ॥ रात्र कर्मली चत्र पाहार.तर वर उगवले दिनकर. खानने पाचारले माहालदार. धाडून दीलेः ॥ महालदार म्हनेत सीवाजीला. खान पाचारीतात तुम्हाला. राजे म्हने येतो चला. पुढे लावीलेः : ॥ येता यता झाला तीपाहार. खान म्हने कां लावीला उसीर. भाऊवंद सकळ मीळाले [स] हदर तया सागीतला वीचारः ॥ चाळीस हजार पायेंदळ ठेवले रानाभीतर. मत मऱ्हाठयाची थोरः ॥ जंई मी अगाज करीण परताब-गडावर तई तुम्ही घाट धरा वरजोरः ॥ ७ ॥

तुम्ही वळकट धरा घाट. मी घेतो अवजलखानाची भेट. त्यास आपल्यास जीवा साट. मी करीनः ॥ गडोंगड नाईक हस्यम. तयासी सांगा माझा रामराम. तुम्हास स्याजी राज्यासि काम. जातो नीरखनः ॥ मग पाचारिले ब्राह्मनाला. दान दक्सेना दीली त्यांला. मग संकळोक घानला पुसले वचनः ॥ भटे सांगीतला महुर्त. राजे सिद व्हावे तवरीत. होऊनी येसील येसवंत सत जानः ॥ सोयरे धायेरे सकळ वीनवीति सेवक जाऊं नये अवजलखानास मोकः ॥ अस्याच गति त्याने ठकीले करनाटक मोटा अवजलखानाचा धाकः ॥ राजा म्हने तुम्ही भेऊं नका सकळिक मी आहे तयाहून आदीकः ॥ घेईन त्याचा परान तर मी संभुचा सेवकः : ॥ ८ ॥

राज्याने कीस्मवत आवीलि वरी. सीले लेउन केली वरजोरी. झग्यावर डगला मुसेजरी. राजा त्यालाः ॥ डोईस टोप वर लपेटा, माहालदारापे दीधला पटा. हाती विचवा सत्रकाटा वागनक त्यालाः ॥ सीवाजीने पाठवीला माहालदार. सांग जा खानासी खबर. तुम्हाकारने सदर. आरंब केलाः ॥ तुमचे आमचे पांच जन. येथे नाही आनखासी कारन. तर मी तुम्हांसी भेटेन. राजा बोलीलाः ॥ सीवाजीचा महालदार आला खानापासी. तसलीम करून उभा सभेसीः ॥ महाराज्याने वीनती सागीतली तुम्हासी. सदर सवारली तुम्हासीः ॥ तुमचे आमचे पांच जन कारन नाहि आनखासी तर मी भेटेन तुम्हासीः ॥ मऱ्हाठ्याची मत न कळे अवजलखानासीः : ॥ ९ ॥

मग बोलला अवजलखान पाचारील भोई पालखी आन. येक पेसघा दुसरा पठान. सर्वे घेतलेः ॥ पालखी आनवीली सुकपाल. त्यामधी वैसला उभयावल माहालदार उडाविति रुमाल. पांच जन ज( हा ) ले ॥ पहिला वंक अनामीकाचा दुसरा वंक तो भुयाचा. तीसरा जागा तो सीपायाचा, महालदार बोलेः ॥ चवथा कारकोनाचा दप्तरः पांचावि राज्याची सदर. उजड पडला तयावर पाहो लागलेः ॥ : : ॥ जिकडे पाहे तीकडे अवघा लखलखाट. जरतार झमकती तगटः ॥ पातस्याही सदरा करितो अईसा मऱ्हाटा धीट, खानाने मनि धरीला कपटः ॥ पालखीत वसुन सिवाजी येत होता नीट. पडली

अबदुलखानावर दीस्टः ॥ पालखीतुन उतरुन सनमुख उभा राहिला नीट ः ॥ १० ॥

राजा उभा राहेला नीट, अवजलखान करी दाटादाट. राजा हडती घालुन दीस्ट. धरले मतः ॥ सीवा काये आहे तुझेच नांव. गुमान करितोसी वहु. खातोस पातस्यायाचे गांव. अवघी विलातः ॥ गड त्वां घेतले पास्यायाचे. तर तुला कैसे जीरतील त्याचे, ठाव ना उरेत तुरेत तुमचे, पिरथीमीतः ॥ वाईट तुं चीतले आपल्याला. दावा पातस्यासी लाविला मग महाराजा बोलीला. जोडुन हातः ॥ ःः ॥ हात जोडुन सिवाजी बोलला आपुन. अ. . . घाल तर मी सागीनः सरदेचा मुलुख तुमचा तर म्या केला जतन. फउज मोगलासी बांधोनः ॥ मोगाल गेलेत काबीज कराया कोकन. त्यापासुन घेतले सोडउनः ॥ आनला माल दील्हा सीपायासी वाटून. डोंगर म्या गड केले बांधोन ः ः ॥ ११ ॥

डोंगर बांधोन केले कीले पैके पदरचे लाविले. कैसे देउं राजा बोले. मी तुम्हालाः ॥ गड जर देईन पातस्यायासी, साहेब काये देतील आम्हासी. परमाना असेल तुम्हापासी. पाहो द्या मलाः ॥ पेसवा बोलला अवजलखानाचा. परमाना काई करासिल पातस्याचा. माथ्या हात घे खानाचा, घेने तुलाः ॥ जाये तुं खानासी सरनं. डोई पोटांत घालुन. सळ अन्याव घे मागुन. पेसवा बोलिला ःः ॥ ः ॥ राजा म्हने तुमचे थोर केले अन्याव. म्या राखले तुमचे ठावः ॥ खान आन आम्ही आहूं पातस्यायचे उमरावः तुम्ही काये बोलतात गो (वि) दराव ॥ परमाना असेल पातस्याचा. सीका मजला दाव. गड अन मुलुक देईन ठावः ॥ वाईट लागले अवजलखानाला. त्याने मनी धरला सामावः ॥ १२ ॥

पेसवा बोलला मने भाव. तुम्ही खानासि भेटावं. मनाचे कपट टाकुन द्यावं. करा दूरः ॥ फीरंग घ्या खानाचे हातची. संका नाही गेली मनाची, अकळ बुद मऱ्हाट्याची. वीचार्थोरः ॥ खाने महालदार पाचारीला. फीरंग देऊन वेगळा केला. राजा संनमुख चालला; भेटी

सामोरः ॥ धीट पाट नेहट सीवाजी राजा बोलने बोले बरव्याबोजा, वैरयास न म्हणावे माझा. पाहे चौफेरः ॥ सीवाजी अबजलखान भेटले दोघे जनः दोन्ही धुरा आहेत, संगीनः ॥ पोटांत डोई घातली खानाने धरला गवसुन. कटारा मारलि वढुनः ॥ जीन्हेवर न चले काहि ठाईच आला लेउन, मग वचकला अबजलखानः ॥ राजाने हीचकली संगीन, वैसक घेऊन, बीचवा ( मार ) ला वरम पाहुनः : ॥ १३ ॥

वढला वाघनखाचा हात, फुटले पोट झाला घात, खानने फीरंग घेउन सावचीत हात टाकलाः ॥ राज्याने घेतला पट्यावर वोढून मारी दुसरा मार, पालखी आनवीली लवकर खान चाललाः ॥ राजा म्हणे संभ्या ! धावं वैरयासी नको जाऊं देउ, काप सीर तुं नको भेउ रे कधन्यालाः ॥ संभाजी धांवला आपुन पालखीतुन वढुन कापली मान, तीकुन फीरला तो पठान, धायास आलाः ॥ सात पांच मिळून पडले पठानावर त्याचा मारुन केला चुरः ॥ राजा म्हणे ऐसा जनमेना आनीक सूर, यास मुठीमाटी द्या लवकरः ॥ मारला अबजलखान कापला त्याचा सीर, घेउन गेला परतापगडावरः । गडावर जाऊन केले भांड्यांचे भडमार, हसमाला तेच झाली खबर ॥ हसमास खबर झाली सही, ईजेर्दे बांदल चंदर राई, क ( रुन ) कटकावर धवधाई ( उ ) ठली लाटः ॥ अवघ्या कटकास घातला वेढा. धायास येईल तो हान पाडा. हत्यार टाकील त्यासी सोडा. द्यावि वाटः ॥ पठान मुसेखा रोहेला, आपले जमेतसी तयार झाला. तर तो मारीत नीघाला. वेधला वाटः ॥ सरजा सीवाजी दलभंजन उमराव धरले पांच जन, सकळ कटक लुटून केले चटः ॥ वाईस गेला रोहेला मुसेखा पठान, तेथे होता फाजील-खान ॥ त्यास घेऊन पळाला रातचा दीस करून, गेला वीजापुरा घेउनः ॥ रडे पातस्याजादी हे खबर आयेकुन, सिवाजीने मारला अबजलखानः ॥ नामजाद केला रुस्तमजमा सवे दीधला फाजीलखान : ॥ १४ ॥

फाजीलखान रुस्तमजमा, त्यांनी बरवा केला सामा, केल्या वीजापुरीहुन धुमा, चाले भारः ॥ वाईस सीवाजी आला. गनति मोहो. . . तला. मग तो मारीत चा ( लला त्या ) चे सामोरः ॥ दोहीस झालेसे भांडन. घातले कोठात मारुन. ते दारवठे देऊन बसले

वरजोरः ॥ जासुद पनाळाहुन आला. राजा म्हने येथून चला. येकायकीच वेघला गडावरः: ॥ घेतला पनाळा सीवाजी झाला स्वार. वेढुन वसला सीदि जोहरः ॥ अवरंगाबादीहुन चालले मोगलांचे दळभार. नवाब सास्ताखा सुबेदारः ॥ घेतले सुपें सासवड जाळला सिवापुर. पुन्यामधी राहेले महीने च्यारः उतरला गडिहुन राजा चौकीस भांडन झाले थोर. राजगडा आले ते राजेस्वरः ॥ १५ ॥

सोडिला पनाळा राजगडास राजे आले. आवासाहेब जीजाई ही आहे माहा आनंदे भेटले. भांडु मोगलासी मोगल मुलुखात आलेः मागिल मचकूर झाला स्याहिर फतनजी बोलेः ॥

# बाजी पासलकराचा पोवाडा

पहिले नमन माझे देवा नारायणा ॥ दुसरे नमन माझे सद्‌गुरूच्या चरणा ॥ मोऱ्या चन्दनराव सांगे दायिताच्या खुणा न दायित देती । गड चंदन वंदन गड त्या परळीचे अंदण ना दायित देती । गड देशमुख पांचीजण ( राव राणूजी, राव क्रुष्णाजी, येल्या मांग, खंड्या महार, बाजी ) ॥ १ ॥

जाउलीच्या मैदानी । भार राऊताचे मिळले । मज्यालस करून ह्योरे चन्दनराव बसले पाठविला कागद दिनकरराव बोलाविले । बाराहि उमराव मऱ्हाटे नाही जाऊलीला इथून जोहार सांगा ह्योरे चन्दनरावाला । घाल जर हुकूम आम्ही जाऊं त्या कईला । मारू बाजी बोआ, घोडी भेटवू तुम्हाला । पैजाचा विडा सोनदळ्यांनी उचलिला ॥ २ ॥

कनक वाजविला शेहडा । सोनदळ्याचा भार कुई मैदानी आला शिवावर होत्या जाळ्या । दळये जाळ्यांत लपाले । चांगा जदी परीट पाळत घ्यायला चालला । कानी घातल्या धेंड्या वरून सारफळ्या लेला। नयनी नाही काजळ त्यान कोळसाच घातला कपाळी नाही कुकू त्यान इटकर उगाळिला । घागर चुंबळ घेऊन मग बाजीच्या वाड्या गेलाः ॥३॥

राव राणूजी राव कृष्णाजी गेले पारणे सोडायला । आमचा येल्या मांग बायकोला मूळ गेला । खंड्या जरी महार शिंदी पिऊन पडला बाजीयान बोआ नेटका जेवाया बैसला । बाजीच्या पंक्तीला रजपूत चवदाजण जेवती । बसलीसे आंबाई तयाला बिंबाई वाढिती । चांग्या त्या परटान पाळत घेतली पुरती ॥ ४ ॥

कनक वाजविला शेहडा सोनंदळयाचा भार बाजीच्या वाड्यामंधी आला । बुरुजी होत्या टेहळया धाड धाडसा बोलला ॥ ५ ॥

आंबाई बिंबाने धपधप उरावरी हाणिले । ह्या ग जावयानं मेल्यानं आमचं घर बुडविलं । याज ग सगट तीन बार घरावर आणिलं आंबाई

बोलली राव राणूजी नाहीत घरी बिंबाई बोलली राव कृष्णाजी नाहीत घरी आमचा येल्या मांग ईश्वरा अंतरला दूरी जरी असता खंड्या महार फोडता दळव्याची कोटगिरी त्याच्या मी बायकोला देत्ये गळ्यांतली बिलगिरी ॥ ६ ॥

रोही रानांत चरले आज बाजीच्या आखरा आले । फरक देखिली जागा रोहि वाड्यांत शिरले । मारीन मुसळा घ्याया मग शिंप्यांचा आनंत्या बोले बाहेर होते दळये, दळये गदगद हासले ॥ ७ ॥

अनंत्या बोलला आज मुंढ्याच्या चिंध्या होती तीन पाईल्या हरवरा आज बाजीच्या कामा येती कास कास तुमान लेली वरून कमरबस्ता केला आनंत्या खुरखुला यांची वदंता द्वारा गेली रागे याने कुर्दकडी कवाडाची हाणिली उंच दाराच दळये त्यानं परसदारा नेले चवदाजण रजपूत नेटके जेउन उठले अकरा मुरदे वाड्यामधे केले ॥ ८ ॥

आंबाई बोलली राव आदी मजला मारावे बिंबाई बोलली राव कापून मजला जावे आपल्या हाताने आपल घर तुह्मी जाळावे ढाल तरवार घेऊन तुम्ही दळव्यावर जावे ॥ ९ ॥

ज्यानं घोडा उठविला बाजीच्या अंगावर घातिला सांभाळो हो माम<sup>1</sup> बाजी बोआला बोलला म्यानासकट फटका दिला जावाई धरणील पाडिला होती अजगर ढाल जावाई ढालेने दापिला ॥ १० ॥

मकरतराव बोलिला यकदा मारीन बाजी तुम्हा बारा बाविश्य करीन कुर्डवर जमा जिकडे पळशिल बाजी तिकडे राऊत मारतील धुमा ॥ ११ ॥

मांगीण सांगू गेली येल्या कुर्ड मारून न्हेली ठाईचा येल्या भला भय मरणाचे नाही त्याला बोढिली समशेर येल्या रानातून चालला आनंत्या बोलिला हिंग आला माझा भाई काय पहातोस रं भाड्या तर तू हाण घोड्याच्या पाई ॥ १२ ॥

ज्यानं घोडा उठविला येल्याच्या अंगावर घातिला सराईत होता येल्या त्याची झडप जाऊन दिली मागलल्या हाताने त्याचे शिरकंबळ उडविले यशवंत घोडी सातविती फरंग अजगर ढाल, ॥ १३ ॥

# संभाजी महाराजांचा पोवाडा

संभाजी राजा राज्य करूं लागला ॥ कवजी बावास कारभार दिधला ॥ तेणे मोगल संतोषला ॥ येऊन पुण्यांत बैसला ॥ मोगले हीकमती जे केली विलाती वोस पाडिली ॥ बापडी मावळे गड टाकून पळाली । यकापुढ यक पळती गडा पुढ गड सांडिती ॥ बापडी हवालदारे सबनिसे दीने होती ॥ यैसी गडाची गति । तैसीच घोड्याराउताची ख्याती ॥ पंच हजारीस पाच तटे उरती ॥ बावाने केले बावापण ॥ राज्य बुडवीले आपण ॥ बांधोन दील्हे संभाजी तुज जाण ॥

# पेशवेकालीन पोवाडे

## — ४ —

## पानपतचा पोवाडा

### ( शाहीर रामचंद्र परदेशी )

नाना साहेब म्हणे कसे त्वां केले भगवंता। भाऊसारखा मोहोरा कुठे पाहूं मी आता ॥ ध्रु ॥

कौरव पांडव युद्ध करिती अशी लोकभाषा। तसाच या कलियुगामधे झाला तमाशा ॥ शहा दुराणी मोगल आला गिलजाऽबदुल खासा दक्षिण देशामध्यें याचा थोर झाला ठसा ॥ हरपला दत्ताजी शिंदा अणुहार ( जणुं हार ? ) जैसा ॥ बोले भाऊसाहेब आम्हाला द्यावा संदेसा ॥ परशराम अवतार उत्तर देशीं जात होता। विश्वासराव बाळ संगाति घेईन मी आता ॥ १ ॥

म्हणे गोपिकाबाई तुम्ही ऐकाना भाऊ। विश्वासराव बाळ माझें संगे नका नेऊं ॥ पदर पसरते तुम्हा एवढे मागते भाऊ। कठिण सांगतां मुलुख म्हणुन कां मी संगे येऊं ? ॥ भाऊ साहेब म्हणे तुम्ही वो असे काय करता। फार दिवस वाचून पुढे काय जोड करूं पहाता ? ॥ बोले भाऊसाहेब मोडिन मी दिल्लीचा बाच्छाऊ विश्वासराव तक्ति बसउन दक्षिणेत येऊ ॥ हे ना घडे जरी आम्ही तरी तोंडच ना दाऊं। रणखांब रोउनि तेथे आम्ही मरोनिया जाऊ ॥ २ ॥

वाजलारे चौघडखाना हत्तीवर हौदा चढविता। परशराम अवतार उत्तरदेशीं जात होता ॥ दमाजी गायकवाड संगे, नेती बाईला। समशेर बहाद्दर विसाजीपंत बिनिवाला ॥ सवालक्ष घोड्यांची गणती करून चालला। सगळया धरतीवरी गणती नाहीं त्याला ॥ ३ ॥

दिल्लीच्या मैदानी भाऊने शहाजोर दिल्हा। लावले मोरचे त्यानें वाच्छाई किल्ल्याला ॥ 'हाणा हाणा' म्हणून भाउने वर केला हल्ला। तटावर निशाण खोउनी येशवंत झाला ॥ बोले मल्हारबा भाऊ तुम्ही असे काय करता। फार दिवस वाच्छाई तक्त हे तुम्ही पाय लाविता ॥४॥

बोले मल्हारबा भाऊं खालीं गर्वाचे घर। या सद्दीने (सल्ल्याने?) तुम्ही आपुल्या हातीं बुडविता वर॥ खोटा तुझा मनसबा धनगरा ऊठ जा लौकर। खोटा तुझा मनसबा अवघा तूच फितुरखोर ॥ खंडेराव परसन्न सांगती तुझ्या शिरावर। आधी मोडीन गिलचाला मग घेइन तुझी खबर॥ 'घार गिधाड मच्छर चारीन तरी मी धनगर' (त्याणे) पाठविले जासूद दुराणी यावे लौकर" ॥ ५ ॥

फोडिला खजाना फौज करावी अंबर। चढले भाऊ साहेब एकदा घ्यावी टक्कर ॥ बांधावी समशेर यश वा देईल ईश्वर॥ असाचया कलयुगामध्ये रावण मातला होता। उडविले शिरकमळ राम घेउन गेला सीता ॥ ६ ॥

तक्त मोडिले शुक्रवारी थरथर कापली धरतरी ॥ अवघी दिल्ली रोदना करी किती तरी बुडाले या तक्ताचे छत्रधारी। श्रम पावले श्रीहरी हस्तना पुरी। सुरजमल्ल जाट कुर्द पडला भारी मग निघाले होळकर केली हो स्वारी ॥ सुबेदार ह्मणे गोष्ट नाही बरी शिंदशाही घेउनी दळभार चालुन गेला हस्तनापुर कां लष्कर जमनाके पार ॥ ७ ॥

भाऊसाहेब दिल्लीतून निघाले पुरबदेशा (? दिशाकडे ?) कडे डेरे दिले। जरीचे निशाण उभे केले (चाल) भाऊसाहेबाचे संगतचेहि निघाले सरदार जनकोजी सिंदा सुभेदार होळकर इभ्रामखान गारदी समशेर बहादूर विठ्ठल शिवदेव अंबाजी माणकेसर दम्याजी गायकवाड नारो शंकर विश्वासराव हा नानाचा कुमर है पठाणका लष्कर जमुनाकेपार ॥ ८ ॥

जोतकी (जोतषी ज्योतिषी ?) ब्राह्मण बोलले। येथे कौरव पांडव भांडले येथे दख्खनचे कोणी नाहीं आले। त्या कुरुक्षेत्रावर तुम्ही आले।

या कुरुक्षेत्रावर दख्खनचा कुणी भांडला नव्हता । एक ब्राह्मण सांगतो हें तुम्ही ऐका । सदोबा म्हणे काय आहे धोका . . . खंदक खांदिला चौफेर । . . . सदोबाके लष्करकी रस्ता घेरी । जब विकने लगी रुपयेकी देड सेर ज्वारी । भूकसे अलम मर गये भया लष्कर ख्वारी । जब लगी पठाण झुंजारी ॥ ९ ॥

गलिमाने गनिमी कावा किया । कुंजपुर कुंजगड लिया अल्लाने उनको जस दिया ये बहादुरखान की फौज उलटी । कुच भला हुवा दिल्ली मराठोंसे छूटी ॥ लिखा जब पठाणोंने खत भला हुवा तोडा तख्त नर्मदापार जाव सुन बात म्हासे मुलुख तुजको दिया तेरे हात बैठजा मौजा कर बजावता नोबत ये फकीरी मोहीम जाब आये रस्त काल फिरता है तेरे साथ अखेर नही मानता बात होजा लढनेकू साबूत ॥१०॥

खत भाऊसाहेबाने ऐकिले खत ऐकुनिया कुर्दी भरले कागद लिहा तुम्ही गिलचाला नव क्रोडांचा बाकी तूं धडा दिल्ली अटकेपासून अवघा मुलूख सोडा आणिक द्यावा तीस हजार घोडा तेव्हा तुटेल तुमचा आमचा झगडा ॥ हस्तनापुरात हात जोडा लौकर पाठवा उत्तर हे पठाण का लष्कर जमनाके पार ॥ ११ ॥

तिसरी लढाई ऐका मोठी कडाक्याची झाली विश्वासराव बाळ याची मुद्दत हरपली ॥ होता बाळ हौद्यात अवचित गोळी लागली रूमशामच्या बाच्छायाने चाल हो केली सदोबा ( म्हणे ) हत्तीला वशीव आता महाता ॥ १२ ॥

भाऊसाहेबी युद्ध मांडिले होते निर्वाणी भल्या भल्या लोकांच्या तोंडचे उडाले पाणि धणी दिसेना नयनी जशी जळी बुडाली नांव घोडे घेति हिराउनी झाडे घेती गावगांव केले वस्त्राहरण तरी न सांगती नांव हाती भोपळा फिरे रात सात अशा भोगिल्या विपत्ता ॥ १३ ॥

पेशव्याच्या राज्यासारखे राज्य होणार नाही बांधुन काठीला सोने माणुस मुलखावर जाई रामचंद्र परदेशी पोवाडा गातो सवाई संगमनेर ठिकाणा बाबू कहे कवीता ॥ १४ ॥

---

— ५ —

# सदाशिवरावभाऊ पेशव्यांचा पोवाडा

( शाहीर दाजी रामा )

सातपुडा कठिण बोलती। भेसुर रान भिल्लाची वसती। त्या ठाई गेले अमुचे पति। सुंदरा बोले मैना बोले। नीळराव दमयंतीस कसे अंतरले। काय मी सांगू जन्माची कानी ( कहाणी )। ' स्वयंवर झाले अज्ञानपणीं। अद्याप त्या दिवसापासुनी लागले झुरणी। गेले राव राजेंद्र धनी मला टाकोनी। जळु जळु ( जळो जळो ) जन्म पुरुषाचा। कठिण चाकरिचा। लाल बाई नेला माझा गडणीचा नानाभाऊनी। आले अकस्मात जासुद पत्र घेउनी। पत्र पाहताच केलि तयारी। घेतले अवघे मानकरी। निघून बाई गेली खाशाची स्वारी। मुहूर्त पाहुनी। नर्मदा उतरून पार भिल्लाचे रानी। दूर बाई गेले चौदासे कोस। तिकडे गिलचाचा रहिवास। श्री ( शिरीं ) घेउनिया वनवास पांडव झुकले॥ नीळराव दमयंतीस कसे अंतरले॥ १॥

रोहिला हबशी भी लंड ज्यान। मारती बाणापाठीं बाण। पाहून हरपली भूक तहान। झाला बेजार। वीरासी वीर झुंजती नांव दूरवर। नउ लाख फौज भाऊची चार दस्ते फौज गिलच्याची। झालि बाइ चकमक तलवारीची। वर्षला कार। कैकानि टाकिल्या उड्या कीं झाले ठार। सोनपतावर लढाई झाली। गर्दी भाऊवर गुदरली। ऐसी बातमी पुण्यास आली। शहर गजबजले॥ नीळराव दमयंतीस कसे अंतरले॥ २॥

ऐसा ऐकून वर्तमान। सोडला ठाव काळजानं। चिंतागत झाली कामीन। सखयासाठीं। कधि येतिल अमुचे धनी होतिल भेटी। कैक अंतरले नर नारीला। बहिण आठवली भावंडाला। माय अंतरली लेकराला पोटासाठीं। झाला एकची कालवा रडती सृष्टी। यश येवो नाना भाउला। ऐसा ध्यास सर्वत्राला। कृपा पूर्ण विठाबाइला। नवस म्या केले। नीळराव दमयंतीस कसे अंतरले॥ ३॥

सांड लष्करातून आली । तेथुन लढण्याची समाप्ती केली । स्वारी माघारी परतली । भाउनानाची घेतले यश धरली वाट पुण्याची ॥ नऊ लाखातुन लाख एक आले । येउन पुण्यासी पोचले । कृपा शाहूची । चहू मुलखी झडे चौघडा कीर्त नानाची । ज्याचे आले ते हासती । ज्याचे मेले ते रडती । केले नवस ते फेडती । खुशाल मनची । झाली परीक्षा अपुल्या दैवाची । जाफर नरसूची कवी । गोड ज्याला त्याला व्हावी । विठू कासीम गातो अनुभवी । सवाई तुरेवाले । दाजीरामाने केली कवन मोती जसे ववले ॥ ४ ॥

—

# रंगाचा पोवाडा

## ( शाहीर धोंडी नारायण )

श्रीमंत धनी श्रीकृष्ण अवतार । पाटिलबावा प्रिय जसा पार्थवीर ॥ आपले पुण्यप्रताप आहे थोर । म्हणून घेतले हिंदुस्थान सार ॥ बसविले ठाण दिल्ली अटकेवर । ठाइ ठाई फौजा बहुत परुपर (चाल) राजेंद्र धनी महाराज । रावसाहेब नाव साज । त्रिभुवनी प्रताप गाज । सृष्टीचे धनी शिरताज । यशवंतस्वामिचे नवखंडामधि नांव नाना म्हणे पदि धरिला सद्भाव ॥ १ ॥

पहा ति×××नात सण सिमगा ज्यानी करविला रंग तेव्हा पाटिलबावानी रंगाची केली××राव भरून ठेविली हउद ठाइ ठाइ । आश्चर्य सर्वजन पाहाती सकळ शाई । म्हणतात धन्य माधवराव सवाई गुलाल उधळला अंतपार नाही । रव तक्रराव खुप चाले सवाई । (चाल ) हरिपंत तात्याच्या द्वारी । नानाची खासी अंबारी । झळकती कळे सोनेरी । राव बसुन तया माझारी । ( तोड ) शहरात असे परिवारी सरंजाम घेउनिया समस्त । गेला पाटिलबोवा आपल्या डेऱ्यात । रंगाचा केला भडिमार ज्यानी बहुत । केली गुलालाची गर्दी झालि खुप मात । पोषाख दिला श्रीमंतासी तेथ । पाटिलबोवा सेवेसी असे त्वरित । ( चाल ) निघाली स्वारी तेथुनी । आली वाड्यात तत्क्षणी । वाढिवला ग्रंथ म्हणउनी । म्हणुन केली किंचित धरणी तुम्ही श्रीमंत साहेब धनी । धोंडी नारायण म्हणे । जे अंगेचा ठाव । म्हणे बापा आम्हि धरिला चरणि सद्भाव ॥

———

# आळत्याच्या लढाईचा पोवाडा

## ( शाहीर सुलतान पाटील, शिरोली )

निघाले धनी महाराज छत्रपती राज ॥ आले गलीम आळत्यावर नेमले झुज ॥ ध्रुवपद ॥

गलिमांनीं तोफा लाविल्या आणून आळत्यास ॥ हुता शुक्रवार दिवस ॥ आंत शिताराम हणमंताचे भल्या नांवाचे आळत्यामधिं ठाणें त्याचे ॥ सल्यानें किल्ला नाहीं अपेश घेऊन द्यायचें ॥ मीठ खाल्लें धन्याचें ॥ किल्यांत बळ आहे भारी दारूगोळीचें ॥ उचलले विडे पैजेचे ॥ ( चाल दुसरी ) ॥ एक हणमंतराव तयार झाला ॥ ह्मणे आळ-त्याच्या लोकांला ॥ पेंढारी तुडवूं चला ॥ मग समरीं भगवंताला ॥ जगदंबे पाव मला ॥ एक दैताचा संहार केला ॥ एक तोडी पेंढाऱ्याला ॥ एक पळती डोंगहोराला ॥ डोंगर गर्जे ॥ दोन घटकेंत झाली मौज ॥ १ ॥ नि० ॥

तेव्हां आपा काय बोलला जानोजीस ॥ ताकीद करा लोकांस ॥ हल्यानें नाहीं किल्ला घ्यावयाचा घेऊन अपेश ॥ मीठ खाल्लें धन्याचें ॥ भरलेला गांव पाहिला दिला हुकूम पेंढाऱ्यास ॥ लूट माफ आहे तुम्हांस ॥ झुरतीनें किल्ला घेईन धरून एकनीस ॥ लूट माफ आहे तुम्हांस ॥ ॥ (चाल) ॥ एक ब्रामण एकसर आला ॥ किल्यावर केली हल्ला ॥ गैबीचा दीन वाहिला ॥ गलीम मागें परतला पळती ताज ॥ नांव हणमंत शिताराम साज ॥ २ ॥ नि० ॥

त्या हणमंत शिवरामानें मनसोबा केला ॥ संभाळा दादानों किल्ला ॥ तीन वर्षं झुजविला हुता शिरोळचा किल्ला ॥ आणि एकदां मोठ्ठं हल्ला ॥ टाकोटाक पत्रें धाडली महाराजाला ॥ गलिमानें किल्ला वेढिला ॥ पत्र पाहतांच महाराज इतराशी झाला ॥ आळत्यावर स्वारी चला ॥ (चाल दुसरी) ॥ तयारी ताकीद लोकांला ॥

जीन भिडविला तेजाला ॥ कुचाचा नगारा केला ॥ कडीं तोडे देतो वक्षिसी मांडली पैज ॥ सरतीने धावे एक झुज ॥ ३ ॥ नि० ॥

राव नाना पाटणकर बावडेकर ॥ झाले तयार विशाळगडकर त्या रत्नागिरी आपाचे लोक चटसार ॥ गारदी राजा झोर ॥ आज झुरत आहे धन्याची सारी त्यावर ॥ खासी पागा बरोबर ॥ फौजेचा लोटला भार सुटले वीर ॥ एका बाजूचा सरदार ॥ गेले टाकाळयाच्या माळाला जमले सार ॥ कुणी मिळुनि लहान थोर ॥ (चाल दुसरी) ॥ हालली राजाची स्वारी ॥ झाली गर्दी एकच धाई ॥ गगनाला धुराळा जाई ॥ लागलें झुज ॥ खणाखणा शमशेर वाज ॥ ४ ॥ नि० ॥

आले रासगेटाच्या माळाला वाजला डंका ॥ फौजेचा एकच गर्का ॥ तो सर्जेराव घाटगा सांगतो ऐका ॥ राजाचा मेहुणा सखा ॥ त्यानें ताकीद केली होती आपल्या लोका ॥ कोणी तुटून जाऊं नका ॥ कैकासी पडला धाक वालती धोका ॥ त्या गलिमाच्या लोका ॥ आला खंडेराव जगदाळा तेजी उडविता ।. दादानो आझून काय बघतां ॥ (दुसरी चाल) ॥ एक शाहुचें दळभार ॥ एक शंभूचें दळभार ॥ जिलीब चालली झोर ॥ जरीपटका हत्तीवर ॥ निशाण चाललें झोर सोडली ध्वज ॥ एक एक बामण धरावा आज ॥ निघाले धनी महाराज ॥ धन्यानें दिलें शिरपाव केलें काज ॥ ५ ॥ नि० ॥

तो हैबतराव फांकडा गाईकवाड ॥ बाजूनें झाले पुढ ॥ हत्तीवर केली हल्ला घातली झड ॥ घोड्यावरनें टाकली उडी हत्तीवर चढ ॥ दाहा हजार गलिमाची फौज होती पुढ ॥ मधि बिध्याचा आडड ॥ चाल ॥ राउत निवडले सड ॥ घडिभर केली धडपड ॥ रांवण्यासी रंजक झड ॥ गाई दुमा घातल्या पुढ ॥ तोफखान्यास जाऊन भिड ॥ लोटिला तोफखाना तोडली ध्वज ॥ धन्यानें दिला शिरपाव केलें काज ॥ ६ ॥नि०॥

तीन कोस पाठी लागले एका पुढें एक ॥ तव्हां ठकले हो बामण भिऊन आपधाक ॥ शेंपन्नास टोळी आली हुजूरचे लोक ॥ वर समशेराचा धाक ॥ (चाल दुसरी) ॥ बामण भ्याले मनांत ॥ हात जोडून शरणागत ॥ आज मला वांचवा हित हरली पैज ॥ नाही होणार कळलें मज ॥ ७ ॥ नि० ॥

आधीं शंभूची शाई खाते हवई ॥ असें कधीं पाहिलें नाहीं ॥ दातांत चारा धरून उभे ठाई ठाई ॥ त्यास कोणी तोडलें नाहीं ॥ डाळ-भाकरी खाऊन पुण्यामधिं राही ॥ आवबासी करावें काई ॥ चौभासी लोक दखनचे बोले चतुराई ॥ बुद्धीला उणें काई ॥ (चाल दुसरी) ॥ गेला निवून पहिला राग ॥ एक धरून जाती ताग ॥ एक दडती जागोजाग ॥ कसें झालें आज ॥ एक म्हणती एकाला पाणी पाज ॥ ८ ॥ नि० ॥

लुटीची मात तुम्ही ऐकावी ॥ कुणी घेईना बंदुकीला करावें काई ॥ ह्या ढालास पडदळास गणता नाही ॥ लोळतात ठाईठाई ॥ (चाल) ॥ वामण धरून नेला ॥ गेली खबर डेऱ्याला ॥ मिरजेंत धाक पडला मिरजेच्या लोकांला ॥ मिरजेंत झाली गडवड गारदी वाज ॥ आली उदगांवचे माळाला राजाची फौज ॥ ९ ॥ नि० ॥

करवीर कोलापूर काशी केवळ ॥ अंवेचे स्वरूप सांवळ ॥ शिरोली कोसावर हाई जवळ ॥ धन विरोबाचा माळ ॥ सुलतान गातो पवाडा अज्ञान वाळ ॥ धन्याचे पायधुळ ॥ (चाल) ॥ डफावर लावून चंग ॥ कवी गातो भरला रंग ॥ आला वापू सुरत्याशिंग वैऱ्याची मोडली खोड ॥ १० ॥ नि० ॥

---

# आळत्याच्या लढाईचा दुसरा पोवाडा

## ( शाहीर संतू ह्मार, बत्तीस शिराळें )

आळत्यावर झालें झुज मोडली फौज ॥ गेला आपासाहेब सरदार पडली पैज ॥ घृवपद ॥

ह्या आईतवाराचे दिशीं सकाळचे पारी होता मुहुर्त भेस्तरवारीं ॥ दिले कृष्णेकडेनें डेरे निशाण जरी ॥ सोडल्या भगव्या ढाला पन्हाळ्यावरी ॥ घरीं सांगते अस्तुरी गोष्ट नाहीं बरी ॥ अंवदाचें साल कठिण राहावा घरीं ॥ आग लागो शावणी जळो मुलुखगिरी ॥ आले कोणेराव उमराव होउनी क्षेतरी ॥ जसे पांडवाच्या कुळीं जन्मले भयरी ॥ आले गणेशपंत रामचंद्र हरी ॥ आले सटवोबासारखे धारकरी ॥ चल कुठवर हुकुमा देऊं चंचीत माझं ॥ मोडला अस्तुरीच गेले पतीराज ॥ १ ॥ आ० ॥

ह्या पावनगड पन्हाळा किल्ला भेसूर ॥ भोंवतेनें आठि पेठा नित बाजार ॥ शिव छत्रपती महाराज पन्हाळ्यावर ॥ वर नांदे पाराशर साधोबा पीर ॥ आले आपाचे जासुद टाकलीं पतर ॥ सल्यानें यावें आम्हांस कोल्हापूर ॥ म्हाराज आले रागाला टाकलीं पतर ॥ जा उद्यां येयाचें आज हून तयार ॥ देवानें कोलापूर मोत्याचें झाज ॥ आई लक्ष्मीचा जागा नाहीं इलाज ॥ २ ॥ आ० ॥

ह्या शनवाराचे दिशीं उगवला दिन ॥ करी सेनेला ताकीद घोड्याला जीन ॥ हत्ती सजवला यशवंत फौज दारुण ॥ झोरे झळकतो जरीपटका चिनीला रत्न ॥ हुद्यावर सुतरनाळ भरले बाण ॥ चालला आपासाहेब सरंजाम्यान ॥ संगें करोलाची टोळी घेतली अग्न ॥ कुचाची झाली नौबत गर्जले गगन ॥ गेले आळत्याच्या शेजारीं तोफा घेऊन ॥ एकाएकी धरलें तोंड उडाविला बुरूज ॥ केला तोफेचा भडिमार झाली सांज ॥ ३ ॥ आ ॥

आले कोलापुरला जासूद वेशी उघडा ॥ आळत्याचा केला गुंडा पडला वेढा ॥ त्यांनीं वाचिल्या पत्रिका फकरडा ॥ महाराज होते रंग

माहाली आले घुडघुडा ॥ बोलाविले साठि सरदार ॥ शिपाय तुम्ही निवडा ॥ रणीं रायाजी जाधव राऊत गाढा ॥ आले सर्जेराव घाडगे पायांमधि तोडा ॥ कांखेला खंडा पट्टा अबलख घोडा ॥ सरखवास गुजापा दादा राउत करडा ॥ याचा पुतुर हैबतराव दादा रणीं चिमखडा ॥ त्या सैनेला ताकीद वाजे चौघडा ॥ पैजेचा मांडली पानें उचलिला विडा ॥ द्या तोफखानेला हुकूम आवाज पाडा ॥ एकाम्हार एक धांवती शिपाय खडखडा ॥ जसा वळवाचा पाऊस आभाळ घडघडा ॥ गेले आळत्याच्या शेजारीं जमले सज ॥ ठेविल्या हन्यावर डोया लोटली फौज ॥ ४ ॥ आ० ॥

पहिल्यानें तोफखान्यावर हल्ला केली ॥ जशी कडब्याची सरकळ पेंदी तुडविली ॥ द्या अंमरशिंग भोप्याची अखेरी हुटली ॥ पळतांना आपाराव सरदाराची गांठ पडली ॥ पाहिलें चवाणरायानें घोडीं परतलीं ॥ मारीत हुता आपास रंजक तटली ॥ आला जोडगोळ्याचा मारा छाती फुटली ॥ म्हाराज झाले घाबरे कशिगत झाली ॥ गेले राणोजी चवाण फजिती झाली ॥ गेली कोथळ्यांतून गोळी मोडला माज ॥ आरपार छाती फुटून आलें काळिज ॥ ५ ॥ आ० ॥

भर दुपारच्या पाऱ्यांत झाली लटपट ॥ एकाएकीं घातला घाला पडली गांठ ॥ नेले निशाणाचे हत्ती शंभर हुट ॥ आले पायउतारा लोक पुरविली पाठ ॥ चौकडून उठल्या फौजा धरली वाट ॥ आपासी चढल्या जखमा आली राव झिट ॥ आले घोड्यावरने शिपाई उजवट ॥ नेला धरून म्हाराजाकडे थापली पाठ ॥ द्या आंगावरला पोशाग म्हणे म्हाराज ॥ आपासी घाला पालखींत पडूं द्या निज ॥ ६ ॥ आ० ॥

हत्तीवर गर्दी झाली निशाणासहित ॥ चौकडून लावले राउत भाले भोवंत ॥ हत्तीवरल्या म्हातानें मांडली ख्यात ॥ सवा कोस लागले पाठी गेला झुजत ॥ हत्ती फिरविला माघारी पाडला म्हात ॥ वर चढला हैबतराव माईचा पुत ॥ त्याचे डोळे लाल तांबडे विडा मुखांत ॥ संगें बाबूराव जगदाळे गोविंदराव *मोहित ॥ केला फौजेचा हिरमोड पेंदी पळतात ॥ गेले करविराला झाले यशवंत ॥ द्या कडीं तोडे वस्तरें शिपायासी आज ॥ द्या हत्ती हैबतरायाला सजानासज ॥ ७ ॥ आ० ॥

झुजाच्या दिशीं होते राव कोण कोण ॥ त्यांचीं नावें सांगतों वीर घ्यावा ऐकून ॥ होते महाराजांचें जावाई बाळ अंजान ॥ जीत धरला आपासाहेबाला राव बापून ॥ हे सर्जेराव घाटगे सखारामान ॥ होते नाना पाटणकर रणे रणम्यान ॥ ढिगांत सोडला घोडा केलें घमशान ॥ होते निपाणकर देसाई गेले चालून ॥ फिरंगेचें काढले म्याण कापले सैन ॥ गेली खबर तासगांवला मोडली फौज ॥ म्हाराज झाले यशवंत लावली ध्वज ॥ ८ ॥ आ० ॥

रडे मातोसरी माउली आपासाहेबाची ॥ कशी ताटातूट झाली गायवांसराची ॥ रडे बाबाची अस्तुरी सासुरवाशी ॥ गेले पतीराज निघून म्हाराजापाशीं ॥ आले खुशालीचे कागद हाये जिवानिशी ॥ नका करूं घोर रातना दिवशीं ॥ नाहीं झाला म्हणा जावा आपासाहेब आज ॥ काय धरून यावे तासगांवाला लाज ॥ ९ ॥ आ० ॥

गेले पुण्याला जासुद खबर तहकिक ॥ राव बैसले होते सदरेला भोंवते लोक ॥ न्हेला धरून म्हराजांनीं भाउचा लेक ॥ तेव्हां नाना झाले घाबरे मिळुनि सकळिक ॥ आज हरलें पेशवेपण चला सन्मुख ॥ गेलें ब्रिरामणाचें निशाण पांढरे फेंक ॥ ह्या गणेशपंत ढेऱ्याला रवाना फौज ॥ त्या आपासाहेबावर वकत पडला आज ॥ १० ॥ आ० ॥

धनी भाऊसाहेब टाकलें अन्न ॥ आपाआपा म्हणून सोंकला प्राण ॥ थरथरां कांपत सैन आपाच्या भ्यान ॥ दिली सोडून धारवाड हैदर नायकानं ॥ दिले बादामीवर झुज बसविलें ठाण ॥ कर्नाटक हैद्राबाज घेऊन इंग्रज ॥ त्याची काय कळेना बोली जात अर्बुज ॥ ११ ॥ आ० ॥

धनी बाळासाहेब खावंद चातुर ॥ खुत माहाराजाच्या किल्याला धाडलीं पत्र ॥ सोडावा आपासाहेबाला ह्यांमधि बरं ॥ काय कळतें त्या मुलाला बाळ नेणार ॥ तेवा महाराजांनीं बसून केला विचार ॥ सोडला आपासाहेबाला केला उपकार ॥ दिली एक दोनशें फौज बरोबर ॥ जरि पटका ठेवून घेतला हत्तीबरोबर ॥ दोन तोफा जाऊं द्या वेगीं पन्हाळ्यावर ॥ त्या जरीपटक्यास भाऊस पडली ईर ॥ होतें भाऊचें पेंढार तीस हजार ॥ दर कूच करून आले बावड्यावर ॥ सोडावा हत्ती यशवंत लागलें काज ॥ त्या जरीपटक्यावर तुटून पडली वीज ॥ १२ ॥ आ० ॥

ह्या बुधवाराच्या दिशीं नेमली हल्ला ॥ बाहिर ठेविल्या तोफा सरंजाम केला ॥ हुती महाराजाची फौज उभी जाग्याला ॥ संगें सुबराव बावडेकरी घेऊन बाबाला ॥ आला नारायण गायकवाड आला मुजऱ्याला कोण माता माउली व्याली सौभाग्याला ॥ मरणाचा केला धडा उचालिला विडा ॥ चुलत्याच्या लागला चरणीं हातांमधिं भाला ॥ रिकिबीत ठेविला पाय रामराम केला ॥ जसा कौरवावर भीम अर्जुन चालला ॥ तोफेचा मारा संगीन गुमानीत घाला ॥ घोड्याचा उडाला पाय शिपाय पडला ॥ त्याची तगमग झाली कुडी प्राण चालला ॥ हुता हैबतराव डाव्या बाजूला ॥ बंधू धरला कवटाळून रडूं लागला ॥ त्याच्या पिंजऱ्यांतला राघोबा निघून गेला ॥ शिव छत्रपती महाराज शिवाजी राज ॥ दिली जन्माची भाकरी चालविली तुज ॥ १३ ॥ आ० ॥

गेले जासुदाच्या जोड्या आरळ्या नगरा ॥ पुढें टाकिला मंदील डोईचा चिरा ॥ होती बयाबाई माउली राजमंदीरा ॥ पुढें टाकल्या पत्रिका कागद कोरा ॥ बापूस लागला गोळा झाला पुरा ॥ आंग टाकी धरणीवर प्राण घाबरा ॥ माझ्या हरणीच्या पाडसा तान्या वासरा ॥ कुठे गेले माझे बापूजी कुणाच्या घरा ॥ का गेला कोलापुरा म्हणूं लष्करा ॥ केला लहानाचा थोर केला आकारा ॥ बसवून पाजिलें अमृताच्या धारा ॥ कसा तुटून पडला अस्मानाचा तारा ॥ केले दुःखाचे डोंगर घातलें वज ॥ कसें हरणीचें पाडस बालक माझं ॥ १४ ॥ आ० ॥

ह्या शुक्रवारा दिशीं खेळले शिपणें ॥ ह्या शनवारच्या दिशीं नेमली हल्ला ॥ हुता आपाचा कारकून रतन माणूस ॥ गेला घोडा उडवीत रणमंडळास ॥ आतां परता राव माघारी जाल तुम्ही कस ॥ झड गेली त्या घोड्याची यास अपीस ॥ मी गाईकवाडाचा पुत्र ठाऊक सकळास ॥ हटकून मारावा वैरी येवून येरास ॥ मारी डोईमंदी हात हातामधिं बसे ॥ या भिरामणाचा कंठ आला धरणीस ॥ त्याच्या गळयांतल्या कंठीचे झाले विघोस ॥ दोन हजाराचे तेजी सामान खास ॥ शिव छत्रपती महाराज शिवाजी राज ॥ केली झुझाची तारीफ ऐका सज ॥ १५ ॥ आ० ॥

या आईतवाराच्या दिशीं सकाळच्या पारीं ॥ झाली दिशाभूल अंधकार झांकला दिवस मुलें पडलीं जोड गोळ्यान ॥ गेलें गुणाजी सूर्य

हरपलें रत्न ॥ होती भाऊची फौज दबा धरून ॥ गेली महाराजाची फौज गेली चालून ॥ चौकडून उठल्या टोळया घ्या म्हणून ॥ तिथें कोणी केली तलवार बापू चांभारान ॥ तीन जखमा घेऊन आला यीरी राखून ॥ आजि यावें जी केदार व्हावें परसन्न लागलें काज ॥ तुज मांडिलें स्मरण लागलें काज ॥ १६ ॥ आ० ॥

तीन महिने संपूर्ण झाले कोलापूरला ॥ भाऊचा पडला वेढा हालेनासा झाला ॥ अंतरीं पत्र धाडलें आबासाहेबाला ॥ आणवावें शिवत्रा नानाला फत्याबुरुजाला ॥ संगें गडकरी देऊन पोचतां केला ॥ म्हाराज झाले खुशाल मनीं संतोषला ॥ केले तोफेचें पूजन सत्का केला ॥ महाकालीच्या नांवानें बार भरिला ॥ वरडत चालला गोळा उजाळा पडला ॥ हुता भाऊ मोरचा उडवून दिला ॥ भलाच मारणार चातूर गोलंदाज ॥ तीन मोरचे उडवून चवथ्याला लावली ध्वज ॥१७॥ आ० ॥

या कोलापुराशेजारीं बावड्यापाशीं ॥ प्याला पंचगंगेचें पाणी झाला संतोषी ॥ विडा दिला टेंबलाईला करवीरासी ॥ या भाऊसाहेब म्हाराजाशी झाली यखलासी ॥ गेल्या भाऊच्या फौजा तासगांवासी ॥ या बत्तीस शिराळ्याखालीं वारणेपाशीं ॥ संतु गाणे गातो शिराळ्या देशीं ॥ त्याचें वतन गांव नाटुली खेडें हरभासी ॥ हाय देशमुखाची दया धाक वैऱ्याशी ॥ गुरुनागनाथ भगवान बाबा संन्यासी ॥ गडी नागोजी निमानाजी लावतो ध्वज ॥ या तुरेवाल्याची पाहून गेली लाज ॥ १८ ॥ आ० ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलम
अनुक्रम ...१२१९५... वि: ...काव्य...
क्रमांक ...१०३९... नों. दि. 20/3/67



# भिर्डीच्या लढाईचा पोवाडा

( शाईर कृष्णसिंग )

गांव संदलगें घेऊन चला भिर्डीला ॥ शिव महाराजाची निशाण चढली हल्ला ॥ धृवपद० ॥

महाराज शिवाजी राजे कीं विष्णूनाथ ॥ धनी नांदे करविरांत अंबा पाठिवरत ॥ दल्लाचा निघाला भार ध्वज दल्लांत ॥ वर चवरीनि अबदागिरी रुमाल सात ॥ गांव संदलगें घेऊन चला भिर्डीला ॥ शिव महाराजाची निशाण चढली हल्ला ॥ आले भिर्डीच्या माळाला उभ्या यौधाला ॥ सभोंवते सेनेनें फार आरोवा दिला ॥ महाराज शिवाजी राजे लखोटा लिवला ॥ सल्यानें द्यावा किल्ला व्हावें बाजूला ॥ तो यातीचा ब्राह्मण उतारा लिवला ॥ आम्हीं करूं लढाई कधीं सोडायचा नाहीं किल्ला ॥ महाराज शिवाजी राजे संताप झाला ॥ जेव्हां घेईन भिर्डी तेव्हां बसेन भोजनाला ॥ १ ॥

यादवराव जाधव चवाण घोरपाडी ॥ ते एका पेक्षां एक मिळाले जाडी ॥ नाथापा जाधव रेशमी ताडी ॥ जेजाला खंडापट्टा अबलख घोडी ॥ घाटग्या रघुनाथ दादा पाडूं या मर्डी ॥ त्या भिर्डीच्या वरते फरार सुटलीं घोडीं ॥ गेले दरवाजा आगळा तोडली कडी ॥ जशी होते निवड मानकरी मोत्याची जोडी ॥ म्हणे आपा रत्नागिरी मसलत जाडी ॥ काय करूं नको चिंता क्षणांत घेतों भिर्डी ॥ भोंसला नागपुरवाला कीं झाली रगडी ॥ हा पंत बावडेकर यावें तांतडी ॥ २ ॥ गां० ॥

ही भिर्डी जी बांधतांना आधिं पाहिल्यान ॥ तो यातीचा ब्राह्मण वैर साधून ॥ सभोंवती हांतरली दारू सुरंग पाडून ॥ कळसूत्रें लाविली दरवाजांत आणून ॥ पेंद्याची जात इमान त्यास दावून ॥ जो वकत पडेल तेव्हां करा दणाण ॥ पेंद्यानें घरीं जाऊन शाप सांगून ॥ पोराबाळास ताकीद केली जातों मरून ॥ त्याची पतिव्रता अस्तुरी वोवाळली तिन ॥

त्यानें घेऊन हातांत वत्ती बसला येवून ॥ शीळ काढली बाजूला मोकळी करून ॥ त्या शिळेवरते बसला आसन घालून ॥ ३ ॥ गा० ॥

ते सर्व बिरामण मसलत करून ॥ सल्यानें रे देतों किल्ला यावें आपुण ॥ ते सर्व बिरामण गेले निघून ॥ मोकळा राव किल्ला दिला सोडून ॥ खडी दोपारच्या पाऱ्यांत महाराज डेऱ्यांत ॥ त्यांनीं दुधभाताचे जेवण जेवले होत ॥ खुशाली झाली सैनेंत वाजे नौबत ॥ तें पायदळ पुढें गेलें धांवत ॥ सभोंवतें लाविल्या शिड्या चढले वरत ॥ पेद्यानें पाहिलें त्याहाळून सारे चढल्यात ॥ त्यानें लावून दिली वत्ती झाला घात ॥ कोसाला उडाली दारू बुरुज घेऊन ॥ ते घारीवाणी माणूस फिरते वरन ॥ महाराज म्हणे डेऱ्यांत कशी गत झाली ॥ नवी दरवाजाची ढाल निशाणी पडली ॥ ४ ॥ गां० ॥

श्रीमंत बसून हवद्यांत स्वारी निघाली ॥ वडे बडे लोक लढणार वासडेवाली ॥ जिते धरी लोक हकीमाचे बांधून घाली ॥ शिवमहाराजाची द्वाही दुराई फिरली ॥ महाराज शिवाजी राजे निशाण तेथ रवली ॥ मागें परतूनशानी करविरास वाट धरली ॥ आला अंबेचें दर्शन केली परसन्न झाली ॥ या पांढरीची फौज थोडीशी गेली ॥ या बसलेल्या सदरे म्होर मांड जमली ॥ कैकाचीं दळिद्रें दूर बक्षिसी झाली ॥ तिथें रंकाळें पद्माळें दोहीं बाजूला ॥ मधिं महाराजा सजा नित्य रंगेला ॥ कृष्णशिंग वस्ताद जडाव त्यानें केला ॥ करि छंद अक्षर कटिबंध चूक नाहीं त्याला ॥ ५ ॥ गां० ॥

---

— १० —

# वदामीच्या लढाईचा पोवाडा

( शाहीर नरशिंगराय )

बारा वर्षांची माजी उमर चढते जानीचा आंगामधिं भर आमचे माईबाप थोर सरदार ॥ हैत महादजी शिंदे वर ॥ जासुद राया सांगा या खबर ॥ शिंदे होळकर कुणी जाग्यावर ॥ धृ० ॥

होळकर नेमिले हुजुरातीला ॥ पतीरायासी कागद आला ॥ पालखी संगट महालदार ॥ चौरी उडवाया खिसमतगार ॥ ह्मोर चालती कोतवाल त्यासी पुसती मोतद्दार ॥ कवळी उमर कुणाचा मूल करडी भिडतां तो निंबाळकर ॥ १ ॥ जासुद० ॥

शनवारी मुहूर्त पाहिला ॥ ढाला रंवताना शकुन झाला ॥ माझे सपनी हत्ती नेला ॥ नार उचकून उठली स्वप्नाला ॥ देवानें काय उणें केलें होतें त्याला ॥ जाऊन भोंसल्यासंगें मिटला ॥ उजवे बाजूला जिलबी चाले ॥ कवळी उमर कुणाचा मूल ॥ करडी भिडतां तो निंबाळकर ॥ ॥ २ ॥ जासुद० ॥

भारीं तळ पडला भिंवरेवर ॥ आपुला मुलुख मोडून चूर ॥ हजरीवर उठले फौजेचे भार ॥ तिथे मिळाले अष्ट सरदार ॥ भाऊपासुनी सारे सरदार ॥ कलमत नेमिली वदामीवर तीन लाख घोडा मिळुनिया फार ॥ वाजली नगाऱ्याची ढर ॥ कूच करूनी चालले म्होर ॥ जाऊनि उतरले वादामीवर ॥ तोफा लाविल्या देवडी मार ॥ कडाका गर्दी उठली थोर ॥ त्यांमाधिं होता पती सरदार ॥ शिडींत पाय लावतां झाला ठार ॥ शीर टांगलें दरवाजावर ॥ जासु० ॥ ३ ॥

साठ शिडी उभी कुसवाला ॥ तीस तोफा आंत किल्याला ॥ चार हजार कानडा भरला ॥ यल्लापा नाईक सरदार त्याला ॥ मारा मारा रे म्हणे लोकांला देईन बक्षिसी तुम्हा अवघ्यांला ॥ बत्ती दिली हो सारे तोफेला ॥ एका रंजकेनें मोडली हल्ला ॥ नऊ हजार जखम्या झाला. पांच हजार ठार जाग्याला ॥ खासा मुडदा कागदी शेला ॥ कोण हो

पुसतो पायदळाला ॥ खबर कळली भाऊसाहेबाला ॥ भाऊसाहेब बोलता झाला ॥ माझे फौजेचा आपाव केला ॥ जैसा माळावर धोंडा पडला ॥ उभ्या रक्ताचा पूर चालला ॥ रण हुमतो बदामी किल्ला ॥ जबर घेईन बदामी किल्ला ॥ तवां उठेन म्हणे संध्येला ॥ खबर कळली भोंसल्याला ॥ रखमाजीबाबा भोंसला आला ॥ वेड लागलें राव तुम्हाला ॥ तुम्हीं द्यावें राव जखम्याच्या खर्चाला ॥ माती द्यावी मेल्या मुड्याला ॥ परतून किल्यावर चढवूं हल्ला ॥ त्याचे गोष्टीचा मान केला ॥ जासुदराया सांगा खबर ॥ शिंदे होळकर कुणी जाग्यावर ॥ ४ ॥ जा० ॥

एक्या पारावर दिवस आला ॥ तवां दिलें जखम्यांच्या खर्चाला ॥ माती दिली हो मेल्या मुर्द्याला ॥ परतुन किल्यावर चढाविली हल्ला ॥ रखमाजीबाबा भोंसला भला ॥ डोई देऊन उभा कुसवाला गोळी लागेना शूर मर्दाला ॥ भारी सामान त्याच्या आंगाला ॥ बाण पलिते सोडूं लागला ॥ दारूखाना हो त्याचा पेटला ॥ तवां तो किल्ला लटका पडला ॥ यल्लापा नाईक बोलता झाला ॥ दारूगोळी नाहींरे झुज्जायाला । चंद्र-फेरानें येगली हल्ला ॥ सल्ला सल्लारे म्हणूं लागला ॥ ५ ॥ जासु० ॥

रखमाजीबाबा भोसला गेला ॥ धनीरे जामीन साऱ्या लोकाला ॥ लोक घेऊन बाहेर निघाला ॥ भर मेणाचा हुदा चालला ॥ कडें सोन्याचे चौकडे त्याला ॥ दौलत शोभती यल्लापाला ॥ यल्लापा नाईक बोलता झाला ॥ जातों मीं भाऊंच्या डेऱ्याला ॥ जाऊन भाऊशीं मुजरा केला ॥ भाऊसाहेब विचारी त्याला ॥ कोणरे सरदार होता किल्याला ॥ मीहो सरदार होतों किल्याला ॥ मीहो येल्यानें झुजविला किल्ला ॥ भाऊसाहेबास क्रोध आला ॥ भाऊसाहेब बोलता झाला ॥ लोक घेऊन जावें गोटाला ॥ संचित ओढवलें यल्लापाला ॥ यल्लापा मागें कुठे गुंतला ॥ भाऊसाहेबाची नजर होती त्याला ॥ जवळ रोहिले सांगतो त्याला ॥ जलदी करून मारावा त्याला ॥ पांचशें रोहिल्यांचा वेढा पडला ॥ म्हान तुकडा पडे धरणीला ॥ येल्लापा कळींत मरून गेला ॥ ६ ॥ जासु० ॥

खबर कळली भोंसल्याला ॥ उफलानी घोड्यावर चढला ॥ सळ-पम्याचा त्यानें सोडला ॥ उभ्या रक्ग्यानें वुटाविला ॥ येतां रोहिल्यानें

पाहिला त्याला ॥ रोहिले बोलती एकमेकांला ॥ मोठा वेस्थानों घात झाला ॥ रोहिले पळती दिकादिकाला ॥ रखमाजीबाबा भोंसला आला ॥ कोणरे मारिला यल्लापाला ॥ जलदी सांगून द्यावा आम्हांला ॥ भाऊसाहेब बोलता झाला ॥ आम्ही हो नाहीं मारिला येल्लापाला ॥ रोहिल्यांतून कळ झाली त्याला ॥ शिलेदारांनीं येऊन धरला ॥ ऐसा भोंसला समजाविला ॥ ७ ॥ जासु० ॥

कागद पाठविला पुण्या शहराला ॥ कागद पाठविला बिडा शहराला ॥ मैना होती माहेराला ॥ तिचे सपनीं पती गेला ॥ झाल्यालें वर्तमान सांगितला ॥ नार उचकून उठली सपनाला ॥ हाका मारते भोईराजाला ॥ आणाहो पालखी जाऊं लष्कराला ॥ वाईट घडले आमचे पतीला ॥ करार सपन पडलें मजला ॥ पालखीत बसून मारग धरिला ॥ आली एक दोन गांवे मजलीला ॥ तिकडने जासुद आडवा आला ॥ पतीची पाहिली तिने वस्तर ॥ राम स्मरून टाकिला पदर ॥ आंग टाकिलें धरणीवर ॥ ८ ॥ जासु० ॥

आंगची लिवणार कागद लिवला ॥ कागद पाठविला पुणें शहराला ॥ नाना बैसले होते सदरेला ॥ कागद वाचुनी त्यांनीं पाहिला ॥ नाना धडधडां रडूं लागला ॥ कवळी उमर मुलगा गेला ॥ जाऊन सांगावे मैनाबाईला ॥ दोन गांव बक्षीसी देतों खायाला ॥ नाना झडकरी तवां उठला ॥ एक पीतांबर दिला सतीला ॥ पांचशे रुपये दिले खर्चाला ॥ जासूद करार बोले नानाला ॥ मैना पोंचली लष्कराला ॥ चांदणी दिली उभ्या रस्त्यावर ॥ ९ ॥ जासु० ॥

हटका बिरामण बेकाराला ॥ आम्हांला जायाचा उशीर झाला ॥ खाई तयार दोपाराला ॥ हत्ती पालखी दिली दानाला ॥ पांचशें रुपये दिले दानाला ॥ हुट खजिना माल लुटिला ॥ घोडा पतीचा शृंगारिला चितातुरा डोईवर खोंविला ॥ लिंबु खोविलें जमदाडेला ॥ उभ्या रस्त्यानें चळ दिला ॥ जाउन उभी हो धर्मशिळेला ॥ लष्कर येतीहो मौज पाहायाला ॥ मुजरा केला हो साऱ्या लोकांला ॥ राम स्मरून उडी टाकिली

सती जळून गर्क झाली ।। मातापित्यांची झुंड आली ।। माता गडबडा लोळूं लागली ।। नाहींग मैना तोंड भेट झाली ।। मैना देवलोक पावली ।। मूर्तिसहित वर उगवली ।। बोले नवसाला पावूं लागली ।। ऐका नरशिंगरायाची बोली ।। टाकळी ठिकाण त्याचा किल्ला ।। त्यानें सतीचा पोवाडा केला ॥ कलगी झळकती डफावर ।। जासुदराया सांगा खबर ।। शिंदे होळकर कुणी जाग्यावर ।। १० ।।

---

# खर्ड्याच्या लढाईचा पोवाडा

## ( शाहीर धणु बापू )

बरे स्वामी लस्करात जायाचे वार्ता अशी उठली। नार विनंत्या कारितां मति खुंटली ॥ धृ. ॥

बरे कदा काई ऐकेना निघाले राव राजे। चालले कीं दिलदार माझे। धडधडती वाद्यं कडकडती पुढे शिंगंवाजे। झनकरे जिलीब रणवाजे। स्वारी खर्ड्यावर जायाची धनी शिरताजे॥ हात्ती घोडे सैयना साजरी निघे प्रवासी। उंवराव अष्ट सरदार सांडणीस्वार फौजेचा भार मधी रंगशशी। विटे पट्टेवाले येकाचढी येक मारिती फेक भाला भाल्यासी। संगे अरबरोहिल्याचा झोक मऱ्हाठे लोक आणिक हरभासी॥ ( चाल कटाव ) छत्रपती भोसले सरकार। श्रीमंत पेशवे पवार। दाभाडे जमदाडे हुशार। इंगळे पिंगळे डेंगळे सरदार। गाइकवाड महाराज रणी उदार। सैन्यामाधि सर सिंदे होळकर। धायगुडे पायगुडे धायवर। कदम मोहिते विंचूरकर। पुरंधरे रास्ते झुंजणार। घोरपडे आणि निंबाळकर। रणशूर जाधव वाघुलकर। फडके आंग्रे शिर्के जवर। गोखले शितोळे सांगलीकर। तासगांवकर डफळयासी खवर। भाऊ नगरवाले जर्मखिडीकर। काटे पानसे शूर जठार। रावरंभा आणि मिरजकर। ( चाल ) आले पहा जमाव करून। कासीद आणि ढमढेरे धैर्यवान बरं आले येकसरे रणी ताल धरून। गुणी माने पालांडे हिरे कुंजीर रणी शिरे मागे न फिरे। रणात उभे ठरून। मोरे आणि शालुकर हाटुन झुंजणार। आणि दरेकर गेले नाहीं हरून। घाटगे भरगे चव्हाण फराटे तीन हजार ज्वान आले सरसरून। पांढरे घाटगे फाकडे समले वाकडे रणी साकडे प्रसंगी धरून। कुरुंदवाडकर सरदार रणीं गजभार फत्ती तलवार ईश्वरेकरून। महाडिक धुमाळ ताकपीर आठवले वीर निकम वीर पार जाती रणि मरून। दोरगे काळे निरगुडे मुळे गावडे पिसाळ हरगुडे रानडे तरुण। वडवानळ मुरलीधर आणि पाटणकर खुळे भापकर वाघ

तट करून । खानवेलकर वाबळे यादव सावळे रणीं न ढळे राही धीर धरून । अशी जमली शाण्णव कुळी भरल्या हात चुली सुळाची पोळी घेती पतकरून । रणभोजनासी जायाचे रक्त वाहायाचे खर्डे पाहायाचे आज हर्ष धरून ( चाल ) या गारपिरावर जमले फाकडे कोणी लावी पगडीला समले वाकडे । तळ धरून क्षिणभर रमले राहु खडे । सारे तंबर होउन भ्रमले आकडे । मोगलावर जाया तमले चहुकडे । कीं यकायकी ठोकिला डंका फळी जणु फुटली । मोगलावर स्वारी सुटली ॥१॥

दरकुच निघाले राव कंपू दळ हालला । दारू गोळा भरून संगे गल्ला । दिल्या सिना नदीवर ढाला आटपला पल्ला । नाही शांत करिती कल्ला । मोगलासी कळाली खबर खर्ड्यातुन हल्ला । फळी धरून मेघ ढग कलला । झाला सूर्यउदय दिला हुकुम घालिती सल्ला । मोगल कहे रसलुल्ला । ( चाल ) शके सत्राशे सोळा फाल्गुन वद्य रंगपंचमी तिथीला । आनंदनाम संवत्सर मितीला । वीर मर्द रणशूर मराठे दिले वाण खऱ्या सतीला । धरी हातीं तलवार कत्तीला । जय जय जय रघुवीर गाजवती नमस्कार हनुमान जतीला । व्हावे अनकूळ युद्धमतीला । माधवराव धणी रत्न पेशवे दिला हुकूम पहा सरवत्तीला । अम्रलोळ सही नतवतीला ( ? )। झाली एकच भाऊगर्दी उडाली सुरमर्द आले रणगतीला । मारी भाले वल्लम हत्तीला । ( चाल ) भाले वल्लम बरची उडे सरकती पुढे जमया अंगी उडे कबंधे उठती । वीर सहस्त्र हाती झकझकी पहाता धकधकी समशेर लखलखी । बाण सर सुटती । मोगल पठाण अंबीर धीर गंभीर उडविती शिरं तटातट तुटती । मल्हार झाले बेफाम तोडला रणखांब जय जय रघुराम रणधन लुटती । ( चाल कटाव ) दिन दिन दिन मोगल पुकारी । हे रसलुल्ला मदत तुमारी । राम राम राम राम हिंदु ललकारी । कोणी शिव शिव शिव उच्चारी । देतो आरोळ्या वीरवर भारी । धामधुम दंगल सारी । चम चम चम चम चमकती तलवारी । रक्तकारंजे उडती सारी । बरत गोळ्या जंव मेघधारी । दणणण तोफ दणकारी । मारी मोगल गरनाळा झरारी । माधवरायानी करुन हुशारी । देउन मोर्चा नदीकिनारी । पाणी रुपयाचे दीड शेर झारी । त्यानीच मोगल आणिला हारी । माधव-

राव धकउन अंबारी । फौज कोंडली किल्ल्यांत सारी । निजामअली बहू पडला विचारीं । घातला तह केल्या बंद तलवारी । ( चाल ) तकोब करो अब रणबाई लेव मिर्थी मुलुकका खंड । मत रोवत खुदाने दंड दिया मज भाई । माधवराव फडणीस नाना हलविति माना बंद तोफखाना फिरविली द्वाही । भाले बल्लम समशेरी ढाला ठेविल्या खाली मुलांकत आनंदित शाही । दिला डंका नौबती झडे सुरू चबडे बाहुटे चढे झाली आवाई ॥ दिली सलामीस समशेर सयना चौफेर झाली बडी मेहर केली भरपाई । दरकुच हाले दलभार खासे सरदार सांडणीस्वार रस्तीं रीघ नाही । सत्राशे सत्रा वैशाख पुढे आली डाक । गाजली हाक द्वाहि-दुराहि । शुद्ध तेरस शुक्रवारी । रायास्वारी आली पुणे शहरी धुंद दिशा दाही । झाली भवान पेठेमाधि गर्दी धनी ज्याहांमदीं अंबारी जर्दी झुलावे खाई । रंग दिशा न कळे अंबेरी, पोशाख चंदेरी आले गुण-ग्राही ॥ पतिव्रता लक्ष पतिवरती । राजस धरती केली रत्नआरती ओवाळी देसाई ॥ (चाल) ॥ धनी माधवराव तातडी देत हुशारी ॥ खुद्द जामदारास त्या घडी हुकुम सरकारी । भांडारगृह उघडी बक्षिसा करी ॥ कोणा दिले सोन्याची कडी पोषाख भरजरी कोणा दिल्या मोत्याच्या लडी रत्नसागरी ॥ कोणा दिले तुरंगा फुलछडी मुलाम समशेरी ॥ धणु बापु काव्य नित जडी शुद्ध अक्षरी बाबाजी जोगू आवडी प्रेम अंतरी ॥ (मि०) ॥ नामाचे कवन ऐकता सभा लुटपुटली । मराठ्यामधी राशीत लुटली ॥ स्वामी लस्करांत जायाचे वार्ता अशी उठली ॥

---

— १२ —

# दौलतराव शिंदे यांचा पोवाडा

( शाहीर होनाजी बाळ )

दौलतराव धनी महाराज । शूराचे पोशिंदे सिरताज । दयेच्या सिंधु-माजील जाहाज । सिरी जोतलिंग गरीबनवाज । हर कोणी असेल महंत अन्याई । पाठीसी घातल्या सिपाई । मग कोणाची येवढी पुण्याई । त्याजकडे वक्र दृष्टीने पाही ? प्राप्त कोणाची बोलेल काई ? सहसाही वचनासी न टळती । भारी बुटली तरी पळती परशत्रुची वकले । शरण येऊन द्रव्यासी मुकले । येक वेळ जरि आकाश झुकले । तरी धीर धरा म्हणती ऐकिले । तपोतेज अद्‌भुत फांकले । उत्तम चिन्ह मुळीच वळखले । त्यासारिखे कर-तृत्व देखिले । वाटे दैव विराचे पिकले । सर्व घेऊन आप्तवर्ग संनिध चौकी पहारे । परभारे वर्तती विचारे । लक्षणयुक्त कळा गुण सारे । पूर्ण पुण्य गाठीस वळकट मग नृन्य नसे संपन्न । संपदा धन्य आश्चर्य ज्याचे । सैन्य अन्यथा कदा न वर्ते । अनन्यशरण तयासी मरण पहा न चिंतिति काळत्रयीं । ऐसा कर्ण उदारपणे वाटीतसे सुवर्णराशी । तैसे शुरासी अन्न आणिक प्रावर्ण पुरविती । येथाकाळी शुररूपे वर विला येक मेघ वर्षे ॥ २ ॥

शत्रुशुधी पराक्रम भारी । स्वस्तिक्षेम सहपरिवारी । दौलतराव बाबा अवतारी । श्रीमंत खुप पाहुन अंतरी । चतुर बळिया तात्या पदरी । धोंड्‌बा दादा कारभारी । आनंदमय अवघी सरदारी । जीवबादादा ते रण-भैरी । माधवे रूप विलया बुदरी । श्रीमंतानी आपले स्वकरी । दिली वस्त्रें सर्वांसी केशरी । मोगलावर होऊन तयारी । जे करून समशेर गाजवुन हे येऊन रक्षियले याणी । तृपाकांत मोगल दीनवाणी । वकील पाठउन निर-अभिमानी । शरण येऊन मागितले पाणी । हे ऐकुन बाबासाहेबानी । हा वृत्तांत मग श्रीमंत कानी । परस्परे श्रुत करविला गर्व हरविला शत्रुचा । येजमानानी म्हणती अपूर्व केले । येथुन धारापर्व संपले । हर्षयुक्त चित्ताचे ठाई । पदरी वडिलांची पुण्याई । असता निर्भयपणे सदाहि । दिवस दिवस

राज्याची सवाई । फत्ते लढाई करून वडाई । यश घेउन लवलाही फिरले कोठवर तरी । वर्णावा तेव्हाचा रसभरित उच्छाव ॥ ३ ॥

तपश्चर्येचे बळ उत्कर्ष । पाहुन धनी दौलतराव विशेष मनामधि शत्रु करिती द्वेष । रक्षिता संनिध श्री जगदीश । मागले युद्धी प्रथमारंभी । येश मिळविले खासे साहेबी पोचवून अवघ्याला जरबी । प्रल्हादाप्रति दैत्य कुटुंबी । नारसिंहरूपें स्तंभी प्रकटुनी हिरण्यकश्यप नखी विदारिला भक्त तारिला । जयजयकारे अशा प्रकारे दौलतरायाप्रति परभारे । परस्परे पहातसे र नागिरीनिवासे । दैवदशे मग साह्य होउनिया । गाय करून शत्रुच्या मुखें । मग त्राहे त्राहे वदाविली आक्षरे । वरेपणें जे खरे वर्तती । त्यास धरून स्वकरें मग आपल्या त्वरे कृपाळूपणे जवळ ठेविले । तोषविले अंतरी । आनंदे निरद्वंद्वे रक्षियले पंडुकुमार मुकुंदे । भक्तिसंमंधे स्वानंदे । न करिता उपेक्षा । कौरवास त्या सिक्षा लावुन । स्वसेवकाची तशी अपेक्षा । पुरवुनिया मेळविला नक्षा लक्षामधि । अभिमानि म्हणाविले क्षेमरूप निर्भय भासतो सकळ सैन्यसमुदाव । होनाजी बाळा म्हणे नभातळी हे मुद्रांकित भाव ॥ ४ ॥

– १३ –

# खड्यांच्या लढाईचा पोवाडा

## ( शाहीर कवी जंगू भीम )

सुंदरा म्हणे जिवलगा विनती माझी परिसावी ।। गोष्ट ऐकावी ।। ध्रु ।। बारा वर्षाची उमर माझी जाणी नवतीची कन्या थोराची ।। उसासली जोबन उरस्थल जोडी लिंबाची ।। खोट्या दैवाची ।। नको नको म्हणतां चाकरी धरली शिपायाची ।। कठीण मुलुखाची ।। दूर हिंदुस्थान गुजराथ वाट ती सातपुड्याची ।। घरें भिल्लाचीं ।। हें कसब केलें मृगानें ।। वनीं मोकललीं हरणें ।। तारामती हरिचंद्रानें वनवास पाहिला त्यानें ।। सुंदरा म्हणे ईश्वरा काय तकशीर मजकडून घडली ।। रात्र मला वैऱ्याची गेली ।। सजणावीण माहाल सुना ।। कुठेच करमेना पडली वरमणा ।। फुंदती नार कामिना ।। अन्न भावेना चैन पडेना ।। चार पार रात्रा सखा महालामधिं नाहीं ।। करमत नाहीं ।। १ ।। सुंदरा ।।

नका जाऊं लष्करा चाकरी तुम्ही सोडून द्यावी ।। कशाला व्हावी ।। सवाई माधवराव पाहातां उमर लहानखुर ।। परत बुद्धी फार ।। सवाई माधवराव तात्या बाहिर निघाला ।। मनसोबा केला ।। श्रीमंतांचें मीठ खालें आशीलपणा ना भ्यावें त्याला ।। तवा रावजी काय बोलले आपल्या नारीला ।। जावें पुण्याला ।। त्यावर पडली वेळ सांड पाठविली आम्हांला लखोटा लिवला ।। सखा म्हणे नारोला कांशिगत करावी आतां ।। मला मोठी पडली चिंता ।। पागेचा कोतवाल घोडा भाईर तुम्ही ओढा ।। वाजे चौघडा ।। नारीचा जीव झाला वेडा ।। उदसपरवडा जासुद पुढें धाडा ।। तो मानाजी फांकडा शिपाई बुंदडा ।। जीवाचा केला धडा ।। म्हणावें नि मारावें बोलले त्याचे शिपाई ।। यास सवाई ।। सुंदरा मनजिवलगा विनती माझी परिसावी ।। २ ।। सुंदरा ।।

आम्ही शिपाई श्रीमंताचे ।। तोंड पाहूं आतां झुजाचें ।। आले पतर कीं रायाचें टाकोटाक भेटायाचे ।। कसें राहाणें होईल आमुचें ।। लोक तयार शिवबंदीचे ।। हत्ती सुटले कीं ठाणाचे ।। आगड धोंधों वाजे नवतीचे ।। त्या परभुजी बाणाचे ।। बीन वापू त्या फडक्याचे ।। त्या

परशुराम भाऊची फार हिंमत झुजायाची ।। अशीं नावें परोपरींचीं ।। बोल तमाम उमरावाची ।। एकच उमर दोघांची ।। घेऊं खबर निजाम अल्लीची कुचावरती कुच करूनी जेजूरी पाहिली ।। तयारी मोंगलाची झाली ।। हैदाराबाज दिली सोडुन ।। गेला चालून पाहिन म्हणं पुणं ।। म्होरीचा घाट खालीं उतरून मिळाली सैन ।। मिळाली शाही आणि गणिता नाहीं ।। ३ ।। सुंदरा० ।।

दोन्ही दळ तयार झालें झूज नेमलें ।। पुढें मग कसें झालें ।। हजार लोकांमधिं माईचे पूत किती निवडले आणि चालून पुढें गेले ।। इटेवाले पटेवाले शमलेवाले लटपटले ।। आऊक्ष खुंटलें ।। त्या परशराम-भाऊनें । दिली दऊड गेला चालून ।। दे दे म्हणे हरळी त्यानं ।। आणि भांग फोडिला त्यान ।। जसा व्याघ्र बोले गर्जून ।। झाल्या मेंढ्या रानोरान ।। त्या दौलतराव शिंद्यानें कंपूसाधना केली ।। तिथ एक भली रंजक झडली ।। पाटणकर निंबाळकर आणिक होळकर भले सरदार ।। पुढें झालें घनचक्कर ।। झुजती वीर उडती शिरं लोक बोलती हरहर ।। घायाळ झाले फार ।। ईश्वरा तार हाणावें मारावें बोलती ।। त्याचे शिपाई ।। गडद पाच्छाई ।। सुंदरा० ।। ४ ।।

कानडे नि मराठे मिळाले लोक हराजिनशी ।। आणि रोहिले हबशी ।। गारदी फिरंगी तांबडतोंड शिपायाशीं ।। आणि अर्बुजाशी ।। हसूदखान भले शिपाई लोक राजवनसी ।। एकच मग हल्ला केली मग दिली बत्ती तोफेशीं ।। आणि बाण गगनाशी ।। रणमंडळावर खेळ खेळतो उदार जीवासी ।। घात प्राणासी ।। मोंगलाचा झाला मोड गोष्ट झाली अवघड ।। केली सल्याची गडबड ।। लोकांनीं काढला कड ।। होती खड्यापलीकडे ।। शिवापट्टण मोंगल बेदरास गेला ।। नानानीं भला कावा केला ।। श्रीमंत म्हाराज पेशवे यश आलें त्याला ।। परतुन पुण्यासी गेला ।। नऊ खंडामधिं नांव त्याचें माजूर अवघ्याला ।। यश भगव्याला ।। सरपुरा अजब तऱ्हा जंगू भिमाची न्यारी तऱ्हा ।। कलगी सुंदरा हिरून घेऊं तुरा ।। बाळा पिरू तुझा नोवरा ।। गवंड्याच्या पोरा मारीन पैजारा ।। यंकू न बापू भलेराव शिपाई ।। सखाराम तो नाच नाचतो डफाची घाई ।। मिळाली शाई ।। सुंदरा० ।। ५ ।।

# श्रीरंगपट्टणाची लढाई

## टिपूचा पोवाडा

(शाहीर मल्हारी बाहिरू)

फत्ते की समशेर टोपीवालेके ताले वडे । मारलिया टिपुकी सिरंगपटणपर बहुटे चढे ॥ धृ० ॥

वहुत दिनोका बाहेर कुफर हैदरनाइकने किया । कोडियाळ बंदर-पर जाकर पहिलि लढाई लिया ॥ होते होते झगडा रगडा टोपिवालेने किया । भिडा नगरके किलेसे खुब लढाई करकर हिया ॥ व्हथा हैदरनाईक का वेटा वो आयाजी मिया । सल्ला किया उने टोपीवालेसे मिलकर रह्या ॥ दगाबाज हैदरने करकर दगा जी मिलने आया । मिलनेके वाहाणेसे मोहोवत करके फिरावन भया । कसी तऱ्हा मेरीजान बचावो जबाब अजने कह्या । रखा पीठपर हात जलद मुंबईकू पवचत दिया । उस खातर तलवार कोडि अंग्रजसे हयेदर लढे । मार लिया टिपूकी सुरंग-पटणपर वाहुटे चढे । मार लिया इ० ॥ १ ॥

अपमोतसे हला हुवा हैदरका मुरदा पडा । ऐसी वात दवाकर टिपू रणमें लढने खडा ॥ जेसा शेर सता वेरासो जंगलमें ज्याकर आडा । हला कर कर निसंग होकर खुब लव्हेसे झाडा । बहुत लगी उस दिनसे टोपीवालेका रनखाम गडा । खबर सुनी बाछाने काला आदमी ज्यालम बडा ॥ विलायेतसे फौजा भेजा किया दिलोका धडा । अरबी आर पटणके अंवलमे बहेर वहडते वडा । हुकूम लेकर मेडजसाहेब आया उठाकर भिडा । बंगाला मद्राज मुंबईवाला ज्याकर भिडा । पेशवे न मोगलकू लेकर सात लहडने खडे । मार लिया टिपूके सुरंगपटणपर वाहुटे चढे । मार लिया इ० ॥ २ ॥

मुंबई खातेपरसे मेडजसाहेब चाकर गये । लाख फौज पेशवे की नवाब पच्यास हजार अये । दीड लाख रुपये रोजका करार करकर दिये । चले कूच दरकूच दाखल करनाटकमे हुये । बंगाला मद्राज मुंबईवाला मिलकर रहे । इंग्रजने आपने दमसे टिपुकू जेर किये ॥

हरिपंत तात्याने सला करकर वच्याकर लिये । किया खंड हा मुलुक टिपूने किल्ले मामले दिये । तात्याका सुनकर रख लिया सभी रुकशात भये । पाच वरसकी वात भया वेमान वात ना सये । मार लिया इ० ॥ ३ ॥

जंद्राल डंकिन साहेबका हुकूम लेकर चले । काठहसुर परसे कुडुके घाटपर सब ले अनकर मिले । उस मुकाम लढाई देकर हिमत करकर ढले । मिया पटणसे होकर सुरंगपटणकर ज्याकर हुले । बंगाला मदराज मुंबईवाले जबर भले । नवाब निजामअलीकी फौज जोरमें हुले ( ? ) रामराजा मिला हावर पालेगीर हरमामले । अंग्रजकू सबराजे मिले येकसेयेक अले । लाखोलाख फौज्याकू पैसा देते खजिने कुले । पोहोची आजल टिपूकी रवका लीखा कबूजा टले ॥ घर कैदीखाना मीर सादक भये वेमान फीर पडे ॥ मारलिया इ० ॥ ४ ॥

फिर डंकिन साहेबने लस्कर वहुत रवाना किये । भरा खुप सामान काळी गोरी पलटना लिये । कालि पलटना पिछु रखे गोराने मनसुवे किये । जंद्राल इष्टुर साहेबके सवाई तंबुर झडे ॥ मारलिया घरलिया पटणकु चारो तरफ लस्कर भरा । कालि पलटना पीछेकी । गोरेने मनसवा करा ॥ जब टिपुने पुछे ' मीरसादक ये कैसी तऱ्हा । ' वजिर कहे ' जहापन्हा दिलमे मत करने खतरा ॥ लोकोकू बाहेर निकालो देता हूं रोजमुरा ' । किला खाली किया दगा करनेका मतलब पुरा ॥ टिपुकू महालमे लिज्याकर बासन आगे धरा खाना खावो वेलाशक मैं देखूं उनकू जरा । सफीलउपर जाकर फिराये चादर फत्तुर करा । इशारतकू पोहचे हरिस साहेब बोशाने शिरा ॥ हाला किया उस घडी किल्लेमे जाकर भिडे । मार लिया टिपु इ० ॥ ५ ॥

दिन दुपार बारामें अमलमें देखी जैसी ली घडी जंद्राल हरिस घुसा किल्लेमे फैर झडी ॥ महालों दाखल खबर भई जद लैन सामने भिडी । शानि शिकंदर बाछा देखो हिमत उनकी बडी ॥ महमदका कलमा पढडके खाने समजे अंजल की घडी । मरज्याना बेहत्तर आकल तेजपर मुसीबत पडी स्वार हुये घोडेपर खैचे पट्टा तिसरी चढी । मारे सवपच्यास दल दारगाव भरा दुथडी ॥ लग्या येकदम गोळ्या च्यार ज्यो बिजली कडकडी । गिरी जमीनपर केत खेत बिनापानी

मछली तरफडी । दौलतमे लत दिये खुदाने पैसे पैसे लुढे । मार लिया इ० ॥ ६ ॥

दुसरे दरवाजेसे मीर सादक भागणे लगा । मारा हात चेलेने कहे सबकू किया दगा । भया इधर ना उधर नही आगवत मैं उसकू जगा । जेसा करना वैसा पाना दगाजी किसका सगा ॥ अमल कायम करकर अंग्रज रणमे करते निगा । टिपूका मुरदा देखकर पस्ताने लगा ॥ बुरी भइ ये बात हम ने जाने किदरकू जागा । ज्याहामर्द आजके घडी लगजा किसीकू डगा ॥ रोते टोपीवाले तारा तुटल जोत झगमगा । दिन दुनया सब रोती जब जंगलमे अन्न सिलगों । लालबागमे रखा टिपूकू बांद उसीके चवघडे । मारलिया इ० ॥ ७ ॥

ग्यारा मुकाम बात शनिचरके दिन फत्ते हुअी । आखर चइतका महिना तारीख चवथी या पाचवी ॥ नदी कावेरी बडी टिपूके दुःखसे सुककर गयी । झुटी बात या सची ये परभारे करना सई ॥ हम तो नही देखी आवेसे सुनी बात सो कही । मारे कुटे लुटे बैठे चौकसी भइ ॥ मदराजवालेकू सुरंगपट्टणकी साहेबी दिही । सोई भया जंदराल वहां दुसरेका हुकूम नही ॥ मदराजवाले हरीस साहेबकी सिपारस भई । बंगालेका लार्ड विकीट साहेब सभापर सर हुअी ॥ राहा बताई पाहिली वौ हाटली साहेब फाकडे । मार लिया इ० ॥ ८ ॥

बडा नसीब टोपीवालेका चढता पहेरा बना । रुजु हुये सब लोक भये कुल दंदीदुसमान पना ॥ रूमके बादरछायासे देखो हुआजी भाइपना । वजीर आया मुंबईमे क्या खुपवक्ती देखना ॥ अजब राज अंगरजका सब रयतकू खुसी रखना । कोट किल्ला अनमोल जोर टापू ममईका बना ॥ मंबईके लोकोके तारीफ का हाल का कहीना । कुरान किताब पुराण सुनकर करते दाण दक्षणा ॥ गोविंदराव पीर मुरशतके हम चले गरीब अदना । मल्हारी बाहिरुकू पच्छाने दखुन, कोकन, पुना ॥ ख्याल बनाकर गुणी बनाकर अर्ज करणे के खातर खडे । मार लिया इ० ॥ ९ ॥

# यशवंतराव होळकराचा पोवाडा

( शाहीर हरीबाळा )

वाहवाजी यशवंतराव बहादुर सवाई डंका बना दिया । मंदोसरसे मारा फिरंगी जा जमुनाके पार किया ॥ ध्रु० ॥

कुच किया जब मंदौसरसे स्वारी चली महाराजकी । चमला नदी आगये महाराज छाती फुटी फिरंगोकी ॥ मकुंदरेका पकडा रस्ता भागी फौज फिरंगोकी ।। ऊजाड खेडा तहां एक नाला रिजमंट गोरे पुर्योंकी । महाराजका शिपाइ बंगश खूब किया बर नक्षेका ॥ जाकर काटे रिजमंट गोरे टोपिया पानीमें बहती । चौमासेके दिन है यारों खूब घटा बादल छाई । चमाचम जब बिजली चमके होश फिरंगी भूल गया । मंदोसरसे मारा फिरंगी जा जमुना के पार किया ॥ १ ॥

मुकुंदरेसे भागा फिरंगी जालमसिंगसे आन मिला । किसी तरहसे बचाव हमको महाराजका टिका गला ॥ जालम कहता सुनो फिरगी अखंड जाती है चमला । मुकुंदरेपर आगये महाराज अंग्रेजोकी फौज भुला ॥ तब कोटेको दिया छोडके पाटनके रस्ते चला । हाथीउप्पर लंगर डाला जैसा तैसा पार हुवा ॥ कइ एक डुब गये कई सयेक बह गये तोफखाना भी डुब गया । मंदोसरसे मारा फिरंगी जा जमुनाके पार किया ॥ २ ॥

महाराजको खबरा पोहची बनारसमे फिरंगी पडा । महाराजकी हुई तयारी महाराज है रणशूर गाढा ॥ बडा कंपू दिया अघाडी मोरेसे मोहरा भिडा । चारो तरफसे चल रहि तोफे गुब्बारेका मार पडा ॥ महाराजने कर दिया हल्ला जा बकरीमें नाहर पडा । गपागप जब भाले मारे फिरंगियोका सिर फोडा ॥ ऐली तरफसे गारत किया पैलीपार जा भगा दिया । आगये महाराज पड गई दहशत कलकत्ता तों लंबा रहा ॥ मंदोसरसे मारा फिरंगी जा जमुनाके पार किया ॥ ३ ॥

लेक साहेबने चिठ्ठी भेजी जा पँहुची कलकत्तेको । हलकारेने बताइ चिठ्ठी लगे अलम सब देखनेको ॥ सभी कंपन्या मिलकर भाई

लगे वाचने चिठ्ठीको । लेक साहेबने भला न किया लगी कंपन्या रोनेको ॥ महाराजके सवाइ झंडे ऊडे मथुरा वृंदावनको ॥ आया मीरखां नवाब बहादुर सभी पिंढारा साथ लिया । शहर फरक्काबाद कानपुर मैनपुरीको फेक दिया ॥ मंदोसरसे मारा फिरंगी जा जमुनाके पार किया ॥ ४ ॥

फरासीसका गुलाम अंगरेज फिरंगी बनकर आया । शहर फरूका-बाद उपर महाराजा को दगा दिया ॥ उस राजाने की कपटाई महाराजसे मिला रहा । वीशक्करकी दी मिजवानी तमाम लष्कर खुषी किया ॥ महाराजको कपडे देकर बडाहि उसने विलास किया । राजा फिरंगी लेक पिछलीपर छापा लाया । दनादन जब गोले मारे मेहनगरमे बरस रहा ॥ महाराज यशवंतरावने वहांभी भाला अपना सही किया । मंदोरससे मारा फिरंगी जा जमुनाके पार किया ॥ ५ ॥

फिरंगीने टोपी उठाके उस्से राजासे क्या कहा । बहोत तडाके लगाये हमको महाराजने हटा दिया ॥ करनाटकमे तंबुर बाजे सुरंपटका ठाणा लिया । हैदराबादपर चढाइ करके नबाबकू कायल किया ॥ जब सिंदेसे हुई लढाई झंडा अशेरको लगा दिया । फिरंगी अपने दिलमे कहता महाराजने खूप किया । चार खुंटमे हो गया नक्षा मारा फिरंगी हटा दिया भाई भगा दिया ॥ मंदोसरसे मारा फिरंगी जा जमुनाके पार किया ॥ ६ ॥

तीन पहरपर चार घडीतक हल्ला किया फिरंगियोने । जो किल्लेमें चिपटे गोरे निशान गाडा जा ऊनने ॥ फत्तेबुर्जपर चढे फिरंगी तब लग गये तंबूर बजने ॥ महाराज है रेवार्डीमें खबरा दिन्ही जाटोने । उस हल्लेमे मर गये गोरे खंदक सारा भर गया । लेक साहेबने छाती कुटी कलकत्ता अब लंबा रहा ॥ मंदोसरसे मारा फिरंगी जा जमुनाके पार किया ॥ ७ ॥

भरतपूरकी मार लढाई फिर वहांसे चल दिया । हिंदुस्थान पंजाब पार कर लाहोरवाला रणजित राजा संग फौज दो लाख लिया । महाराजको मिलनेखातर अमृतसरपर चला आया ॥ जब दोनोका मिलाफ हुवा तब फिरंगी घबराया । यहां लढनेका नही ठिकाना कलकत्ता तो लंबा रहा ॥ हमने हारा तुमने जीता जो हुवा सो भला हुवा । सवाई खंडेराव देवकी महाराजपर है छाया । हरी बाळानें गाया पवाडा तमाम लष्कर खूष किया । भला पोषाख दिया । मंदोसरसे मारा फिरंगी जा जमुनाके पार किया ॥ ८ ॥

# दुसरे बाजीरावांचा पोवाडा

( शाहीर होनाजी बाळ )

श्रीमंत बाजीराव प्रभूचे पुण्य आगळे दिसे जिवनी लवणापरी परस्पर शत्रु विराले तसे ॥ धृ ॥

राव दादा कैलासवासिचे पुण्य उदया आले त्रिवर्ग राघववंशी सुपुत्र ते स्वराज्य पावले ॥ नाना रीती बहुतानि विरोधे अति उपाय योजिले । न करिताच वध हाते तयासी न मारिता मारिले ॥ अरुणोदय जालिया नभी बाळार्क तेज पसरले । सवाई बाजीराव धर्मरूप गादीवर बैसले । ऐश्वर्यकळा साजती । पाहुन शत्रु लाजती । जयवाद्ये नित्य वाजती । धार्मिक नीती गाजते कीर्ती भुमंडळात विलसे ॥ जिवनी लवणा० ॥ १ ॥

परम गहन अति सुशिल सत्यउपाय सत्यअंतरी सूर्यवंशीचा राव जसा हरिचंद्र अयोध्या पुरी । क्षमाशांतिचा सिंधु सदा निःकपट सदा हृदय मंदिरी । प्राणभ्रमर भावार्थ कमळिचा अति गुंजारव करी । या चिन्ही भूप विख्यात अँश ईश्वरी । ज्याचे तपसामर्थ्ये वितळती शत्रू अभ्रापरी । गजचक्रामधि एकसरें । केसरी येकला शिरे नेत भाग आपला हरि । तेविच आर्धातरे (?) । अरिचक्रात विजयी पहा कसे । जिवनी लवणा० ॥ २ ॥

आज मर्जि कोणची उद्याचा बेत नेम मसलती शेवकजन संनिध परंतु हे कोणीच नेणती । कळो न द्यावे कोणा येकांतिच्या गुजगुह्याप्रती । यास्तव ते नरपाल विच्यारी गुप्तरुपे बैसती । जे जनात बोलणे तेच प्रकटात करुनि दाविती । हे मुख्य प्रभुचें लक्षण प्रत्यक्ष व्यासवचन भारती । म्हणउन युक्तीने अशा । नृप जिंकिती चारी दिशा । निर्दोष जोडिती यशा । प्रथमारंभी तशाला म्हणे कार्यसिद्धि होतसे ॥ जिवनी लवणा० ॥ ३ ॥

सांबकृपा परिपूर्ण पूर्वपुण्याइ बहुत चांगली। स्वजनजनाची बरवी केवळ इच्छा फळासी आली ॥ निराधार निरपंजल येथे कैसी ( गत ) जाहली। गत वस्तु सायास न करिता ज्याची त्यास लाभली ॥ मोडूनि त्रिंबकचाप रामचंद्रे जानकी पर्णिली। दुर्धर पण जनकाचा अद्‌भुत ख्याति करून दाविली। भेदोन यंत्र तें आधी। पांचाळमंडपामधी। पार्थे जिंकिली द्रौपदी। धणी प्रतापी राजपदी शोभले सुशोभित तसे। होनाजी बाळा म्हणे प्रजेच्या आनंद हृदयी असे ॥ ४ ॥

---

# दुसऱ्या बाजीरावांचा पोवाडा

( शाहीर प्रभाकर )

धनी श्रीमंत साहेब गेले राज्य- सोडुनिया। कधीं दृष्टी फिरून पडतील येश साधुनिया ॥ धृ ॥

प्रभू बाजीराव रघुनाथ पूर्ण दैवाचे। नाहि निवड कोणती भक्त सर्व देवांचे ॥ जाणुन पुढिल घटितार्थ कपट डावांचे ॥ दिले बंदोबस्त परभारे करून भावांचे ॥ होते जे जे जुने सरदार थोर नावाचे। तितुक्यासि पाश घालून अचुक सांवाचे। संपूर्ण आणुन आहारात टाकिले कुजत। नवे नवे कोंब पाहून घातले रुजत। जी बाणि वदे ती मान्य न घेती हुजत। आनंद सदा सदनीं त्रिकाळ सुख सोहाळे। अपाप श्रम हरती अपूर्व अन्नाचे ज्यास होति डोहाळे। तयांचे जिव मुरती पात्र पाहुन दान करती कनक कोहाळे द्रव्य देऊन वरती. केली कीर्त बहुत धर्माची ग्रंथ निवडूनी मिळविले विप्र वेदांती देश धुंडुनिया ॥ १ ॥

विस्तीर्ण वाडे ठाइ ठाइ महाल आरशांचे। भवताले उभे सरदार देशोदेशांचे ॥ विनविता लवुन होती शब्द नवया नवशाचे ॥ बोलती मधुर भालदार किती तमाशांचे ॥ चौघडे झडे वाजंत्रि वाजे घडशांचे ॥ मसनद गादीवर नरेंद्र चौफेर विजल्या ॥ कुणि रत्नखचित कुणि कुणी कनकांबरे सजल्या ॥ किती धुंद होउन बेलाशक सन्मुख धजल्या ॥ आळविती राग कसबी उदास सारंग मधुर ॥ पुढे पूर्वी नित्य गीत गोष्टी नविन नित रंग शान सकल बरवी कलित हे जाहले केवळ रमारंग कोण हुकुम फिरवी ॥ सर्वांत श्रेष्ठ अकलेने मांड मांडुनिया। आणिले मदत इंग्रजास मुळ धाडुनिया ॥ २ ॥

जशि विवशी रामअवतारसमयीं अनुसरली। तशि कुबुद्ध त्रिंबकजीच्या हृदयि संचरली ॥ भलतीच गोष्ट पंढरपुरांत आचरली। त्या दिसापसुन सर्वांची हिमत हरली ॥ चहूकडून अशि कशी कालदशा

तरि फिरली ॥ त्रिंबकजी होता एक खांब दौलतीमधला । हकनाक धन्यानी भिउन हती काय दिधला ॥ अपराधि खरा ठरवून आपण नाहिं वधिला ॥ गफलतिने घर बसले श्रीमंतरायाचे नवल कसे घडले ॥ शौर्य धैर्य खचले सकळ शिपायांचे म्हणुन कडे पडले ॥ आजच पुण्य सरले बहुत उपायांचे देवास आवडले ॥ शिड चढले टोपिवाल्यांचे भांड भांडुनिया ॥ वळखिली पोची पतपात प्रथम पाडुनिया ॥ ३ ॥

---

# खडकीची लढाई

## ( शाहीर दादू गोपाळ )

लाख फौजेका जेमाव करके वेत ठरवाया। खतलके दिन भई लडाई दिन दुसरा आया ॥ गारवीरवर पडी छावणी तंबुर वजवाया। दोनु तरफसे वही तहकुवी, हलकारा आया ॥ चार दिनेकी ठेप करके मसलत लढवाया। घोडनदीसे दोन पलटणे जलदी मंगवाया। जलद लंगडा साहेब आया उन्हे तयारी किया। शादावळके टेकडीउपर तोफा चढवाया ॥ पडा फुकारा शहरके अंदर रहेत ववराई राव वाजिपर वखत पडा अव सुनलेना भाई ॥ शाके १७३९ हो गई लढाई। रावबाजीवर वखत पडा इ० ॥ १ ॥

मिरजीकरकू जलदी बुलाना पूनेकु आणा। लिपाणकरकू पत्र भेजे छोडो ठिकाणा। विंचूरकर ढमढेरे कहे येकनेगो मिल जाना। बालासाहेब रास्तेके कहे रनशुर खडे रहना। नारू विठ्ठने वाला वाले आवा जलदी करना वस करना आव तुमारी मसलत घेर लिये पूना। मलकीन सायब आकेर बोले अब मत बात करना। आगो चवताईको वचन दियोसे उस नही टळना। इतने उपर मरजी तुमारी कर जा लढाई ॥ २ ॥

वापूसाहेब गोखले कहे उदर आपखडे। लग दिये सरबत्ती वेटकू लूट लिया पुरे। आवा पुरंदरे रणशूर बहाद्दर तलवारोके पुरे। बलभीम बलभीम लियोसे एकच गरदी किये। अरब गोसावी खोलि सामने पहिले खुकुमर। परतीके पास आकर तोफा सुरू किये। निकल गये रावबाजी कन्हयो छोड दिया डेरे। जलद कुंपिन बहादूरकी फिरंगी धुवोही राव वाजिपर० ॥ ३ ॥

होनेकी सो हो गई यारो दिलमे समज करना। निकल गये रावबाजी कबज्जा छोड दिया पूना। बारा वरस हो गया रोशन करती रानी महुना ( मेना )। कर दैवकी कद आलासा मिराशा मना। कवि दादू गोपाळ खुदाके उपर वयाज करना। विठ्ठल मोरू कहे शत्रुका नाक काट लेना। अली चालिस गावे आ रे बाशे सवाई राव वाजिपर० ॥ ४ ॥

---

— ११ —

# खडकी अष्टीच्या लढाईचा पोवाडा

दखनच्या पेशव्यास थाला नव्हता कधि वाई ॥ कबूल केली चौथाई का ग दिली नाहीं ॥ ध्रुवपद ॥

त्रिंबकजी डेंगळे विंचुरकर रघुनाथ पंची ॥ मोरू दिक्षित पटवर्धन फौज घोरपड्याची ॥ आठीकोट फौजा मिळाली तऱ्हा लष्कराची ॥ कौरवाचें दळ गणती नाहीं फौजेची ॥ जसा रणामधिं हत्ती खंदळे गोखल्याची मात ॥ एकच गर्दी जाहाली धुळी गेली अस्मानांत ॥ बापू गोखले शूर मर्द दडेना रणांत ॥ खडकीच्या मेदानीं घेरून बहु केली मात ॥ गंगाधरशास्त्री मारिला पंढरपुरांत ॥ चोर बातमी गेली इंग्रजांच्या घरांत ॥ तवांपासूनयां कळ नेमिली घोटाळा दुनयांत ॥ १ ॥ क० ॥

इंग्रजांनीं राज्य घेतलें बुडविली पेशवाई ॥ भले भले सरदार गोखले गेले कुण्या ठाई ॥ नळ आणिले बांधून बागेमधिं केली चतुराई ॥ तऱ्हेतऱ्हेचीं झाडें सुरूचीं बागे बागशाई ॥ जिनजिनसांची फळें पिकली अंबराई ॥ २ ॥ क० ॥

वेलबागेमधिं येवून पाहा बाहवा विष्णूची ॥ जरी बादली गाठी देवाला कंठी मोत्यांची ॥ श्रीमंतानें हौस केली ही पर्वतीची ॥ अन्नछत्र नेहमीं पूजा ब्राह्मणाची ॥ ठाई ठाई कीर्तन मांडिलें दाटी संतांची ॥ शुक्रवारामधिं जाऊन पाहावी गुजरी मौजेची ॥ श्रीमंतांचा वाडा पाहावा शोभा आयन्यांची ॥ हारतुरे गजरे गुंफुनियां करूं चतुराई ॥ श्रीमंत म्हाराज दखणेमधिं हाई ॥ ३ ॥ कबूल० ॥

———

# दुसऱ्या बाजीरावांचा पोवाडा

## ( शाहीर रामजोशी )

प्राकृत म्हणती बाबासाहेब बाजिराव पेशव्या । असो परिशुभ कर्मानि लेशव्या ॥ ध्रु ॥

दाता शूर गुणज्ञ दयार्णव सत्यशील त्यापरी । नृपोत्तम कैचा पृथ्वीवरी । सदैव धर्मसमृद्धि प्रतियुगी जो खलजन संहरी । तोचि हा जाणा हर कीं हरी । मनुवंशामध्ये अवतरला परी तेज अमानुष धरी । पहाहो ऐका याची परी । रम्य वसालि या राजऋषीची पुण्यवान ही पुरी । करी ती स्वर्गश्रीची सरी । येथे नाना भोग भोगितो जसा जनक मंदिरी । आपुल्या अलिप्त अभ्यंतरी । खंड दंड कधि घात-पात जो युद्ध विरुद्ध न करी । वेगळ राहुनि दुरचे दुरी । देति पाद आसमुद्र (द्र ?) ज्याचे सेवक रिपुच्या शिरीं । जयाचे तेज सागरोदरी । ज्याची सत्ता धरुनि वागती लोक कलकत्तावरी । फिरंगी कर ताडुन घे उरीं । आपण कोठे न हालता हें यश मनुजाचे करीं । कसें हो धुंडत येतें घरीं । यासाठीं ही तनु रायाची भगवदंश भूवरीं । विचारुनि शोध करा अंतरीं (॥ चाल ॥) हा प्रजापालनीं दाशरथी नृप म्हणा । परि तोहि अयोध्या सोडुनि गेला रणा । निजकरें साधिले यश मारुनि रावणा । हा पदींच राहुनि अरिचा मद करि उणा । प्रभु मनुज नव्हे हो अवतारांमधें गणा । याहुनि पुढति कविराय याच्या वर्णुनि कीर्ति नव्या । तोषविल नृप मुकुटांच्या रव्या ॥ १ ॥ ध्रु० ॥ दाता भगवद्भक्त शूर हा गुणत्रयें शोभला । धुंडिता यास मिळेना तुला । मग म्यां भारतपुरुष तिघे त्या-मार्जि भीष्म योजिला । परंतु न याचे उपमे दिला । शूर भागवत खरा न दाता म्हणवुन म्यां वर्जिला । दुजा मग कर्ण मनीं आणला । तो तरि दाता रणपंडित परी भक्तिगुणे वाळिला । असा तो कर्णहि परि टाकिला । तिसरा याच्या उपमेकरितां धर्मराज पाहिला । गुणद्वययुत परि वीर्यें

ढिला । तिही गुणाने तिग्रे गुणे हा त्रिगुणात्मक येकला । मिळेना याची उपमा मला । कामधेनु चिंतामणि कल्पद्रुमगण देतो फला । खरा परि जरि आधी याचिला । दीनबंधु हा बाबासाहेब दैवाने बोळला । पाहिजे मग घ्या संपत्तीला । अचाट देणें याचे थोडे म्हणता बहु लाभला । जसा श्रीसांबाचि उपमन्युला । तेज पाहतां दादासाहेब याणे आराधिला । रविच हा तदुदरिं जन्मा अला (॥ चाल० ॥) हा जगद्वंद्य आनंदवल्लिचा तुरा । कोणता शुभेच्छु न म्हणेल मस्तकिं धरा । या अवतंसाने शोभविली हे धरा । युक्तिनें रक्षुनि जन रिपु केले चुरा । हा सुदैवशाली नृप मसलतिचा पुरा । गेले यासी विषम करुनि जे त्यासी देतो शिव्या । तयांच्या स्त्रिया फिरतिल नागव्या ॥ २ ॥

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७९,६०९ वि: काव्य
क्रमांक २०३१ नों: दि: ३०।३।७९



## दुसऱ्या बाजीरावांचा पोवाडा

( शाहीर फंदमूल )

शाल्योदन मिष्टान्न भोगितां सवाशेर याचा सौता ॥ चोविस वर्षे चैन भोगिली राज्यक्रांति जाणुन नवता ॥ ध्रुवपद ॥

उंच्या केशरी टिळा कस्तुरी कमालखानी हारगजरे ॥ गहिनाजी वहिणाजी अक्षइ जवळ पालखिच्या हुजरे ॥ जुनी माणसें तीं कणसाला महाग त्यांची गैर बुजरे ॥ चार चट्टारी भरो हालके घे जाणुन अलवत मुजरे ॥ सुंदर स्त्री दुसऱ्याची तिसराच दे बैल जुंपून औता शा० ॥ १ ॥

जे नीच कर्मी लैशी गुर्मी कुदुंर दाखल नजराणा ॥ प्रभू फार संतोष न किमपि दोष न जाई जवळ जाणा ॥ अवश्य घडवी अडवी तिडवी चार प्रहर पक्या ताणा ॥ बाजीराय दौलतीस अपाय धक्का म्हणत होते नाना ( फडणिस ) ॥ खेळ करुन उफराटा वरवंटा पाटा रयतेच्या भवता ॥ शा० ॥ २ ॥

कुलकल्ला त्रिंबकजी डेंगुळ अगदिच राहिले दीड वोट ॥ पंढरपुरिं महाद्वारीं शास्त्री पार केले कर्म चखोट ॥ चहूंकून इचकोचा तोबा हाय सुकून गेले होट ॥ आळ येतां चांडाळगडावर पदरिं काय पडला थोट ॥ सर्वांची रग जिरली म्हणून तळिं भरला अला दिप मालवता ॥ फंदि-मूल म्हणे व्यर्थ वळें कां गादि पुण्याची घालवतां ॥ शा० ॥ ३ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१७५४१

# दुसऱ्या बाजीरावांचा पोवाडा

( शाहीर गजानन )

मुनिव्यासे वर्णिली भारती जशि कर्णाची ख्यात। तसे पुण्यशिळ कलीमधे या बाबासाहेब विख्यात ॥ ध्रु ॥

( चाल ) धन्य ब्रह्माने मूर्त घडली। मूस हे सौष्ठवी उघडली। म्हणउन दिव्य प्रभा पडली। येकचित्ती सांग घडली। धन्य ब्रह्माने ( चाल ) नेत्र जयाचे केवळ कंजन। खंजनवत डोळे भरि अंजन। शब्द सुरंजित मनोहरंजन। ऐकताचि सहजी मनरंजन। तडी विप्र तापसी निरंजन। ज्याचे कृपालोके दुःखभंजन। दरिद्रसिंधूपार गुणी जन ॥ ( चाल ) ॥ यापूर्वीचे होउन गेले केक मागे श्रीमंत ॥ धर्मवान दातार दुसरा न दिसेहो अचळवंत मुनिव्यासे० ॥ १ ॥

काहि येक पूर्वि इच्छित होते अमृतराव धणी असावे। येकछत्री चालेल राष्ट्र हें राज्यासनि तरि बसावे। ( चाल ) असी केकानी बुद्धी धरली ती ईश्वरें पुरविली। पदरिची पुण्यगांठ सरली दोपाची मात्र उरली असी केकानी ( चाल ) अमृतरावजी अवले। येउन पुणियाभवते भवले। सर्व रयतेला अनुभविले। ती ही ऐका कौतुकनवलें। गवले ते सहजी नागवले। कुरघोडीखाली भागवले। पाहुन अपघातानें लवले। किति जिनगाणीतुन घालविले। विप्रांना यवनी कालवले। अन्न मिळेना खाउनि कवले। जिव वाचविले। रोज मजुरि घेणारे चवले। तोहि खाटमारी सांच-विले। धुंदिमधे कैफाने चवले। लहान मोठेहि आणविले। खणतीने वाडे खाणविलें। नाहक गरिबाना ताणवले। चाप लाविता चर्चर लवले। तप्त तव्यावर ते लोळविले। जंबूदाच्या कडकयाखाली यमधार्मा बोळविले। जार स्त्रियाही कंपू बांधिले ( चाल ) अनाचार बहु करू लागली जो न कराया तो रयत। म्हणुन जनीं शासनार्थ जाला क्षय संवत्सर हा प्राप्त ॥ मुनि व्यासे वर्णिली० ॥ २ ॥

मनस्वि वैदा करुनि होळकर मनि होउन गेला शांत ॥ अज्ञोनि कां नच्च येत देवा बाबासाहेब श्रीमंत ॥ ( चाल ) गेलि आमुची अहंता। कारे न पवसी अनंता। ठेविला चरणी तुझे माथा। नको अंत पाहू आता ( चाल ) हें रइतेचे ऐकुन स्फुंदन। आले पुण्यास दादांचे नंदन। बाजिराव प्रभू योग्यभिवंदन। जया सदा अरुढाया स्यंदन। ते क्षणिं मुक्त करविले बंधन। रयतेला करणारे मुंडण। वाडे मोडुन केली विंधन। त्या नष्टाला घालित कुंदन। जेवि पूर्वी दैत्याचे कंदन। करी हरी नंदाचा नंदन। धुंदिमधे जे झाले तुंदन। त्याचे घरादाराचे चंदन। दाखविले गड चंदनवंदन। रयत आनंदे करि पदवंदन। रस्तोरस्ती द्वाहि फिरविली अनंद झाला नगरांत। गजाननाचे छंद बरे करिवंद आणावे ध्यानात।। मुनिव्यासे वर्णिली० ॥ ३ ॥

—

# भरतपुरच्या लढाईचा पोवाडा

( शाहीर अली फकीर )

भरतपुरावर लढाई झाली ऐका जाटाची ॥ इंग्रजाची ॥ ध्रुवपद ॥ उज्जनीवरता तळ पडला त्या इंग्रजाचा ॥ टोपीवाल्याचा ॥ करूनि दिले झेंडे यावराव मुलूख केला जेर ॥ चालला म्होर ॥ सुरतशिंग राजाचा पुत्र धन्य त्या मर्दाची ॥ लढाई त्याची ॥ घोड्यावरनें तोफासंगें लईनं बरोबर ॥ तुरूंग्यास्वार ॥ भरतपुरावर लढाई झाली ऐका जाटाची ॥ इंग्रजाची ॥ १ ॥

गडइंग्लजचा किल्ला अवघड बडे ठाणेदार ॥ वढीवले शाहार ॥ ढिग ढिग ढिग ढिग उपाय केला ॥ परंतु किल्ला नाहीं आला ॥ पाणी खंदकाला ॥ सवालाख तोफेचा किल्याला वेढा चौफेर वासिवला ॥ पाण्यांतला किल्ला झोंका घेईल मुंबईवाला ॥ त्यासी तयाला ॥ राव बुरुजाने तोफ डागली तंबूरवाल्याला ॥ ठार जाग्याला ॥ २ ॥ भ० ॥

अकलखोपचा राजा विनत्या करी इंग्रजाला ॥ टोपीवाल्याला ॥ नका करूं दंगा खंडणी देतो तुम्हाला ॥ ऐसें बोलला ॥ सवालाख घोडाही जमला भरतपुरावर ॥ तुटती तार ॥ परतुनी दिल्या ढाला ॥ ऐका खुशाल लोकाला ॥ भरतपूरवाला ॥ ३ ॥ भरत ० ॥

गाढव कुत्रीं दोन मेलीं वा त्या ठायाला ॥ बातमी त्याला ॥ गोऱ्याचीं दोन पलटणें लावलीं अघाडीला ॥ चढीवला हल्ला ॥ दोवे गोरे मिळूनिशानें एकच वायली ॥ आग लागली ॥ घोड्यावरनें खालीं उतरून टोपी आपटली ॥ क्रोध चढला ॥ दुध पेढ्याची मिठाई राजा वांटी लोकाला ॥ शिवबंदीला ॥ शाईर अली फकीर पोवाडा करूनशान गेला ॥ घ्यावा दाखला ॥ भर० ॥ ४ ॥

---

# बापू गोखल्यांचा काळे नानांचा पोवाडा

( शाहीर नाना दाते )

धन्य बापु गोखले जयांचे पदरीं शहाणे बिधनाना । परंतु त्यांतिल येकतारि खुब मर्जी बहार काळेनाना ॥ धृ. ॥

गोखल्यांची प्रतिनिधीवर पुण्याहुन स्वारी गेली । कुरल्याचे मुक्कामी लढाई उभयतासि तुंबळ झाली ॥ ते समई तरवार करून नानाहीं कोठी वळिवली । यत्न राहिला शत्रुफौज टकमक पाहो लागली ॥ ( चाल ) जाला मनोमयाचा भंग । उतरला सहज मुखीचा रंग । पारध्यापाशि गुंतला कुरंग । ईश्वरा दे स्वपदाचा संग । सोडवी दुर्धर हा प्रसंग । ( चाल ) ( आर्या ) काहिल करूनि ते क्षणि केले तेथेंचि कैद पंतासी । यऊन पुण्यास हर्षे कथिला वृत्तांत तो श्रीमंतासी ॥ १ ॥

( चाल ) तें समई खाशाही केली बापूंची प्रार्थना । परोपरीची कोणही ऐकली तें कवणा वर्णवेना ॥ धन्यबापू ॥ २ ॥

पुढें अवाई दाट ऐकिली मुलूख लुटिला भिल्लांनीं । खाशापासी बापु बोलिले क्षणांत आणू हिल्लयानी ॥ याचा बंदोबस्त करा जा येकंदर आज्ञा झाली । या कामावर रवानगी मग बिसाजीपंताची केली ॥ ( चाल ) जिकडे तिकडे भिल्ल माजले । दुनियेचे वाटोळे केलें । शूद्र ब्राह्मणा न बोळखिले । मार्गी लुटिले आले गेले । दाद न लागे मधेंचि मेले ( चाल-आर्या ) पूर्वि जसे दिग्गज रिपु वधिले शिबिराय चक्रवर्तीने । या समई दुर्जन ते नानाहीं मारिले बशर्तीने ॥ १ ॥

( चाल ) बळवंतराव पंताचे फडणिस दुसरे वर्षी पुन्हां । घेउन आले गोखल्यास कीं धरून देतो यजमाना ॥ धन्य बापू गोखले ॥ २ ॥

यांची त्यांची व्हावि लढाई न कळत तेथुन परभारी । कूच करूनिया कोनगावचे मुक्कामास केली स्वारी ॥ पंत निघाले कऱ्हाडातुनी

आले कोनगावासी । वटका च्यार लढाई होता जहरगास्त केले यासी ॥ ( चाल ) विसरले शत्रु हराचा तर्क । हीन प्रारब्धे केले गर्क । पोळले अंतर्गत संपर्क । गोखली फौजा करिती हर्ख । काढिले स्थळोस्थळीचे दर्क ( आर्या ) श्रीमंत प्रतिनिधिच्या ठाण्याठाण्यास ठेविले अपले । ऐसे पाहुन त्याच्या अंतर्गत वाण जाउनि खुपले ( चाल ) पंत पुण्यासी नेउन केले स्वकैदेत रक्षणा । मसुर सुभा देऊन काळ्यांची केली तिथें स्थापना ॥ धन्य बापू ॥ ३ ॥

प्रतीनिधीचे राघो शंकर आणिक मुच्छद्दी मिळाले । मसुरेवरती लढाई देऊन अपेश घेउन पळाले ॥ यजमानाचे नांव रक्षिले शूर म्हणुन झाला डंका । समशेरीची वशर्त केली सोडुन मरणाची शंका ॥ ( चाल ) न चले शत्रुबळाचा फंद । केला ये रीतीचा बंद । झाला रयतेसी आनंद । जोडिला गजाननाने छंद । ( आर्या ) किल्ला वसंत बापू कृष्णातीरी जधि आले । ते समई नानावर मर्जिवहर अति प्रसन्न झाले ॥ १ ॥

( चाल ) प्रतीपदेच्या दिवशी दिधले अलंकार भूषणा । अबदागिर हय नानासि दिला बहु आनंद झाला जना ॥ धन्य बापु ॥ ४ ॥

— २५ —

# बचाजी जिवाजी वापटाचा पोवाडा

( शाहीर रामराव हडप )

धीर उदार वीर गुणगंभीर राव बचाजी हे । वापट उपनामांचे सुभेगिरी ज्याला शोभताहे ॥ ध्रु० ॥ देवदुर्ग तालुका सालसीमाजी किले चार ॥ येखत्यार धण्याचे गंगाधरपंत सुभेदार ॥ कोटकामत्यामध्यें अमल गर्जत असे थरार ॥ चोर चहाड दांडगा नावडे नजरेसमोर ॥ पाहा सलावत केसी सिपाई लोक कैदवार ॥ महालच्या महालांत अंमल बसविला चमत्कार ॥ ते दरखदार सरदार धाकती फार ॥ तसे मर्जी पाहुनी चालती जमीदार ॥ रयतेच्या ठायीं वर्ते करुणा अपार ॥ कृपा श्री देवीची त्यांचीहि निष्ठा तशी पाहे ॥ भाव जयाचा जैसा तयाला तैसी देत आहे ॥ १ ॥

दखलगिरी अमलाची पुर्णेहुनि खाले आल्यावर ॥ आली वातमी गगनगडाला स्वारी तयार ॥ चालू अमलामधें प्रजेवर मांडिला कहर ॥ धरून नेले गावणगे खंड केले मकर ॥ आले कागदी सुभा लोक नेमिले खबरदार ॥ स्वारी नांदगांवात जमाव झाला येक हजार ॥ झाली वाघेरीला येक लढाई भडमार ॥ मोठा कडाका जाला हातघाई तीन वार ॥ गनीमाचे लोकांना नास झाला बहु फार ॥ दिल्हे संचारें येश किर्तीची डंका वाजताहे ॥ आले वकील नांदगावात स्वारीची फत्ते झाली पाहे ॥ २ ॥

वृत्ति पाहता केवळ सौम्याचि भोळा शंकर ॥ निकटवर्ति ते मर्जि न जाणति येत तिरस्कार ॥ हौसदार सरदार नजर नाहीं पैशावर फार ॥ आवड कीर्तिची स्वारी चालते जलद फार ॥ जन्मार्जित सुकृत हे ज्याचे भोगि निरंतर ॥ दोन पालख्या अमल सिक्याचा हुकमी कारभार ॥ नित्य नवा पोषाख रंगी गुलदार ॥ पाईजामा पाई भडक लाल डुलदार ॥ शोभे केगदीचा तुरा वहुत गुलजार ॥ नित्य स्वारी देवीच्या

दर्शनी प्रीति अती आहे ॥ मिरवें तावा अमीरी दीन जना कृपावंत पाहे ॥ ३ ॥

वसका सदरेमध्यें डावे बाजूसी लोक सरदार ॥ पुढें दप्तर फडणीसाचे त्याचे बाजूला जमीदार ॥ दिवाण नाना काळे सन्निध नाहीं दुसरा विचार ॥ केवळ विश्वासाचें घर ते, उभयपक्षीं निर्धार ॥ भाऊ बापू आवडीचे पुत्र लाडके सुभेदार ॥ गादीवर बैसका, तडक होताहे कारभार ॥ पुढें मुजरा बोलत आहे छडीदार ॥ तसे थाट बंदुखी उभे खासबारदार ॥ नौबत निशाणें गजर नाहीं सुमार ॥ बोले रामराव हडप पहा ईश्वरी दत्त आहे ॥ स्वाम कृपाळू झाल्यावरते न्यून काय आहे ? ॥ ४ ॥

# बचाजी जिवाजी बापटाचा पोवाडा

( शाहिर गोपाळ टोळोजी )

अर्वाच खेंदडा बहुत बापट बच्या। त्याच्या वर्तणुकेच्या रीती श्रवण करि कच्या ॥ धृ. ॥

त्या जीऊ भटाला सात पुत्र नेमस्त। त्यामध्यें चवथा नष्ट अति कोपिष्ट। स्वयें पडाया प्रवांही भोगाया कष्ट। दाटुनी छडाछड करूनी निंदतो श्रेष्ट। अशी स्थीत ही जन्माची मूळखोड। नाहीं शांती क्षमा अंन्तरीची। तुफानी हौस कज्याची। मुखीं वाणी सदां अशुभाची। घरि चाकर ठेउनी त्याची। चाकरी बुडउनी जाची। मार देउनीयां, पोटाची। पोटगी घेतसे व्यांजी पचोत्राचा। सोदीतां कष्ट अशा खवरी घरीच्या ॥ १ ॥

धणी रावसाहेबांच्या पुण्यप्रतापें त्याला। तो देवदुर्ग तालुका हातीं लाभला। त्या गंगोबाचे नांवें मामला जाला। अविचारें बचाजीनें पालथा केला। पाहा कर्तुत्वाची कुसरी कशी द्वाड। ब्राह्मणाशी बांधोनी मारि। वालंट्यासी चढवी भारी। त्याचे वाणी सोनार कारभारी। दरकदारांची खातर न धरि। जमेदार दवडिले दुरि। भल्याशी गाळशिवी करि। असे त्रासउनी जनलोक मारवी गच्या। झाडुनी अवरु घेतल्या भल्या लोकांच्या ॥ २ ॥

श्रीमंत राव पंतासी कलह मांडीला त्यामुळें क्लेश भोगिले बहूत रयतांला। संचानें दिलें येश असतां अविचाऱ्याला। काय होय जवादें जसें तया कुणब्याला ?। पंताशी पत्र लिहुन दरोबरीनें। त्याला वकील पाठऊन। नाना रिती त्यासी बोलून। शेवटीं लबाडी करून। त्याची चौकी मारिली ज्याणें। मागुतीं स्नेह करून। अंतरीं कलह इछुन। करि विरुद्ध तो दाटुन। असें करूनी कारणेंवीण अविचाऱ्याच्या किती सांगाव्या तरि गोष्टी तया दुष्टाच्या ॥ ३ ॥

जमेदार द्वेष वचनानें पीडिले भारी। तसा गोऱ्यावर्ता गहजब केला फारी। भूमीस दहीवावीच्या हरण तो करि। खणोनी नदीशी बांधी इमारत थोरी। होउनी जथ सर्वांचे आले हुजूर। धणियांशी नमुनी अर्जीचे। भाव जाणीवले दुःखाचे। दयावंत धणी रयतेचे। बाबासाहेब विष्णुरूप सांचे। रावसाहेब स्वरूप सांबाचें। अर्ज ऐकुनी जमेदारांचे। अमल उडविले बचाजीचे। धणी मायबाप दीनांचे। दिलें रत्न जसें हस्तकी त्या माकडाच्या। केल्या यापटानें गती तशा अमलाच्या ॥ ४ ॥

जशि साठी वर्षी सुंट फुलन्ये मर्ता। त्या रीतीनें बचाजीसी जालें अवचिता। त्या बाइचा नात्यान अमल येइ हाता। होउनि थोर बदमस्त बुडविली सत्ता। आजन्मावरि बहुताचें जाहाले द्वेष। फळ जालें बंधु-बुध्धीचें। बसुदेव जिवाजीचें। ध्यान सुटले अपराचें। घर घेतलें व्याह्याचें। नाते विसरलें गोऱ्यांचें। वैर केलें जमेदाराचें॥ अपराधी जाले देवाचे। बोले गोपाळ टोळोजी धरती पुण्याच्या। मोरोजी बझा म्हणे गती तशा नष्टाच्या ॥ ५ ॥

---

— २७ —

# हिंदुपद बादशाहीच्या समाप्तीचा पोवाडा

( शाहीर आपा यशवंत )

कोण्या एका स्त्रीचा शिलेदार नवरा उत्तर हिंदुस्थानांत शिंद्याच्या लष्करांत रोजगारावर गेला. तो सहा महिन्यांत परत येण्याचें आश्वासन आपल्या बायकोला देऊन गेला. परंतु पुढें तिकडे बरीच वर्षे त्याला तिकडेच लढायांत घालवावीं लागलीं. त्या काळांत अनेक घालमेली होऊन तो शिलेदार पुण्यास परत येण्याच्या आंत इकडे पेशवाईसुद्धां खलास होऊन गेली होती. शिलेदाराची बायको नवऱ्याच्या वाटेकडे डोळे लावून झुरत असतां तिच्या मुखानें स्वराज्यनाशाचा सोहळा आणि त्यानंतर उडालेली दैना यांचें कवीनें या लावणींत वर्णन केले आहे.

लागल्ये झुराया सई बाई पाखरावाणी ॥ माझा बाच्छाय नित हिंदुस्थानी ॥ धृ० ॥

सांग साहा महिनेचा करार केला बाई ॥ हिंग येतो म्हणुनी गेला शिपाई ॥ आशेला गुंतला त्रिराण्या ठांई ॥ छावण्या गालिरीवरते शिंदेशाई ॥ चाळीस फलटाण घेऊन फिरंगी ॥ चढला जाटाची तेजी समशेर नंगी ॥ झडती यशवंतराव नित करतो खनाजंगी ॥ झाली झटपट त्या दिल्लीच्या मैदानीं ॥ मारी हात पेंचाचा घोड्याची धुळधाणी ॥ १ ॥

आले भादर हिंसत बुंदीचई ॥ चाकर दिल्लीचे नबाब पंकरवालें ॥ जईपूर जोतपूर उदापूर काबीज केला ॥ लावल्या सजा हैद्राबाज भोंवत्यानें ॥ फलटान भोंसल्याभोंवतें देउन घेरा ॥ बसविला पुण्यामधिं वकील वरशें बारा ॥

बुडविला टिपूला मुलुख केला सर ॥ सुरत बडोदे गुजराथ घेतलें त्यानें ॥ नऊ कोट राजे सकल मारवाडी यासी ॥ राऊत घोडे हे कैक राणूराणी ॥ उठला हिंदुपद झाले बारादाणी ॥ २ ॥ मा० ॥

झाला येळकोट हे जवळ बाराभाई ॥ पुण्याची गादी घालविली पेशवाई ॥वाजला तंबूर दखनांत फिरली दोहाई ॥ कासी रामेश्वर पुढें झाली फिरंगाई ॥ शत्रूनें शादलीला वईर दावा केला ॥ आष्टीवर गोखल्या बापू जखमी झाला ॥ मागनें भवानदीन पडला ॥ राऊत घोडे हें कइक राणूरानी ॥ उठला हिंदुपद झाले वरापाणी ॥ ३ ॥ मा० ॥

आजवर केल्या मौजा घेतले खळ ॥ रोजगाराच्या नांवानें झालें काळ ॥ बुडविली दौलत अवघें केलें वाडळ ॥ खांद्यावरते आले जमखान्याचें गाठोळ ॥ आपआपल्यामधीं फितूर करून फसले ॥ गेर उपाय उणें मोठ्या डफ झाले ॥ शत्रूला लागेना धास घरामाधें घुसले ॥ गातो आपा यशवंत वाणी ॥ पाहुन लटपटलीं बारा हजार तुंतुणी ॥ ४ ॥ मा० ॥

---

# पेशवाईच्या नाशावरील पोवाडा

( शाहीर शिदरामा )

फिरंगी अमल आहे चौकड ॥ ध्रुवपद ॥ गेले बाजीराव श्रीमंत पडली त्याला ॥ श्रांत लुटविली दौलत कसबिणीला ॥ कोण पुसेना त्या राव कंचनीला ॥ नित कीर्ती गायनकला नाटक या शाळा ॥ मेण्यां-माधिं वसून आणती त्याला ॥ ये आयनेमहाल त्याच्या राव बैठकीला ॥ तुम्ही घरीं करा रैतावा खुषीनें खावा ॥ मागतो द्या मला एवढी जोड ॥ ॥ १ ॥ फि० ॥

पुण्याच्या प्रसंगीं झुजले फिरंगी गोळयाच्या गारा वर्षावती ॥ कोणाचे घोडे कोणाचे हातीं ॥ भले भले सरदार उडालीं शिरें मानकरीं अवघाक पळती ॥ शिलेदाराच्या कोणच्या गती ॥ बापूजी गोखले नाहीं चुकले सदा समशेर नंगी हाती ॥ वनीं कोपलें धन तीव्रती ॥ २ ॥ फि० ॥

लाल फिरंगी गोरा जमावून सारा शेर पुण्यावर दिली लढाई ॥ आगीच्या पुढें कोण ठरत नाहीं ॥ श्रीमंतानें घेऊन राजाला तंबूर वाजि-वला फिरविली कुंपनीची द्वाही ॥ चौकडे झाले टोपीभाई ॥ तलवार झाली बापडी फिरंगी छडी लागली दुनयावर फिराया ॥ हाली पैशावर जुलूम नया ॥ ३ ॥ फि० ॥

नारीचा प्रेकर गुणी अंतरीं समजुनी स्वारीसी जात होता राहिला ॥ नाभीकमळापासून आरसा तिला ॥ वयामधिं नाजुक करावें सुख छबेला ॥ पलंगी घेऊन वसाया फार युक्तीनें बोलवा त्याला ॥ शिदरामा लवलखे लावणी शिके बैठकीला करि गडबड ॥ ४ ॥ फिरंगी० ॥

———

- २९ -

# पेशवाईनंतरच्या दीन स्थितीवर पोवाडा

( शाहीर राजाराम )

श्रीमंतांचे राज्य बुडालें धन्य टोपीवाला झाला ॥ नौबती चौघडे राहिले तंबूर वाजूं लागला ॥ ध्रुवपद ॥

ज्याची सद्दी त्यासंगे गेली होणार न कळे कवणाला ॥ न होयाचें होऊं लागलें या राज्याचा गुण झाला ॥ नालख्या पालख्या राहिल्या वरोवरीं मेणे झाले ॥ चौरी न अबदागिऱ्या बुडाल्या छत्रीचा पाड पडला ॥ मागलें कोणी नांव घेईना नव्याचा नंबर झाला ॥ श्री० ॥ १ ॥

भालदार चोपदार राहिले खिसमतगार ॥ बुटणेर कारबार ते बुरड मांग म्हार सुभेदार ॥ ज्याची सावली कुणी घेईना अवघ्यांचा अनाचार ॥ धरत्रीनें पीक सोडिलें पातकाचे डोंगर ॥ श्री० ॥ २ ॥

बायकांनीं शुद्ध सोडिली भय वाटेना जिचें तिला ॥ राज्यांमधिं वूज नाहीं खुपीचा पर्वत झाला ॥ भ्रताराशीं विचित असावें अजुन मरेना कां मेला ॥ जात पात वळख नाहीं पाहत असावें भलत्याला ॥ एक देऊनी पांच घ्यावे बुडवायाचा विचार ॥ सदावर्त हे पुण्यवान ठकले लुंगे सावकार ॥ श्री० ॥ ३ ॥

पेशव्याला देणें देवाचें सवाई श्रमी वसरी ॥ शिउसा सुभे राज्य दखनचें पेशवे कैकाला धाशत भारी ॥ दानदक्षणा अन्नछत्र पेशव्याचा धर्म भारी ॥ त्यामुळें ही प्रजा सुखी आनंद करिती घरोघरीं ॥ मेघांवांचून परजन्य पडेना पातकाच्या राहना उरी ॥ त्यामुळें ही दुनया ठकली सुटली मुलखांमधीं मरी ॥ भगवान होयशी होईल जरी ॥ शीपडले रयतेच्या जिवाशीं राजाराम करी कवन स्मरावे भगवंताला ॥ श्री० ॥ ४ ॥

---

# पुण्याचा पोवाडा

## ( शाहीर आप्पा यशवंत )

आली खबर पुण्याची ऐका ॥ मुंबईस उतरला पैका ॥ धृ ॥

रुमशाम पतीचे देण ॥ वहिवाट दिल्लीपासून ॥ सोडिला सुभा दक्षिण ॥ आदि सातारा मग पुण ॥ पुढें वहिवाट घ्यावी ऐकून ॥ हें राज्य शाहूराजान ॥ केलें पेशव्याचे स्वाधीन ॥ रामेश्वर काशी पुण ॥ नांवाचा ज्याचा डंका ॥ लगी निशाण जरिपटका ॥ झाली० ॥ १ ॥

हिंदुपद बाच्छाई जोंवर होती पुण्याई ॥ तोंवर हक हुकूम द्वाई ॥ मधिं हुकूम कुणाचा नाहीं ॥ ही धाशत शत्रूठाईं ॥ घरीं बसुन येती चवथाई ॥ बोल बोल सवाई कोका ॥ आली० ॥ २ ॥

ही धाशत शत्रू कानीं ॥ घरीं बसून येती खंडणी ॥ आसंदेह एक अवघ्यानीं ॥ केलें राज्य पुण्यामधिं ज्यांनीं ॥ वाघ बकरा मिळूनि दोनी ॥ एके ठांई पाजले पाणी ॥ व्यापारी उदमी वाणी ॥ केवळ रत्नाच्या खाणी ॥ चळचळीत पैसा अडका ॥ सोन्याचा उडतो पंका ॥ आली० ॥ ३ ॥

पुढें पालख्याचा पारा ॥ नाहीं परजन्य सुटला वारा ॥ पैशाचा करून पसारा ॥ नांदती सावसाहुकारा ॥ सोन्याचा बांधून भारा ॥ जा खुशाल दोन प्रहरा ॥ करी चाहाडी त्यासी पैजारा ॥ नित खोडा वेडी चोरा ॥ हातपाय कापती नाका ॥ शिंदळीवर उडती फोक ॥ आली० ॥ ४ ॥

काय दिवस दक्षणेची वढती ॥ होता नाना तंवर चढती ॥ कारभार मसलद भडती ॥ घरीं वसून पुण्यामधिं होती ॥ अष्टोप्रहर नौवत झडती ॥ ठांई ठांई सुभे नित लढती ॥ ही धाशत शत्रूला पडती ॥ न जाणू घटका उडती ॥ बोले बोल सवाई कोका ॥ आली० ॥ ५ ॥

नानाच्या स्त्रीनें सोडली वस्ती ॥ काशीस पोंचल्या अस्थी ॥ झाले घरोघर मसलती ॥ आपआपल्यामाधिं होती कुस्ती ॥ येक वाईट

एकाचें पाहाती ॥ असें करून झाली माती ॥ मग पळती मारित हांका ॥ आली पीडा दक्षणेच्या लोका ॥ आली० ॥ ६ ॥

मोठे मोठे पुण्यांतील वाडे ॥ जिकडे तिकडे वसाडे ॥ घरीं भेद झाले वाडे ॥ मग केली पाडापाडे ॥ घराभोंवते वसले झारवडे ॥ ठांई ठांई गुरांची हाडें ॥ असो ब्राह्मणांत अथवा धेड ॥ मानतात एकच पाडोपाड ॥ हें वाईट ह्मणेल जोका ॥ त्याला धरून देती धक्का ॥ आली० ॥ ७ ॥

तीन लाख फौज ज्या ठांई ॥ तिथें एक शिपाई नाहीं ॥ अशी व्यापाराची सोई ॥ उद्म्यानें करावें काई ॥ हातीं पदरीं ज्याच्या नाहीं ॥ तो पैशावाचुन करील काई ॥ वसला सातारा वाई ॥ लोकांनीं पाहिली मुंबई ॥ तरि हें ठिगळ मिळेना भोका ॥ मग कैंचा टाकमटिका ॥ आली० ॥ ८ ॥

पैशाचें तोंड झालें काळं ॥ नाहीं खर्चायाची वेळ ॥ पैशानें पासरी केळ ॥ एकच पाडोपाड तुपगुळ ॥ जसे हुलगे तसे तांदूळ ॥ कुणब्याचे पांढरे डोळं ॥ आली पोरें विकायाची घटका ॥ नाहीं घरांत तांब्या फुटका ॥ आली० ॥ ९ ॥

नाहीं न्याय नीत राहिवासी ॥ .. ..........सारख्या एक एकासी ॥ असो गरत अथवा दासी ॥ कोण बोलेना कवणासी ॥ राहील ती आपली खुशी ॥ नाहीं तर पाहिजे त्यासी ॥ जाहाली मोकळीक जायासी ॥ नाहीं दंड चोर शिंदळीशीं ॥ कविनाथ छकडा ऐका ॥ आली० ॥१०॥

अशी हालहवाल दुनयेची ॥ झडती केल्या कर्माची ॥ कोणी वाट पाहाती धर्माची ॥ आजकाल मजा पाहायाची ॥ धुंद दारूच्या मापाची ॥ गोष्ट सांगतो कैफाची ॥ कवी आपा यशवंताची ॥ मार पेंचा कवियांका ॥ कडेगांवकराचा डंका ॥ लावि कलगीवरता टोका ॥ आली० ॥ ११ ॥

— ३१ —

## हिंदुस्थान वर्णन पोवाडा

( शाहीर प्रभाकर )

चोहों वर्णांतुन कोण मुशाफर वर्ण मला सांगा । तुम्हांला वर देतें जागा ।। धृ० ।।

विप्रवंश संपूर्ण दरिद्रें आजवर नाचवले, ब्रह्मकर्माला आंचवले ।। संकटिं पडतां पक्षी खगेंद्रे जसे काय वांचवले, सकळस तेजें नाचवले ।। श्रीमंतांनि तसे थोर पदाला ब्राह्मण पोंचवले, तयां करीं शत्रू वेचवले ।। ।। (चाल)।। जे उदार धीर देणार खबर घेणार क्षणामध्यें रुमची ।। ते तर नव्हें आपलें बेट राजबीज थेट कळा दिसे तुमची ।। नारो शंकर विंचुरकर बोला लौकर धरते करीं दुमची ।। (चाल) ।। ओढेकर नायगांवकर पुरंधरे पानशांतिल आपुण । तुम्ही अमात्य कीं राजाज्ञा प्रतिज्ञा पुरवा कपट वाणुण ।। प्रतिनिधी सचिव सुमंत न झालों श्रीमंत दिसती गुण ।।( चाल )।। रणशूर पुरे पटवर्धन सर्वदा युद्धसाधन ।। नाहीं रास्त्यांमध्यें निर्धन, भरपुर भांडारीं धन ।। किती नानाचें शोधन दशादिशा करी वंधन ।।( चाल )।। मसलती राजकारणी सखाराम बापू हो ।। रामाजीपंतीं वेढिला जंजिरा टापु हो ।। हरीपंत म्हणती सृष्टित स्वराज्य स्थापूं हो ।।( चाल )।। त्रिंबकराव भाऊसाहेबांचे मामा राव जी जी ।। हर वक्त विसाजी कृष्ण हजर प्रभुकामा राव जी जी ।। रामचंद्र गणेश वांछितात नित संग्रामा राव जी जी ।।( चाल )।। कृष्णराव वल्लाळ कोळी भिल रामोशांचे काळ, पारोळकर काळाचे महाकाळ ॥( चाल )॥ रणांगणीं बुंदेले मजबुत ॥ घोडेस्वार शिपाई कलबुत ॥ केले गिराशाचे ताबुत ॥( चाल )॥ संस्थान शाबूत लढाया रोज नाहीं नागा, वसविल्या ब्रह्मपुऱ्या बागा ॥ १ ॥

क्षत्रीय मंडळित मुख्य घराणें उदेपुरचें, सुरजमल जाट भरतपुरचे ॥ अश्वमेध कलियुगांत केला जयसिंग जैपुरचे, भारमलसिंग जोतपुरचे ॥ वळि-भद्रसिंग आणिक सुरुपसिंग श्रींगी राजापुरचे, प्रभंजनसिंग कुंजपुरचे ।।

॥( चाल )॥ पुरी चेतसिंग काशीचे कर्मनाशीचे इंद्रजितसिंग ॥ हरि भक्त हाती जपमाळ प्रभु नेपाळचे रणजितसिंग ॥ पडे बर्फ सदा काहूर सुभा लाहूरचे दलजितसिंग ॥(चाल)॥ अजमेरचे सुरतसिंग मस्तकी लिंग शिवाचें सदा ॥ नरवरचे हरिहरमल एकदिल अचळ संपदा ॥ रजपूत चितोडकर मर्द गर्द आफिमेत न टळती कदा ॥( चाल )॥ झरण्या परण्याचे वीर संग्रामसिंग रणधीर ॥ देती राघोगडास्तव शीर, दुर्जनसिंग गुणगंभीर ॥ मानसिंग तरलाचे तीर, गोहदेस ठेवला खंजीर ॥ चा० ॥ ओंकारमल राठोड लेक मोठ्याचे हो ॥ अर्जुनसिंग रामसिंग हरिप खोट्याचे हो ॥ जालमसिंग भिमसिंग बुंदिकोट्याचे हो ॥(चाल)॥ केशरीसिंग दत्याचे ब्राह्मणभक्त राव जी जी ॥ वैकुंठसिंग मथुरेचे बहुत वीरक्त राव जी जी ॥ मलसिंग बाहुबळें रक्षिती बाच्छाई तक्त राव जी जी ॥( चाल ) ॥ सबलसिंग मेवाडचे ॥ रुद्रसिंग जमीदार मारवाडचे ॥ हटेसिंग हजारी छत्तिसगडचे ॥( चाल ) ॥ अशेले स्वइच्छ फिरती किती ॥ भरपूर अमल झोंकीती ॥ वळखिल्या वळख टाकिती ॥( चाल) ॥ अशा आहेत लोकांच्या रिती म्हणून येऊं नये रागा, एखादी गोष्ट येते भागा ॥ २ ॥

वंश हजारों हजार ज्यांचे सुरतपाक बेटे, चपळ जसे वाघिणीचे पेटे ॥ नगरशेट मकसुदाबादेचे वतनदार शेटे, घालिती पैंकेकरी खेटे ॥ सधन गुमस्ते पदरीं बांधिती शिरीं मंदिल फेटे, गळ्यामध्यें लिंग गोफ गेठे ॥( चाल )॥ आग्र्याचे केशवलाल द्रव्य आजकाल तयांचे सदनी ॥ आल्या याचकास सत्कार पाट वस्कर मिठाक्षर वदनी ॥ परनारी सहोदर सदय प्रफुल्लित हृदय विषयसुख सदनी ॥(चाल) ॥ उज्जनचे गोकुळदास जन्मतों प्रवास करते भले ॥ गढे मंडळचे हंसराज बंधु जसे राजपतीने शोभले ॥ झाले मातब्बर सौद्यांत होन हौद्यांत सहज लाभले ॥ ॥( चाल )॥ आदि ठिकाण भागानगर, लागलें सभोंवतें आगर ॥ जाई जुई शेवंती तगर, खेळती तळ्यामधीं मगर ॥ सारी अलम शहरची सुगर, ना अडे एकमेकां विगर ॥ (चाल)॥ वेदरचे मलापा मुलुख फिरस्ते वाणि हो ॥ शिवपूजन त्रिकाळीं करून सत्य वदे वाणि हो ॥ पदोपदी सांव संभाळी समय निर्वाणि हो ॥ (चाल) ॥ भावार्थी सुराप्पा श्रीरंगपुरपट्टणचे राव जी जी ॥ धट लावून मोजिती

द्रव्य मोथी पलटणचे राव जी जी ॥ संपत्तिवान कनकाप्पा चिनापट्टणचे राव जी जी ।। (चाल ) ॥ चंद्राप्पा सोंदेविदनुरचे ।। विराप्पा दर्भशयन इंदुरचे ॥ गुराप्पा गुरु मछलीवंदरचे ॥( चाल ) ।। नांवें इतुक्यांचीं घेतलीं पहा पहा यांतुन तुम्हीं कुणी आहां ।। भीड सोडून कळवा राहा ॥ करीन पती परिचय हा माझे मर्जिनुरूप वागा, तदार्पण मग दौलत पागा।। ३ ॥

राज्यसमंधी पडले प्रसंगीं जिव खर्चुन कामीं, मराठे लोक नामी नामी ।। धारकरी साहेबसुभे सरदार सरंजामी, नांदती आपआपल्या ग्रामीं ॥ अमरसिंग जाधव शुचिर्भुत अति अंतर्यामीं, धाडगे निसंग संग्रामी ।। (चाल) ।। रणनवरे नवरे थोरात खरड खैरात फडतरे कवडे ॥ पाटणकर निंबाळकर भुते भापकर झेंडे वलकवडे ।। जगताप दरेकर बुळे ताकपिर मुळे दिघे वाघचवडे ॥ (चाल) ॥ धायवर बावर धायगुडे पायगुडे सोनवणी घागरे ॥ माहाडिक शिर्के दाभाडे गोंड सावंत धुळप नांगरे ।। सितोळघांची मोठी वेल सवाई सरखेल सबळ आंगरे ॥ (चाल) ।। आधीं सुभेदार होळकर, नंतर पवार धारकर ।। जगजीवनराव, माणकर, मुळी चव्हाण दहिगांवकर ।। भायतुळे पिसाळ वाईकर, ढमढेरे तळेगांवकर ॥ ॥ (चाल) ।। धनी छत्रपती महाराज तख्त सातारा हो ।। करवीर चंदि-चंदावर अहो दातारा हो ॥ शिंद्यांत पुरुष एक एक निवडतो तारा हो ॥ नागपूरचे भोसले होशियार घोड्याचे राव जी जी ॥ गायकवाडी मोहोरे इष्कि कडीतोड्यांचे राव जी जी ॥ शिरीं आकलकोटी लाविती तुरें गोंड्याचे राव जी जी ॥ (चाल) ॥ म्हणे मुशाफर गडे ।। आम्हीं तर राज्याचे सवंगडे ॥ ऐकून सुंदरा पायां पडे ।। (चाल) ।। गुणिजन गंगु-हैवती पुरे ।। मनीं कवन तयांचे मुरे ॥ किती महादेव वाखा पुरे ।। सुगर प्रभाकर म्हणे पंचीपशीं कांहीं वक्षीस मागा, कवी नाहीं कुणी कवनीं जागा ॥ ४ ॥

# सातारकर छत्रपतींचे पोवाडे

## प्रतापसिंह ऊर्फ बुवासाहेबांचा पोवाडा

शिव छत्रपती महाराज शोभती राज ॥ सूर्याचे तेज प्रभा धवळी ॥ उमेद पंचविसामधि कवळी ॥ कानीं झोंकांची भिकबाळी ॥ ध्रु० ॥ रूप लावण्याची खाण उमतीमधि जान पठाणी बाण झाली बेभान अशा वेळीं ॥ तयारी मोठी सायंकाळीं ॥ सजविली रथगाडी पिंवळी ॥ होते पोषाग हिरवेगार रथामधिं स्वार पुढें ग्हालदार देतो हरळी ॥ स्वारी जलमंदिरची सरळी ॥ झोंक साताराची नोंक निराळी ॥ शिवछत्रपती महाराज उगवले चंद्र शिपाय लोकांच्या वर त्या नदरा ॥ धनी मेरा मोत्यानका गजरा ॥ १ ॥ शि० ॥

खुप तऱ्हा स्वारीचा डोल नवा अलिगोल शिपाई बिनमोल कमान लढती ॥ इंग्रजी डौल टोपी खर्ची महीनेमहाल शेरे झडती ॥ जुने शिवबंदीचे लोक असाम्या चोख नवी भरती लाल रंग लाल पोशाग करती ॥ राहाणें साताराची धरती ॥ हे आरब शिंदे मर्द कैफामधिं गर्द जरा नाहीं दर्द हटून मरती ॥ रणामधीं रणशूर टोपी भिडती ॥ उभा आपल्याला बाजूवरती ॥ मोंगल पठाण बाकडे सराजम झडे लेस गहिरा ॥ झाडल्या रंजकाच्या गारा ॥ हातांमाधिं नागव्या समशेरा ॥ २ ॥

धनतुरूप तांबडे खर्ची शिपाई फरडे निवडले करडे हरवाशी ॥ भडक पोषाग हारजिनशी परदेशी नोक खाशी ॥ मोंगल घोडदाळ आगीचा कार उमतीचा भार सोळा वर्षी ॥ पाठीसी ढाल हातीं बर्ची पुढें घेऊन पाहातो आर्शी ॥ सारे मिळाले आठिकोट आगीचा लोट सैनेचा गोट तयापाशीं ॥ बुवासाहेब महाराज हौसी ॥ ठेविले लोक हरवाशी ॥ ३ ॥

आपासाहेब नांव तयाचें अग्र उमराव आपले सभोंवते ॥ बुवासाहेब नांव साजे ॥ चौमुलुखी डंका वाजे ॥ बाळासाहेब सेना साजे प्रतापी राजे सभेमधिं गर्जे ॥ पाहुन लाखों सेना सभेपुढे चमकतो अस्मानी तारा छंद गातो ॥ अंदू गोविंदा सोडून धंदा पवाडा अवंदा नवीन शिकला वंद अक्षर कुठें नाहि चुकला ॥ सभा पाहुनी अंतरी चकला ॥ हें छंदीफंदीचें आगर गातो विकट मांडणी लगर लेश गहिरा जरीचा पदर लावुन उदरासी ॥ ४ ॥ शि०

---

# प्रतापसिंह यांचा दुसरा पोवाडा.

( शाहीर हरिराम )

प्रतापसिंह महाराज रामलक्षुमण बंधु विराजती । हिंदुपद बादशाही दक्षणची पूर्णज्ञानी शुद्धमति ॥ ध्रु० ॥

पूर्व तपाचें फळ तेज निर्मळ सोज्वळ कोमळ कांती । राजवंशी राजेंद्र जगामधिं नांव शोभलें छत्रपति ॥ पगडी कंगणीदार अंगावर जुहार भार वर नाव किती । हिरे माणिक रत्नांचे जडाव शिरपेंचांवर चमकती ॥ शुभ्र शिरा पोषाख डौल साधा बांधा नामी आकृती । सांवरूप भोळे अवतार जसे कृष्ण गोकुळीं नांदती ॥ भोंवताले भले लोक हुजूर हुजरे चरणावरी लोळती । प्रतापसिंह ॥ १ ॥

काय सांगूं तारीफ कुळींमधीं दीप केवळ पहा चंद्र जसे । कनवाळू अंतरांत जगासी अन्न पुष्कळ देतसे ॥ आदिशक्ती आदिमाया भवानी तिचें ध्यान अंतरांत वसे ।

द्वारीं झडे चौघडे आनंदांत पूजा नित्य होत असे ॥ आपासाहेब महाराज दिगंवर मूर्त कनय्या डौल दिसे । गोरा रंग गोजिरा शिरा मोत्यांचे हार कंठांत वसे ॥ जसे आकाशीं सूर्य चंद्र तसे जगाला भासती । प्रतापसिंह० ॥ २ ॥

अजब थाट स्वारीचा थाट गर्दी भोंवताले मानकरी । चवरी आणि अबदागिरवाले चोपदार पुढें ललकारी ॥ बाणदार बोथाटी भाले, वाद्यें वाजती नानापरी ॥ आलीगोल मोंगलाई स्वारी, जरीपटका शोभला हत्तीवरी ॥ अंबारीत राजेंद्र भूपती, मोरचेल प्रधान करीं । सेनापति रणशूर, वीर अर्जुन, बैसले बाजूवरि ॥ कोतवाल, सांडणी, हौदे झालरी कलाबतू, चमकती । प्रतापसिंह० ॥ ३ ॥

आघाडीं पिछाडिस नौबद घाई, नृत्य रंग नाचती रंभा । नानापरी वाद्यें उठली नौबत वाजति भं भं भा ॥ दावलखान देविदास ज्याचें पसंत गाणें बसलें चित्तीं । बापु भोंसले हुजूर हुजरे फार दया त्यांच्यावरती ॥ कवि म्हणे हरि राम लक्ष महाराजांच्या चरणावरतीं । प्रतापसिंह० ॥ ४ ॥

---

# प्रतापसिंह महाराज शिकारीस गेले यावर पोवाडा

( शाहीर सगनभाऊ )

शाहू छत्रपति महाराज धनी होते कीर्तिवान फार । चौदा पेट्यांचें राज्य करितो, राज्य चालविलें हंबीर ॥ ध्रु० ॥

बुवासाहेब बाळासाहेब दिसे प्रत्यक्ष सांबावतार । बुचडयामध्यें ठेवि हत्यारें अंगीं चपळाई फार ॥ कीर्तिवानान केली कीर्त, म्हणून सांगाया फार । स्वारीचा हा थाट अजब निघतो, बावन हुजराती चाले मोहरें ॥ स्वारी निघती शहरामध्यें तयारीचीं हत्यारें घेऊन फार । शिकारीचा फार शोक चाल केली जंगलावर ॥ सर्व जंगल धुंडित आले, मारी व्याघ्र रानडुकर शिवबंदीचा वडा थाट, सेनापति चालें मोहरें ॥ घरीं येतां स्वारी भालदार पुकारी मोहरें । लिंबं नारळ उतरून टाकिती मागल्या चौकावर ॥१॥

वाड्यामधिं येतां स्वारी येऊन बैसले तक्तावर । झोंपेमधिं पडलें स्वप्न राज्य लुटाया शत्रु आले फार ॥ झोंपेंतून जागी होऊन स्वारीं बैसली मंचकावर । बुवासाहेबांनीं हांक मारिली बाळासाहेब आला मोहर ॥ झोंपेंमध्ये झालें निमित्त जलदी सांगावें आह्मांस फार । सगनभाऊ बडा हुशार, कीर्त केली या धन्यावर ॥ तुह्मांस आम्ही एकच युक्ति सांगतों, राज्य राखावें जमीनें फार । आल्या शत्रुशीं व्हावें सादर, हटूं नये मागें मोहर ॥ शहर सातारा दिसे अजब तऱ्हा, तक्त जगास महशूर । पेशवे धनी होऊनी गेले कीर्त सांगाया झाली फार ॥ २ ॥

---

# प्रतापसिंह महाराजांची पदच्युति

गड सातारा सर करून। फिरंगी आला सराइत करून ।। ध्रुवपद ।।

श्रावण वद्य पंचमी, तयारी वास्तु झाली पुढें। रणवहिरी सांपडला जंबुक पसरले चहूंकडे ।। ........ ।

खुप सिंहावर गर्दी झाली हर्षले टोपडे ।। (चाल)।। पहांटेचे प्रहर रात्रीं, उभे भवंताले संत्री। सांपडले मोती जंत्री, घातलें अन्न सत्पात्रीं ।। (चाल )।। केला घाट इंग्रजानें, शहरांत येऊन दारूण। झाली रयत बहु हैराण, चालविलं गलाव रत्न ।। (चाल) ।। प्रहरांत आले निंवावर जांवुळ-वाडा। शेरीच्या पुढें माळावर पडला वेढा। झाले इंग्रज तयार लाखोटे धाडा। ...... ।। (चाल पहिली) ।। इंग्रज हा तोफा भरभरून। गड सातारा० ।। १ ।।

रामदास स्वामींचें वचन शिरपेंचावरती खूण। हस्त शिरावर ठऊन बोले स्वस्थ आम्ही रक्षण ।। तळ उठला लवकर निघाले इंग्रज तयार होऊन। चौगर्दा चौफेर कुंपनी हुशार चहूं बाजून ।। ( चाल ) ।। तळ उठला प्रहर दिवसाला, मानकरी जवळ बाजूला। हात जोडीले कृष्णाला लोकांचा कहर झाला ।। (चाल) ।। खंडोबाची विनी मोहर, ढाल भगवी सडका चार। संगे कुंपनी बहादर, निघाले देशावर ।। (चाल) ।। बाळा-साहेब सेनापती भले रणशूर। लढाईचा बेत होता कीं गावांबाहेर। बुवासाहेब बुद्धिवंत बोले उत्तर। शहराचा होईल खराबा, आपण बाहेर ।। (चाल पहिली) ।। असा विचार पुरता धरून। गड सातारा० ।। २ ।।

रागरंग पाहून उतरले कृष्णेच्या पलिकडे। साहेबाचा मनसुबा हुशारी पलटण मागेपुढे ।। ... । अशी वेळ कर्माची, झोका होता राज्याशीं अवघड ।। ( चाल ) ।। सूर्याशीं कलंक चढला, बंधूशी अंतर पडला। जसा हृदयीं अग्न धडधडला, चमचमाट मेघ गडगडला ।। ( चाल ) धरली मोहिम जाण्याची, अशी कृपा झाली कृष्णाची। वडी

कैद टोपीवाल्याची, वासना रती धर्माची । ( चाल ) ॥ कडेकोट निघून गेले हो देउरावर । तळ पडला जाऊनशिनी हो गांवाबाहेर । चवदा पेठ्यांची गर्दी जवळ हुजूर । . . . ॥ ( चाल पहिली )॥ मसलतीनें घटका भरून । गड सातारा० ॥ ३ ॥

दर कुचावरती कुच चालले गेले निरा उतरून । जेजुरीस गेल्यावर झालें मार्तंडदर्शन ॥ . . . । तळयाचे बाजूस होळकर मोर्त दृष्टी पाहून ॥ ( चाल ) ॥ उधळिला त्यानें भंडार, भरगच्ची पोपाग चार ॥ प्रसन्न झाले मल्हार, कोतवाल नाचे बेबहार ॥ ( चाल ) ॥ केली तडप बहु जाण्याची, संगें स्वारी राणीसाहेबाची । एक कटाव बहु फौजेची झुंड पडली सरदाराची ॥ ( चाल ) उन्हाच्या झळया लागती अति दारुण । दरपना रात्रीं चंद्र घेऊन । भिंवराच्या पलिकडे मोंगलाई संगीन । आली मोंगलाई दिलदार, येऊं भेटून ॥ ( चाल पहिली ) ॥ चालविले कशावरून । गड सातारा० ॥ ४ ॥

---

# प्रतापसिंह महाराजांची काशीस रवानगी

( शाहीर सगनभाऊ )

मुळापासून चाल झाली कुठें दिसेना अंतर। बाळासाहेब हुशार करकट्टे लढणेवाले फार ॥ इंग्रजांनीं घेतला मुलुख चालून आले दक्षणेवर कोलापूरवाल्याशीं जिंकिलें लढण्यास टिकेना कोणी फार ॥ शहरामध्यें द्रव्य फिरविलें राज्य घेतलें हातावर। सारें शहर फिरून आला, डेरा दिला पवय नाक्यावर ॥ साहेब लोकांनीं देऊनी ताजिमा पहिली खुर्ची केली मोहरें। मनामधिं कांहीं भीति आणूं नये आपला चालला एकच विचार ॥ ..... चौदा पेट्यांचे राज्य करावें आम्हांस आनंद फार ॥ १ ॥

बुवासाहेब बाळासाहेब मारून टाकावे जलदिनें फार। आपासाहेब मागून बोलता झाला, भाऊबंद कसे मी मारूं ॥ आपल्या हातानें घ्यावा प्राण मारा सांगतों किल्यावर। इंग्रजांनीं करून तयार तोफा आणिल्या पवय नाक्यावर ॥ जलदिनें हा बार भरून हल्ला उठाविला किल्यावर। शहरामधिं झाली चलविचल बुवासाहेवास दहशत पडली फार ॥ २ ॥

बाळासाहेबास आला क्रोध लढाईची करून तयारी। सारें लष्कर शिवंदिशीं जलदी उठवि फार ॥ बुवासाहेबास कळली बातमी हात जोडून बाळासाहेबामोहर। आग लागों घा लढण्याला इंग्रज येईना हार ॥ सातार किल्ला खूप जिंकिला इंग्रजांनीं कैद केले। बाळासाहेब बुवा-साहेबास, जलदीनें निंबावर नेले ॥ अंबारींत बंधू बैसले, झालरी लाविल्या हत्तीला। इंग्रजांनीं जिंकून सातारा, आपला अंमल बसविला ॥ बाळासाहेब बुवासाहेबास वनवास ईश्वराने दिला। अवघे मानकरी येती भेटीला असा राजा नाहीं होणार साताऱ्याला ॥ ३ ॥

निंबावरती डेरा दिला बारा दिवस वनवास कंठिला। पुन्हां तेथून निघून चालले पुण्यक्षेत्र काशीला ॥ ऐन जंगलामधि राजा जन्मला, जंगली राजा नाम पावला। सगनभाऊ गर्जे सभेमध्यें, यानें पवाडा केला ॥ मोठ्या मोठ्याची कीर्त करीतो, अशी चाल होईना कोणाला। बुवासाहेब बाळासाहेब यांणीं धास्ती पाळून व्यर्थ प्राण सोडीला। अवघ्या राज्याची हीच गति पुकार झाला सर्वांला। अवघे राज्य करीना लढाई, खंडणी देती बहादूर इंग्रजाला ॥ ४ ॥

---

# पेशवाई व शिवशाही नाशाचा पोवाडा

## ( शाहीर राघुजी पाटील )

गेले ब्रह्मावर्तावर बाजी, अशी तरी का मर्जी, बुडाली रोजगाऱ्याची रोजी, करावें काई । कशी निष्ठुर माया केली ग विठाबाई ॥ ध्रुपद ॥ तक्त सातारा, शहर पुणें, साडेसात सुभे दक्षिणे, करनाटक हिंदुस्थान, फिरती द्वाही । ठाईं ठाईं बसल्या नबाब पाठवितो चौथाई ॥ शिंदे होळकर मोठे बंड, लाविले दिल्ली अटकेवर झेंड, काबीज केले चारी खंड, हालविली शाही । मला कळत नव्हतें, होते लहान पराई ॥ गेले सवाई माधवराव, तवापुन आला राज्याला खेव, पाण्यामधिं बुडाली नाव, कापली गायी । जानू जोशी सांगत होते, लबाड नाहीं ॥ रास्ते आणि निपाणकर, प्रतिनिधी नारो शंकर, झाली लढाई पेठावर, आले हातघाई । ते बापु गोखले भले शूर शिपाई ॥ आपआपसांमधिं बेदा झाला, मालकमसाहेब टोपीवाला, रात्रीचा दिवस त्यानें केला, आले लवलाही । गेले जिकडे तिकडे पळोन बाराभाई ॥ आजिंठ्याचा घाट औघड, लाखन बाडा सातपुडा, तापी नर्मदेच्या पलीकडे, शिंदेशाही । कशी निष्ठुर० ॥ १ ॥

कुणीकडे जाऊं बाई कुणी ( कोण ) आयरान, पहाड पर्वत कोकस्थान, दहा दिशेस दिसे बाई भयान, भालवा भुकती । ते वनामधीं वनगाई मुकणा हत्ती ॥ गर्जती शिवा यान शार्दूल, भुंकार देती वानर नीळ, टाहो फोडिती कोयाळ, दिवसा राती । घडी घडी याद मला प्राणसख्याची होती ॥ बाई ग वनिची वनफळ, चार बोर चवेणी केळ, पिकले करवंदी जांभळ, आवळी तुरती । तिथें कैचा अन्नाचा पदार्थ तेच खाती ॥ देव झाला पाठमोरा नसतीं विघ्नं येती घरा, राया गिरजेच्या शंकरा, गुण आठवूं किती । त्या नळराजानें मोकलली दमयंती ॥ तीर्थें केलीं पायीं अनवाणी, धालित्यें नित्य तुळशिला पाणी, जशी अणु-

ध्वजाची राणी, मार्ग लक्षिती । राव सोडुन गेले शहर पुण्याची वस्ती . . . । कशी निष्ठुर० ॥ २ ॥

गाई लाविती माना वर, दुसरा ऐकुनी ध्यानी धर, दखनमधिं गड सातारा अजब किल्ला । कळ उत्पन्न झाली, फेरा आला राजाला ॥ आपासाहेबाचा विचार, बाळाजी नातू मनसुबदार, कोणी ह्मणत लबाड खरा बितावा केला । अशी गुजगुज वार्ता कळली इंग्रजाला ॥ आपा असें काय मन केलें, गैरशिस्त, कसें नाशिलें, बाळासाहेब धाकटें मूल, कळेना त्याला । चौदा पेऱ्यांचे राज्य नको आम्हाला ॥ निघाले राजवाड्यांतून, चुलते पुतणे दोघेजण, तुम्हाला माझ्या गळयाची आण, करावी सल्ला । त्यांनीं मुकाम जाउन निंबावर्ता केला ॥ हत्ती घोडे लावलष्कर, उचलून दिली शिक्के कटार, पालखी मेणे अबदागीर, ठार संशय गेला । अजि अक्रूरानें श्रीहरि मथुरेशीं नेला ॥ विनविती नानापरि सरदार, अष्ट उमराव निंबाळकर, आह्मां आहे हेच वर, जातो काशीला। तुम्ही फिरा माघारी, कां तरि श्रमी झाला ॥ शाहू छत्रपतीचें देणें सरलें आज वडिलांचें पुण्य, कृष्णाबाईचें दर्शन, अंतरलें मला । खळखळा रडती मोठा आकांत झाला । गेला राज्याचा अधिकारी, दिलगीर रयत झाली सारी, कशी केली बा श्रीहरी, मोकलली गायी । कशी निष्ठुर० ॥ ३ ॥

जंगल तऱ्हतऱ्हेची झाडी, सावमाव पिंपळ वड, फणसे अनासें बहु गोड, अंजीर पिकला । ताडी माड येळ विक्राळ गेले गगनाला ॥ वन बाई पाहतांना ग दृष्टी, जागोजाग भिलाची हाटी, रात्रंदिवस लागतो पाठी, झोंप नाहीं त्याला । हा गिराशाचा मुलूख ओंगळ मेला ॥ बाई मी होते गरोदर, नऊ मास झाले पुरे, जवळ नाहिं बाई सातारें, आठव केला । तो जंगली राजा जंगलामधिं झाला ॥ ईश्वरी मायेचें कौतुक, मला दाविलें बाई पुत्रमुख, मोठें जिवा वाटलें सुख, आनंद जाला । बहुतांचा आणि लाखांचा पालनवाला ॥ असे दुःख आठवूनियां रडे, आडवें बाळ घेऊनिया पुढें, नाहीं जंगल झाडी दाट, हिरवा पाला । नाहीं फार सांगतां दुःखाचा डोंगर झाला ॥ कर्ता हर्ता ईश्वर गाजविला, राणी विनविती राजाला, वनामाधिं टाकुनि गेले मला, समशेर बाळासाहेब

गेले कैलासाला। त्या दखनच्या राजाला वनवास आला॥ ...। कशी निष्ठुर॥ ४॥

अवघा झाला येकंकार, समसमान मांगमहार, कायद्यामधिं आणिले सार, फार औघड। कशी आड नी विहीर झाली मागें पुढें॥ असें बोलून होते काई, आधींच दिली होती चौथाई, शत्रु आले आपलें पायीं, झाले जड। वाजती बिगुल बासरी, झाले बंद चौघडे॥ सोनें होत माती, सरली पुण्यें, हरली मती, मी अज्ञान तरी किती, गाऊं तुमच्यापुढें। सद्गुरु गोपाळाची जडणी रसाळु गोड॥ देवनुक खंडे गाऊ खोर, चोबाजूला बुरुज चार, मारुती सहित येशी थोर, बरोबरी आड। गुणी रात्रूजी पाटिल गुणाचे गाढे॥ बाजीराव ह्मणता बला, कुणीकडे गेला नऊशें भाला, कवीनें मनीं पुरुषाद केला, जमा नाहीं। कशी निष्ठुर० ॥ ५॥

# — ३८ —

# प्रतापसिंहाच्या पदच्युतीचा पोवाडा

( शाहीर बाबाजी )

दक्षणेमधीं सातारा हई, कैद झाली इंग्रेजी लई, शाहु छत्रपती महाराज गेले बाई। गादीला धनी असा परतून होणार नाहीं ॥ कसें कलें कृष्णाबाई, माझे दिनाचे आई, मोठे मोठे मानकरी झाले गाई। ते आपासाहेब महाराज कपटी हई ॥ इंग्रजानें फितूर केला, मिळून आपासाहेबाला, त्यांहीं माहुलीचेवर बसून मनसुबा केला। त्या दिवशीं जाहिर केलें साताऱ्याला ॥ दुसऱ्या दिवशीं कळलें महाराजाला, एक महिना सहा दिवस झाले त्याला, मग मोठी चिंता पडली त्यांला बाई ॥ शाहु० ॥ १ ॥

बुवासाहेब साताऱ्याचे धनी, कैद केले इंग्रजांनीं, ते दोघे बंधु नेले जिथें होती राणी। मेण्याच्या झडपा लाविल्या इंग्रजांनीं ॥ इंग्रज भापिले भोयांला, मेणा मागें मोहोरे केला, क्षणभरी विस्मय झाला आपाला। दादांचा मेणा दूर कसा राहिला ॥ मेण्यांतून खालीं उतरला, ताकिद केली साऱ्या सैन्याला, त्या दिवशीं सेनापति शिव झाला। . . . तो दिवस गेला अस्तमानाला। बुवासाहेब रडूं लागला, उभ्यानें आंग टाकी धरणीला ॥ चौदा दिवस झाले बंधूच्या मरणाला बाई ॥ शाहु० ॥ २ ॥

दैवाची झाली माव पुत्र जन्मला, नांव जंगली राजा ठेविला, ठसा सैन्यांत पडला। खुशाली झाली बुवासाहेबाला ॥ बुवासाहेब पुढें निघोन गेले काशीला, पुकारा दिला सर्व दक्षिणेला, चट् निरोप दिला अवघ्या मानकऱ्याला। तो खंडोबा शिंदा जवळ तिथें राहिला ॥ दोन हत्ती इनाम बक्षीस दिले त्याला, तो निघोन आला दाक्षिणेला, त्या दिवशीं गिराण होतें पूर्णिमेला। जाऊन अन्न लाविला होळीला ॥ दोन प्रहरचा अम्मल झाला, रडती सोरे इंद्रचंद्र डळमळला, आज कशी आंधारी चढली साताऱ्याला बाई ॥ शाहु० ॥ ३ ॥